




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार ६ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## भुसावळमध्ये भीषण अपघात

## एक वर्षाच्या चिमुरडीसह एकाच कुटुंबातील 4 जण ठार

**भुसावळ /प्रतिनिधी :** वरणगावजवळ राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी दुपारी एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण अपघाताची घटना घडली. एक भरधाव चारचाकी वाहन आणि दुचाकी यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत दुचाकीवरील एकाच कुटुंबातील महिला, दोन तरुण आणि एका वर्षभराच्या चिमुरडीचा जागीच मृत्यू झाला. हे सर्व मृत मलकापूर येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली. या घटनेमुळे संपूर्ण मलकापूर परिसरावर शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर येथील रहिवासी असलेले हे चारही जण एकाच दुचाकीवरून वरणगावकडे जात होते. दुपारी २ वाजेच्या सुमारास त्यांची दुचाकी वरणगाव बायपासजवळ आली असता, राष्ट्रीय महामार्गावरून जाणा-या एका भरधाव चारचाकी वाहनाने (क्रमांकः MH-19 EV-5353) त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात १ वर्षाच्या चिमुरडीसह चौघेही जण गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. जखमींना जळगाव जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर चौघांनाही मृत घोषित केले. विजय शंकर काळे (वय, १९), ऐश्वर्या बहादूर भोसले (वय, ३०), विघ्नेश शंकर चव्हाण (वय, १४) आणि मोनालिसा शिवबसप्पा भोसले (१, सर्व रा. मलकापूर) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातानंतर महामार्गावरील सुरक्षा आणि वाहनांच्या वेगावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, पोलीस या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

# मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सवलती




**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा समाजासाठी आज राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मराठा समाजाला आता ओबीसींप्रमाणे सवलती आणि सोईसुविधा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे शैक्षणिक सवलती आणि ८ योजना सुरू करण्यात येणार आहेत. मराठा समाजासाठी आज राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मराठा समाजाला आता ओबीसींप्रमाणे सवलती आणि सोईसुविधा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे शैक्षणिक सवलती आणि ८ योजना सुरू करण्यात येणार आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून आरक्षणाची मागणी करत असलेल्या मराठा समजाला सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये शैक्षणिक सोईसुविधा आणि सवलतींचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यात शालांत परीक्षेमध्ये शिष्यवृत्ती योजना, मोटर वाहन चालक प्रशिक्षण योजना, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना यांचा समावेश आहे. त्याबरोबरच महाराष्ट्रातील



रहिवासी असलेले आणि परराज्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीची योजनाही मराठा समाजाला लागू केली जाणार आहे. तसेच इतर मागास प्रवर्गाला लागू असलेल्या सर्व शैक्षणिक सवलती ह्या मराठा समाजाला लागू होणार आहेत.

## शासकीय जमीन हस्तांतरण, पुनर्विकासाचे अधिकार आता जिल्हाधिका-यांकडे

**मुंबई/प्रतिनिधी :** शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास आणि वापरात बदलमंजुरी हे राज्य शासनाचे अधिकार आता थेट जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तस्तरावर विकेंद्रित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार हा बदल झाला असून, यामुळे प्रसाशन गतिमान होईलच आणि जनतेचा पैसा, वेळ आणि प्रवास वाचेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून शासनाचे परिपत्रकही काढण्यात आले आहे.




शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त एफएसआय (FSI) किंवा टीडीआर (TDR) वापरण्यासाठी आतापर्यंत जनतेला मंत्रालयाची मान्यता लागत असे. आता हे पूर्ण अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आल्यामुळे स्थानिक पातळीवरच फायलींचा वेगाने निपटारा होईल. प्रशासकीय गतिमानता वाढवण्यासाठी पूर्वीच्या २८ डिसेंबर २०१५ व १७ सप्टेंबर २०१६ रोजीच्या अधिसूचना रद्द (पान २ वर)

# हायकोर्टाने 10 वर्षांनी पराभूत उमेदवाराला केले विजयी

**चेन्नई/वृत्तसंस्था :** मद्रास उच्च न्यायालयाने २०१६-२०२१ च्या विधानसभा निवडणुकीसाठी तिरुनेलवेली जिल्ह्यातील राधापुरम मतदारसंघाचे विजयी उमेदवार अप्पावू यांना विजयी घोषित केले आहे. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण प्रदीर्घ काळ प्रलंबित राहिल्यामुळे या निकालाला तब्बल १० वर्षांचा उशीर झाला. याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करताना न्यायमूर्ती जी. जयचंद्रन यांनी स्पष्ट केले की जेव्हा न्यायालये लोकप्रतिनिधी कायद्यानुसार खटल्यांचा जलद गतीने निकाल लावत नाहीत, तेव्हा लोकशाही आणि प्रौढ मतदानाच्या मूळ भावनेला तडा जातो. २०१६ च्या निवडणुकीत अण्णाद्रमुकचे उमेदवार आय.एस. इनबादुरई हे अवघ्या ४९ मतांच्या फरकाने विजयी झाले होते. या निकालाविरोधात द्रमुकचे (पान २ वर)

### हा प्रकार म्हणजे ‘न्यायाची थट्टा’



दुस-या महायुद्धानंतर स्वातंर्त्य मिळवून लोकशाही स्वीकारणा-या जगातील सर्वात मोठ्या देशांपैकी एक असलेल्या भारताची प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठी न्यायव्यवस्थेने संविधानाच्या इतर घटकांसोबत मिळून काम केले पाहिजे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम ८६(७) मधील तरतुदींचे पालन न केल्यास लोकशाही धोक्यात येईल. न्यायालयांनी यापूर्वीच्या मोहम्मद अकबर खटल्यातील स्वतःच्याच निरीक्षणांकडे दुर्लक्ष केले, तर मला भीती वाटते की आपला देशही ७५ वर्षांपूर्वी आपल्यासोबतच स्वतंत्र झालेल्या इतर हुकूमशाही देशांच्या मार्गाने जाउ शकतो. हा प्रकार म्हणजे ‘न्यायाची थट्टा’ असल्याचे सांगत न्यायमूर्ती जी. जयचंद्रन म्हणाले की, राधापुरम मतदारसंघातील मतदारांना अशा व्यक्तीला आपला लोकप्रतिनिधी म्हणून सहन करावे लागले, जो प्रत्यक्षात निवडूनच आला नव्हता.

### सुप्रीम कोर्टाच्या भूमिकेवर नाराजी

सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेवर मद्रास उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करताना न्यायमूर्ती जी. जयचंद्रन म्हटले की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण सुमारे सहा वर्षे प्रलंबित ठेवल्यानंतर, केवळ मुदत संपली म्हणून या कायदेशीर प्रश्नाचे उत्तर न देता तो तसाच ठेवून दिला. अत्यंत आदरासह म्हणावेसे वाटते की, सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे होते, कारण कनिष्ठ न्यायालय म्हणून आम्ही यापूर्वीच यावर आमचा निष्कर्ष नोंदवला होता.



## CJI सूर्यकांत यांच्या कार्यक्रमात प्रश्न विचारण्यापासून रोखले

### विद्यार्थी म्हणाला- आम्हाला सन्मान द्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताचे सरन्यायाधीश (CJI) सूर्यकांत यांच्या लंडन दौ-यादरम्यान एका कार्यक्रमात प्रश्न विचारण्यावरून वाद झाला. लंडन विद्यापीठाच्या बिर्कबेक कालेजमधील कार्यक्रमात CJI यांनी ’आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि आंतरराष्ट्रीय कायदा’ या विषयावर व्याख्यान दिले. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात एका महिलेने भारतात असहमतीबद्दल वाढत्या चिंतांचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. तिने सांगितले की, देशातील आणि परदेशातील अनेक कायदेशीर तज्ज्ञ भारतात असहमतीबद्दल वाढत्या नाराजीबद्दल चिंता व्यक्तकरत आहेत. मात्र, प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच सूत्रसंचालकाने हस्तक्षेप केला. त्याने सांगितले की, कार्यक्रमाचा विषय AI आणि आंतरराष्ट्रीय कायदा आहे, त्यामुळे हा प्रश्न घेतला जाणार नाही. लंडनमधील भारतीय उच्चायुक्तांनी या घटनेचा निषेध करत याला अशोभनीय वर्तन म्हटले. कॉकरोच जनता पार्टी (CJP) च्या प्रवक्त्याने हा व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये आणखी एक तरुण ‘आम्हाला सन्मान द्या’ असे म्हणताना ऐकू येतो. खरं तर, मीडिया रिपोर्ट्सनुसार, सरन्यायाधीशांनी १५ मे रोजी एका प्रकरणाची सुनावणी करताना देशातील बेरोजगार तरुणांची तुलना झुरळे आणि परजीवींशी केली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान देशातील बेरोजगार तरुणांना झुरळांसारखे म्हटले होते. ते म्हणाले - काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात. मात्र, दुस-या दिवशी त्यांनी आपल्या टिप्पणीवर स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले की, मीडियाच्या एका वर्गाने माझ्या टिप्पणीचा चुकीचा अर्थ लावला. CJI म्हणाले, ‘माझी टिप्पणी विशेषतः अशा लोकांसाठी होती, जे बनावट आणि खोट्या पदव्यांच्या आधारावर वकिलीसारख्या व्यवसायात आले आहेत. मीडिया, सोशल मीडिया आणि इतर प्रतिष्ठित व्यवसायांमध्येही असे लोक घुसले आहेत. ते परजीवींसारखे आहेत.‘

# मोदींच्या प्रकल्पांमुळे बेटांना नुकसान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते, काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा ग्रेट निकोबार विकास प्रकल्पावरून केंद्र सरकारवर टीका केली. या प्रकल्पामुळे बेटावरील पर्यावरण आणि स्थानिक समुदायांचे नुकसान करून व्यावसायिक हितांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ग्रेट निकोबार दौ-यादरम्यान त्यांनी स्कूबा डायव्हिंग करत कोरल रीफचा अनुभव घेतला आणि स्थानिक रहिवाशांशी संवाद साधला. या दौ-याचा व्हीडीओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. राहुल गांधी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये लिहिले आहे की, त्यांनी अलीकडेच भारताच्या दक्षिणेकडील टोकावरील इंदिरा पाइंटला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी बेटावरील



आदिवासी समुदाय आणि स्थायिक रहिवाशांशी चर्चा केली. त्यांच्या मते, वनहक्क कायद्याचे उल्लंघन करून आदिवासींच्या जमिनी हिरावल्या जात आहेत, तर सरकारने पुनर्वसित केलेल्या माजी सैनिकांसह इतर स्थायिकांना योग्य भरपाई मिळत नाही. राहुल गांधी यांनी शेअर केलेल्या व्हीडीओमध्ये ते ग्रेट निकोबारच्या समुद्रात कोरल रीफजवळ स्कूबा डायव्हिंग करताना दिसत आहेत. तसेच त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधतानाचे दृश्यही व्हीडीओमध्ये दाखवले आहेत. केंद्र सरकार या प्रकल्पाला सामरिक आणि संरक्षणाशी संबंधित उपक्रम म्हणून सादर करत असल्याचा दावा करत राहुल गांधी यांनी या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. संरक्षण हेच खरे उद्दिष्ट असेल, तर अंदमान निकोबार बेटांमधील भारतीय नौदलाच्या हवाई तळाचा भाग (पान २ वर)

# 15 लाख कोटींचा घोटाळा




**पुणे/प्रतिनिधी :** लाखो कोटींचा घोटाळा करून खळबळ उडवून देणा-या राजेश मेहता प्रकरणावरून आता राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या मुद्यावरून केंद्र सरकार आणि वित्तीय संस्थांवर घणाघाती हल्ला चढवला आहे. राजेश मेहताचा हा घोटाळा जगातील सर्वांत मोठा अकाउंटिंग घोटाळा असणार आहे, असा दावा रोहित पवारांनी केला. रोहित पवारांनी राजेश मेहताचा पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतचा (पान २ वर)

### एलआयसीच्या पैशांची माती झाली

*सर्वांत मोठे दुर्दैव म्हणजे एलआयसीमध्ये गुंतलेला पैसा हा देशातील कोट्यवधी सर्वसामान्य जनतेचा, कष्टक-यांचा आहे. या घोटाळ्यामुळे जनतेच्या हक्काच्या पैशांची देखील माती झाली आहे, असेही रोहित पवार म्हणाले. आपल्या पोस्टसोबत रोहित पवारांनी एक जुना फोटो देखील जोडला आहे. ज्यामध्ये राजेश मेहता हा थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत उभा असलेला दिसत आहे. यावरून राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.*

## मान्सून गोव्यात दाखल

**पणजी/वृत्तसंस्था :** शेतक-यांसह सर्वांकडून आतुरतेने वाट पाहिली जात असलेला मान्सून आज गोव्यामध्ये दाखल झाला आहे. नैऋत्य मान्सून आज कर्नाटक, तामिळनाडू आणि गोव्याच्या काही भागात पुढे सरकला असल्याची माहिती हमामान खात्याकडून देण्यात आली आहे. तसेच गोव्यानंतर आता पुढच्या काही दिवसांतच मान्सून सीमा ओलांडून महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार पुढील दोन तीन दिवसांमध्ये मान्सून महाराष्ट्र,



आंध्र प्रदेश आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच ५ ते ९ जून दरम्यान कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे, असे हवमान खात्याने म्हटले आहे. दरम्यान,समुद्र प्रचंड खवळलेला राहण्याची शक्यता असल्याने ५ जून ते १० जून २०२६ या काळात दक्षिण महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळचा किनारी भाग, तसेच लक्षद्वीप आणि पूर्व-मध्य अरबी समुद्रात मासेमारीसाठी न जाण्याचा इशारा मच्छिमारांना देण्यात आला आहे.

## अंदमानच्या समुद्रात सापडला नैसर्गिक वायूचा साठा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका- इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा फटका जगाला बसत आहे. या युद्धामुळे मध्य पूर्वेत तणाव निर्माण झालेला आहे. त्यामुळे जगातील इंधनाची पुरवठा साखळी विस्कळीत होत असल्याचं पाहायला मिळत आहे. याचा फटका भारतासह अनेक देशांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार देखील अलर्ट झालं असून काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान मोदींनी देशवासियांना इंधन बचतीचं आवाहन केलेलं आहे.असं असतानाच भारताला दिलासा देणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. भारताला नैसर्गिक वायूचा खजिना सापडला आहे. या शोधामुळे भारताला ऊर्जाक्षेत्रात मोठा फायदा होणार असल्याचं बोललं जात आहे. अंदमानच्या समुद्रात नैसर्गिक वायूचा मोठा साठा भारताला सापडला असल्याची माहिती खुद्द केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिली आहे.

## रशियाची भारताला मोठी ऑफर

### पाक-चीन संबंधांवरही बोलले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पाचव्या पिढीतील सुखोई-५७ बाबत रशियाचे राष्ट्रपती व्लादीमीर पुतिन यांनी मोठं विधान केले आहे. रशिया सुखोई-



५७ पाचव्या पिढीच्या स्टेल्थ लढाउ विमान कार्यक्रमावर भारतासोबत काम करण्यास नेहमीच तयार आहे. संरक्षण कार्यक्रमांच्या पुरवठा आणि विकास या दोन्ही बाबतीत भारताला पाठिंबा देण्यास आणि दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्य अधिक दृढ करण्यास आपण उत्सुक असल्याचं पुतिन यांनी सांगितले. पीटीआयसह जगातील प्रमुख वृत्तसंस्थांच्या प्रमुखांसोबत झालेल्या एका व्यापक चर्चेवेळी व्लादिमीर पुतिन यांनी हे विधान केले. पुतिन यांनी ब्रह्मोस सुपरसानिक क्रुझ क्षेपणास्त्रांच्या संयुक्त विकास आणि उत्पादनाबाबत सांगत भारतासोबतच्या रशियाच्या संरक्षण आणि लष्करी संबंधांचा उल्लेख केला. पुतिन यांनी संकेत दिले की, रशियाने भारताला पाचव्या पिढीच्या सुखोई-५७ लढाउ विमानांच्या विकासावर एकत्र काम करण्याचा प्रस्ताव दिला आहे. भारत पाचव्या पिढीच्या लढाउ विमानांची एक तुकडी खरेदी करण्याच्या प्रक्रियेत आहे. आम्ही आमच्या भारतीय मित्रांना पाचव्या पिढीच्या तंत्रज्ञानावर (पान २ वर)

# एमपीएससीच्या अंतिम निवडीत हुकलेल्या ऊमेदवारांना ‘निपुण सेतू’द्वारे रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचूनही अंतिम निवड यादीत स्थान मिळवू न शकलेल्या गुणवंत उमेदवारांसाठी आयोगाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. अशा उमेदवारांना खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग विभागामार्फत ‘मैत्री २.०’ पोर्टल अंतर्गत ‘निपुण सेतू’ हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) ’प्रतिभा सेतू’ या उपक्रमाच्या धर्तीवर महाराष्ट्रात ’निपुण सेतू’ हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत मजल मारलेल्या अनेक उमेदवारांकडे उच्च शैक्षणिक पात्रता, विश्लेषण क्षमता, नेतृत्वगुण आणि प्रशासकीय कौशल्ये असूनही मर्यादित पदसंख्येमुळे त्यांना संधी मिळत नाही. या गुणवंत मनुष्यबळाचा उपयोग राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासासाठी व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.या योजनेअंतर्गत एमपीएससीच्या कोणत्याही परीक्षेतील मुलाखत, कौशल्य चाचणी किंवा शारीरिक चाचणी यासारख्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या, मात्र अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांना लाभ मिळणार आहे. शासन निर्णयानंतर आयोजित होणा-या सर्व परीक्षांसाठी हा उपक्रम लागू राहणार असून, मागील एका वर्षातील पात्र उमेदवारांची माहितीही त्यांच्या संमतीनंतर आणि तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास पोर्टलवर समाविष्ट करण्यात येणार आहे.



’निपुण सेतू’ पोर्टलवर उमेदवारांचे नाव, जन्मवर्ष, शैक्षणिक पात्रता, विशेष प्राविण्य, पूर्वानुभव, संबंधित परीक्षेचे नाव, अंतिम टप्प्यातील गुण तसेच संपर्क तपशील उपलब्ध असतील. मात्र संपर्क माहिती केवळ अधिकृत आणि पडताळणी झालेल्या नियोक्त्यांनाच पाहता येणार आहे.उमेदवारांची माहिती एमपीएससीच्या अंतिम निकालानंतर सुरक्षित एपीआय प्रणालीद्वारे स्वयंचलितपणे पोर्टलवर हस्तांतरित केली जाईल. यासाठी डिजिटल संमती अनिवार्य राहणार असून, उमेदवाराची आयोगाच्या अन्य कोणत्याही परीक्षेत निवड झाल्यानंतर त्याची माहिती पोर्टलवरून आपोआप हटविली जाईल. माहितीची गोपनीयता राखण्यासाठी एन्क्रिप्शन आणि ॲक्सेस कंट्रोलसारख्या तांत्रिक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

शासनाने स्पष्ट केले आहे की, ’मैत्री’ पोर्टल केवळ समन्वयकाची भूमिका बजावणार असून रोजगाराची कोणतीही कायदेशीर हमी देण्यात येणार नाही. नोकरीचे स्वरूप, वेतन आणि सेवाशर्ती या संबंधित नियोक्ता व उमेदवार यांच्यातील परस्पर करारावर आधारित असतील.’मैत्री २.०’ अंतर्गत ’निपुण सेतू’ पोर्टल (पान २ वर)

## नीट परीक्षा पारदर्शक, सुरळीत व तणावरहित वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** ‘राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा’ (नीट) देणा-या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक आणि तणावरहित वातावरण असावे. सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना करून कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होउ नये, यासाठी अधिक दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी नीट परीक्षेच्या पूर्व तयारीसंदर्भात आयोजित बैठक झाली. गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, राज्य गुप्तचर विभागाचे आयुक्तशिरीष जैन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, सहसचिव संतोष खोरगडे, राज्य सूचना विज्ञान अधिकारी सपना कपूर, तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व परीक्षा केंद्रांवरील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवून त्याचे नियंत्रण करावे, तसेच सायबर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. परीक्षा केंद्रांवर उमेदवारांची तपासणी व ओळख पडताळणी प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी. परीक्षेसंदर्भातील अचूक माहिती विद्यार्थी, पालक आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समाज माध्यमांचा प्रभावी वापर करून व्यापक जनजागृती करण्यात यावी, तसेच परीक्षा प्रक्रियेबाबत अफवा किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित झाल्यास त्याचा तातडीने खुलासा करून विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मानत कोणताही संभ्रम निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी.पुणे आणि लातूर येथील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे, परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होउ नये, याची दक्षता घेण्याबरोबरच सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, पावसाच्या दृष्टीने पूर्वतयारी आणि (पान २ वर)

## महाडीबीटी पोर्टलवर खरीप बियाण्यांचे वितरण

### शेतक-यांनी तात्काळ अर्ज करावेत-कृषी मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतक-यांना दर्जेदार बियाणे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने यंदा महत्त्वपूर्ण पाउल उचलले असून खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणे आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाउन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत शेतक-यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भूईमुग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यभरात तब्बल २ लाख प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून त्याद्वारे शेतक-यांना सुधारित



तंत्रज्ञान, आधुनिक कृषी पद्धती आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार आहे.

योजनेअंतर्गत राज्यभरातील शेतक-यांसाठी सुमारे ३ लाख क्विंटल बियाण्यांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामध्ये ६६ हजार ७५० क्विंटल सोयाबीन तसेच ३५ हजार ५०० क्विंटल भूईमूग बियाण्यांचा समावेश असून इतर खरीप पिकांची बियाणेदेखील महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार आहेत.यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, ‘राज्यातील शेतक-यांना वेळेत आणि दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी कृषी विभागाने महाडीबीटी पोर्टलवरून बियाणे वितरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे बियाणे वाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि वेग येणार आहे. शेतक-यांनी कोणतीही प्रतीक्षा न करता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून या सुविधेचा लाभ घ्यावा. ते म्हणाले, ‘खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतक-यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा उपलब्ध करून देणे ही (पान २ वर)




# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ६ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# राऊत यांच्यावरील प्राणघातक हल्लाप्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करा

## भर उन्हात सकल हिंदू समाज हजारोंच्या संख्येने रस्त्यावर : मुख्यमंत्र्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**शहरातील अल्लाडा प्लॉट परिसरात युवक व त्याच्या कुटुंबीयांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाईच्या मागणीसाठी शुक्रवार, ५ जुन रोजी सकल हिंदु समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. भर उन्हातही या मोर्चात हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष सहभागी झाले होते. यावेळी मोर्चेकऱ्यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांना निवेदन देवून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली.**



निवेदनानुसार, १ जुन रोजी शहरातील अल्लाडा प्लॉट परिसरात प्रतीक राजेश राऊत हे आपल्या आईसमवेत दत्तनगरकडे जात असताना बाबर नावाच्या व्यक्तींने त्यांच्या वाहनाला कट मारला. याबाबत प्रतीक राऊत यांनी विचारणा केली असता त्यांच्यासोबत वाद घालून मारहाण करण्यात आली. या घटनेत प्रतीक राऊत यांच्या आईच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या हाताला गंभीर इजा झाली. त्यानंतर प्रतीक व त्यांच्या आईला दवाखान्यात नेण्याकरिता प्रवीण राऊत हे आपल्या नातेवाईकांसह घटनास्थळी गेले असता त्यांनाही शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. या मारहाणीत प्रवीण राऊत यांच्या डोक्यावर मागून दगड मारण्यात आला. ते खाली पडल्यावरही त्यांच्या छातीवर लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली. सदर संपूर्ण घटना सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे कैद झालेली आहे व त्यामध्ये संबंधित आरोपी दिसत आहेत,

प्रवीण राऊत रणचंडी व्यायाम प्रसारक मंडळाच्या माध्यमातून युवक-युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करतात. तसेच प्रवीण राऊत व प्रतीक राऊत हे सामाजिक कार्यात सक्रिय असून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी राहिले आहेत. त्यामुळे या हल्ल्यामागे वैयक्तिक वादापालीकडे अन्य हेतू असण्याची शक्यता देखील तपासण्यात यावी, तसेच गुन्हा दाखल करत असताना गजानन काळे व आमटे यांनी रिपोर्ट लिहिण्यामध्ये दिरंगाई केली आरोपींच्या परिवारातील आई व बहीण ही रिपोर्ट लिहित असताना अक्षरशः टेवलच्या बाजूला बसलेली आपल्याला पोलीस स्टेशनच्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये दिसत आहे तसं बघता फिर्यादी जेव्हा आपला रिपोर्ट लिहित असते तेव्हा आरोपीच्या जवळील कोणीच तिथे नसणे गरजेचे आहे. दोन्ही स्टेशन डायरीवरच्या कर्मचाऱ्यांनी दिरंगाई केली असल्याचा आरोप होत आहे.

# दर्जेदार दूरसंचार सेवा पोहोचविण्यासाठी सुचनांची अंमलबजावणी करावी – जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दूरसंचार सुविधा ही काळाची गरज असून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक नागरिकाला अखंडित मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून दिलेल्या सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.



जिल्ह्यातील दूरसंचार सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हास्तरीय दूरसंचार समितीची (डिएलटीसी) बैठक ४ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, नगर प्रशासन सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप, नगरपरिषद मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जयेश खंडारे, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक राहुल काकड यांच्यासह भारत संचार निगम लिमिटेडचे अकोला व वाशिम येथील अधिकारी, विविध दूरसंचार कंपन्यांचे प्रतिनिधी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**CBuD प्रणालीबाबत विशेष प्रशिक्षणाचे निर्देश**

बैठकीत 'Call Before u Dig (CBuD)' अर्थात खोदकामपूर्व सूचना प्रणाली विषयी सविस्तर माहिती देण्यात आली. जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी ही ऑनलाइन प्रणाली प्रभावीपणे वापरणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. सद्यस्थितीत या प्रणालीचा अपेक्षित वापर होत नसल्याने कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद करून पुढील आठवड्यात विशेष प्रशिक्षण आयोजित करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

**मोबाईल नेटवर्क, भारतनेट व ५जी सेवांचा आढावा**

बैठकीत जिल्ह्यातील मोबाईल नेटवर्क कव्हरेज, भारतनेट प्रकल्प, बीएसएनएल ४जी सॅच्युरेशन प्रकल्प, एअरटेल आकांक्षी गाव प्रकल्प, राईट ऑफ वे (रो), सिबीयुडी प्रणाली तसेच संचार साथी उपक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

# व्यापारी महासंघाचे नगर परिषदेला निवेदन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शुक्रवार दि. ५ जुन रोजी वाशिम व्यापारी महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष आशिष ठाकूर यांच्या नेतृत्वात नगर परिषद, वाशिम येथे जाऊन नगराध्यक्ष अनिल केंदले व मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांना शहरातील वाढत्या अतिक्रमण, स्वच्छता व व्यापारी समस्यांबाबत सविस्तर निवेदन देण्यात आले.

निवेदनात शहरातील प्रमुख रस्ते, चौक व व्यापारी भागांमधील अतिक्रमणावर तात्काळ व निष्पक्ष कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच लघु व्यवसायिक, हातगाडीधारक व फेरीवाले यांचे अतिक्रमण काढताना त्यांच्या रोजगाराचा विचार करून त्यांना योग्य पर्यायी जागा व पर्यायी व्यवस्था करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

याशिवाय न.प. शॉपिंग कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, बालाजी कॉम्प्लेक्स व अकोला नाका येथील नगर परिषद कॉम्प्लेक्सची स्वच्छता, दुरुस्ती व देखभाल तातडीने करण्यात यावी, अन्यथा व्यापारी वर्गाला कठोर भूमिका घ्यावी लागेल, अशी सूचना देण्यात आली.

# माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी विदर्भात नवे नेतृत्व

## मंगेश मुंदे यांच्यावर ९ जिल्ह्यांची जबाबदारी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

अखिल भारतीय विकास माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार संघटनेच्या विदर्भ विभाग अध्यक्षपदी कारंजा तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील युवा कामगार नेते मंगेश अरुणराव मुंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या वतीने त्यांच्यावर विदर्भातील नऊ जिल्ह्यांच्या संघटनात्मक बांधणी व कामगार प्रश्नांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनिष जनार्दन लांजेवार यांनी मंगेश मुंदे यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांच्या निवडीची घोषणा केली. नोंदणी



क्रमांक पीएल/पी/०८/२०२५ असलेल्या या संघटनेचे मुख्य कार्यालय नालासोपारा, जिल्हा पालघर येथे आहे.

मंगेश मुंदे हे सामाजिक, कामगार व संघटनात्मक क्षेत्रात सक्रिय असून त्यांच्या नेतृत्वगुणांची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विदर्भातील माथाडी, ट्रान्सपोर्ट व असंघटित कामगारांना सक्षम नेतृत्व मिळणार असल्याची भावना कामगार वर्गातून व्यक्त होत आहे.

तसेच विविध सामाजिक, राजकीय व कामगार संघटनांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

संघटनेच्या माध्यमातून विदर्भातील कामगारांचे प्रश्न शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, त्यांच्या हक्कांसाठी लढा उभारणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील कामगारांपर्यंत पोहोचविणे यासाठी मुंदे कार्यरत राहणार असल्याचे सांगितले जात आहे.

# मातृशक्तींनी वृक्षारोपण चा संकल्प घ्यावा-सौ.खेडकर

**अकोला :** दिव्यांग वर्गात सेवा करणाऱ्या महिलांच्या केशव दिव्यांग महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय रेल्वे प्रवासी महिला संघटना दिव्यांग आघाडी विदर्भ अध्यक्ष तथा प्रहार संघटनेच्या महानगर उपाध्यक्ष सौ मनीषा खेडकर यांच्या पुढाकारात आयोजित या कार्यक्रमात कार्यक्रम अध्यक्ष म्हणून छावा संघटनच्या जिल्हा अध्यक्ष श्रीमती ममता सरपोतदार होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून योग शिक्षिका सौ रीना खंडारे उपस्थित होत्या. मान्यवरांच्या स्वागताने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्रदूषणाचा भस्मासुर पृथ्वीला गिळू पाहत आहे .प्रदूषणाच्या समस्येने सर्वत्र उग्र रूप धारण केलेले असून पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक झाले आहे.ठ

या संबंधी समाजाला जागृत करण्यासाठी व समाजामध्ये वृक्षारोपण व संवर्धनासाठी जनजागृती करण्यासाठी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो .या दिनाचे औचित्य साधून स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल वाशिम येथे निसर्ग इको क्लब व सामाजिक वनीकरण विभाग वाशिमच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे होत्या तर प्रमुख उपस्थितीत म्हणून वनपाल आर आर कामडी, बि. बी. हरणे, वनरक्षक ए. एस. लेमले, बी. सी. वानखेडे, संतोष . के. जुमडे,मानद वन्यजीव रक्षक आकाश आहाळे होते .उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले व त्यांनी यावेळी पर्यावरणाच्या व समाजाच्या दृष्टीने वृक्षारोपण व संवर्धन कसे महत्त्वाचे आहे याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले .

# मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत रिठद गावातील विकासात्मक कामाची पथकाद्वारे पाहणी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरांमध्ये व त्यामधून निवड झालेल्या ग्रामपंचायतीची राज्यस्तरीय स्पर्धेच्या अंतर्गत निवड झालेल्या ग्रामपंचायतींच्या मूल्यमापनासाठी जिल्हा परिषद गोंदिया येथील राज्यस्तरीय तपासणी समितीने रिसोड तालुक्यातील रिठद या ग्रामपंचायतींची सविस्तर पाहणी केली.तपासणी समितीच्या पथकाचे नेतृत्वाखाली जिल्हा परिषद गोंदियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर यांनी केले. समितीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) , पवन खंदारे- शिक्षणाधिकारी,सुरेंद्र टेंबरे- जिल्हा व्यवस्थापक यांचा समावेश होता. समितीने अभियानाच्या निकषांनुसार ग्रामपंचायतींमधील विकासकामे, स्वच्छता व्यवस्थापन, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, ग्रामविकास उपक्रम तसेच प्रशासकीय व आर्थिक दस्तऐवजांची बारकाईने तपासणी केली. यावेळी ग्रामपंचायतींनी राबविलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती समितीसमोर सादर करण्यात आली. रिठद येथे ग्रामविकास, स्वच्छता, स्मशानभूमी सौंदर्याकरण, जलव्यवस्थापन आणि लोकसहभागातून



राबविलेल्या उपक्रमांची पाहणी करण्यात आली.साकारलेल्या योजनांचे सादरीकरण करण्यात आले. समितीने रिठद ग्रामपंचायतींने अभियानाच्या उद्दिष्टांनुसार केलेल्या उत्कृष्ट कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.रिठद गावांमध्ये राबविण्यात आलेल्या विकासकामांची गुणवत्ता, स्वच्छता, लोकसहभाग आणि शाश्वत विकासाच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांचे तपासणी सदस्यांनी विशेष कौतुक केले. पाहणीदरम्यान रिसोड पंचायत समितीचे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी लांडे, वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी खुळे, रिसोड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी( पंचायत) मोहन भुसारी, संदीप ढंगारे, राजेश आरु,एन एन वाकुडकर,प्रशासक- सौ.पंचफुला अंभोरे हि सर्व मंडळी या पाहणीपथका समवेत सहभागी होते.

# ग्रामपंचायत येथे पर्यावरण दिन साजरा

**अडोळी :** येथून जवळच असलेल्या अडोळी येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि.५ जून रोजी पर्यावरण दिन सकाळी ९:३० वाजता साजरा करण्यात आला. प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत प्रशासक सविताताई इढोळे तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्राथमिक आरोग्य उपकेंद्र अडोळीच्या समुपदेशक अधिकारी डॉ.निता मापारी, समाजसेवक राजकुमार पडघान, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांची होते. सुरूवातीला राजकुमार पडघान यांनी पर्यावरण दिनाचे महत्त्व विषद करतांना म्हटले की, संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने १९७२ पासून हा पर्यावरण दिन साजरा केला जातो.या दिनाच्या निमित्ताने राजकुमार पडघान यांनी सांगितले.

# पांगरी महादेव रस्त्याच्या रखडलेल्या कामावरून ग्रामस्थ आक्रमक

## ठेकेदारावर प्रशासनाची बदनामी केल्याचा ग्रामस्थांचा आरोप

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरुळपीर तालुक्यातील पांगरी महादेव येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. अनेक दिवसांपासून रस्त्याचे काम रखडल्याने ग्रामस्थांनी समृद्धी महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

या पार्श्वभूमीवर महसूल व पोलीस प्रशासन सतर्क झाले असून आंदोलन स्थगित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.ष्मंगरुळपीरचे तहसीलदार अनासने, मंगरुळपीर पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर शेळके,



उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप क्षीरसागर तसेच पिंजर पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनी गावात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व ग्रामस्थांशी चर्चा केली. दरम्यान, वाशिम-यवतमाळचे खासदार संजय देशमुख यांनीही संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून रस्त्याच्या कामाकडे गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना दिल्या. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, १३ मे रोजी झालेल्या बैठकीत संबंधित ठेकेदाराच्या अभियंत्यांनी ३० मेपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र मुदत संपूनही काम पूर्ण झाले नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. यामुळे ३१ मे रोजी समृद्धी महामार्गावर आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यावेळी किशोर देशमुख यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले की, जिल्ह्यात डिझेलची टंचाई नसल्याचे प्रशासन वारंवार स्पष्ट करत असताना काम रखडण्यामागे डिझेल टंचाईचे कारण देणे चुकीचे असून त्यामुळे जिल्हा प्रशासनाची बदनामी होत आहे. संबंधित ठेकेदार व विभागीय अधिकाऱ्यांकडून चुकीची माहिती दिली जात असल्याचा आरोपही करण्यात आला. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला. यावेळी मोठ्या संख्येने महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते.

# आज गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मराठा सेवा संघ तालुका मालेगाव च्या वतीने वर्ग दहावी आणि बारावी मध्ये उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा ६ जून शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने मालेगाव येथे आयोजित करण्यात आला आहे . या सत्कार सोहळ्यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन तालुका अध्यक्ष तेजराव पाटील जाधव व तालुका सचिव अशोकराव जाधव यांनी केले आहे.

गेल्या पंचवीस वर्षापासून मराठा सेवा संघाच्या वतीने सर्व जातीधर्मातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो . विद्यार्थ्यांना आपल्या पुढील वाटचालीस योग्य मार्गदर्शन तथा प्रोत्साहन मिळेल व त्यामधून ते आपला आयुष्याचा मार्ग निवडतील या उदात्त हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दिनांक ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने करण्यात आले आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव कार्यक्रमांमध्ये वर्ग १० मध्ये व १२ मध्ये किमान ८५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण असतील ते विद्यार्थी तसेच यावर्षी नवोदय विद्यालयामधे निवड झालेल्या तसेच शासकीय सेवेमध्ये यावर्षी रुजू झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नारायणराव काळबांडे तसेच तहसीलदार दीपक पुंडे ठाणेदार राजेश खेरडे , ओमप्रकाश खुरसडे अशोकराव महाले, प्रा भरत आव्हाळे, प्राचार्य वसंतराव अवचार प्रविण पाटील, प्रा अनंतराव गायकवाड आदी प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# चीया पिकावरील मूल्यवर्धित अन्न प्रक्रिया व उद्योजकता विकास प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत सुविदे फाउंडेशन कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे आर्या (ARYA - Attracting and Retaining Youth in Agriculture) प्रकल्प तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) योजना अंतर्गत 'शेतमाल अन्न प्रक्रिया उद्योग : चीया पिकावर आधारित मूल्यवर्धित खाद्यपदार्थ निर्मिती व उद्योजकता विकास' या विषयावरील एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विस्तार शिक्षण विभागाचे विषय विशेषज्ञ डॉ. एस. के. देशमुख, उद्यानविद्या विभागाचे विषय विशेषज्ञ एन. बी. पाटील, पशुसंवर्धन विभागाचे विषय विशेषज्ञ डॉ. मयूर देशमुख, गृहविज्ञान विभागाच्या सौ. शुभांगी वाटाणे, कृषी विभाग,



वाशिम येथील इश्इर्क्षेत्रीय अधिकारी श्री. गोपाळ मुठाळ तसेच सौ. अर्चना कदम उपस्थित होते. मान्यवरांनी ग्रामीण युवक-युवती आणि महिला उद्योजकांना अन्न प्रक्रिया उद्योगातील व्यवसाय संधी, मूल्यसाखळी विकास, उत्पादन विविधीकरण आणि ग्रामीण उद्योजकता याविषयी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणात आर्या प्रकल्पांतर्गत २९ ग्रामीण युवक-युवती तसेच PMFME योजनेअंतर्गत बीजभांडवल प्राप्त २१ महिला लाभार्थी सहभागी झाल्या. अशा एकूण ५० प्रशिक्षणार्थींनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

प्रशिक्षणादरम्यान गृहविज्ञान विभागाच्या सौ. शुभांगी वाटाणे यांनी चीया (Chia) बियांचे उच्च पोषणमूल्य, ओमेगा-३ फॅटी ॲसिड, आहारातील तंतू (Dietary Fiber), प्रथिने, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे यांचे आरोग्यदायी महत्त्व स्पष्ट केले. तसेच बाजारपेठेमध्ये वाढत असलेली मागणी, ग्राहकांची बदलती खाद्यप्रवृत्ती आणि मूल्यवर्धित उत्पादनांच्या व्यावसायिक संधींबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिकांसह चीया लाडू, चीया एनर्जी बार, चीया सातू पीठ, चीया खीर तसेच इतर पोषणसमृद्ध मूल्यवर्धित खाद्यपदार्थांची निर्मिती प्रक्रिया प्रत्यक्ष करून दाखविण्यात आली. गोपाळ मुठाळ यांनी उत्पादन निर्मितीतील तांत्रिक बाबी, आवश्यक यंत्रसामग्री व उपकरणे, गुणवत्ता नियंत्रण (Quality Control), स्वच्छता व सुरक्षितता मानके, पॅकेजिंग, लेबलिंग, साठवणूक तसेच विपणन व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. एस. के. देशमुख यांनी भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) नोंदणी, सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी, ब्रँड विकास (Branding), बाजारपेठीय धोरणे (Marketing Strategies), उद्योजकता विकास आणि विविध शासकीय योजनांचा लाभ याविषयी माहिती दिली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८९ ■ शनिवार ६ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# काँग्रेसमध्ये ‘महाभारत : अखेर.. अग्रवालांची हकालपट्टी

## वडेट्टीवारांच्या राजकीय भवितव्याची चर्चा, कार्यकर्त्यांकडून नेतृत्वावरच आरोप



**वर्धा । जनमाध्यम**

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पेटलेले राजकारण आता काँग्रेसच्या घरातच धुमसताना दिसत आहे. पक्षाचे अधिकृत उमेदवार असलेले शैलेश अग्रवाल यांनी पक्षश्रेष्ठींना विश्वासात न घेता उमेदवारी मागे घेतल्याच्या आरोपानंतर अखेर त्यांची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली. मात्र या कारवाईनंतर काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये समाधानापेक्षा संताप अधिक असल्याचे चित्र दिसून येत आहे.

अग्रवाल यांच्यावर कारवाई झाली, पण पक्षाशी गद्दारी करणाऱ्या खऱ्या सूत्रधारांचे काय असा प्रश्न आता जिल्हाभरातील कार्यकर्ते विचारत आहेत. विधान परिषद निवडणुकीदरम्यान पडद्यामागे अनेक राजकीय घडामोडी झाल्याची चर्चा रंगली होती. त्यातूनच पक्षाची प्रतिमा मलिन झाली आणि काँग्रेसची दयनीय अवस्था झाल्याचा आरोपही कार्यकर्त्यांकडून होत आहे.

दरम्यान, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या राजकीय भवितव्याबाबतही विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये वडेट्टीवार यांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र याबाबत कोणतीही अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. तरीही काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष आणि नेतृत्वावरील वाढता अविश्वास यामुळे पक्षासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून, येत्या काही दिवसांत प्रदेश संघटनेत मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पक्षातील ज्येष्ठ नेत्यांच्या निर्णयांमुळेच काँग्रेसची राजकीय ताकद कमी झाल्याची भावना तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये वाढत आहे.

### आता गद्दारांवर कारवाई की सत्तेचा नवा सौदा?

### विधान परिषद निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये खदखद

दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी आता नव्या पिढीला संधी देऊन संघटनेत नवसंजीवनी आणावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. युवक नेतृत्वाला पुढे आणल्यास काँग्रेस पुन्हा उभारी घेऊ शकते, असा विश्वास अनेक कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत.

विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने उफाळून आलेला हा वाद आता केवळ एका उमेदवाराच्या हकालपट्टीपुरता मर्यादित राहिलेला नाही. उलट काँग्रेसच्या संघटनात्मक अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत पक्षश्रेष्ठी कोणते निर्णय घेतात, याकडे राज्याच्या राजकारणाचे लक्ष लागले आहे.

# गद्दाराला जोडे मारा : काँग्रेसचा संताप अनावर

## शैलेश अग्रवालांचा पुतळा जाळून निषेध



वर्धा । जनमाध्यम

विधान परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत उमेदवारी मागे घेतल्याच्या मुद्द्यावरून काँग्रेस कार्यकर्त्यांचा संताप शुक्रवारी उफाळून आला. शहरातील इंदिरा काँग्रेस सद्भावना भवनसमोर शैलेश अग्रवाल यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारून त्याचे दहन करण्यात आले. यावेळी परिसर घोषणांनी दणाणून गेला.

दुपारी चार वाजताच्या सुमारास काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत इंदिरा सद्भावना भवन समोर अग्रवाल यांच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. ’या गद्दाराचं करायचं काय?खाली डोकं,वरतं पाय’, शैलेश अग्रवाल मुर्दाबाद’, अशा आक्रमक घोषणांनी वातावरण तापले होते. आंदोलनकर्त्यांनी अग्रवाल यांनी विधान परिषद निवडणुकीत उमेदवारी मागे घेऊन पक्षाशी विश्वासघात केल्याचा आरोप केला.

काँग्रेस नेत्यांनी यावेळी सांगितले की, पक्षाने दिलेल्या संधीचा मान राखण्याऐवजी घेतलेल्या निर्णयामुळे हजारो कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या आहेत. पक्षनिष्ठेपेक्षा वैयक्तिक स्वार्थाला प्राधान्य देणाऱ्या राजकारणाला काँग्रेस कदापि सहन करणार नाही, असा इशाराही देण्यात आला.

पुतळा दहनाच्या या आंदोलनात काँग्रेसचे सुनील कोल्हे, मनोज चांदूरकर, सुधीर पांगुळ, राजेंद्र शर्मा, बाळा माऊसकर, ईक्राम हुसेन, यांच्यासह अनेक पदाधिकारी, माजी पदाधिकारी, युवक कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनामुळे वर्ध्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले असून, अग्रवाल यांच्या भूमिकेवरून काँग्रेसमधील नाराजी आता उघडपणे रस्त्यावर उतरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# लग्नाचे आमिष, अत्याचार अन् सोशल मीडियावर बदनामी; आरोपी गजाआड



**सेलू जनमाध्यम** : लग्नाचे खोटे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार करणे, तिच्यावर मारहाण करणे आणि तिच्याच नावाने बनावट सोशल मीडिया अकाऊंट तयार करून अश्लिल फोटो व व्हिडिओ प्रसारित करत बदनामी करणाऱ्या आरोपीला सेलू पोलिसांनी अटक केली आहे. हेमंत विजय धनंविज (वय ३१, रा. पुलगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने २०२२ ते मे २०२६ या कालावधीत पीडित तरुणीसोबत प्रेमसंबंध ठेवून लग्नाचे आश्वासन दिले. त्यानंतर तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर आरोपीने पीडितेच्या नावाने फेसबुक व इन्स्टाग्रामवर बनावट अकाऊंट तयार करून त्यावर अश्लील फोटो आणि व्हिडिओ अपलोड केले. विरोध केल्यास जीवे मारण्याची धमकीही दिली.

त्रासाला कंटाळून पीडितेने नागपूर येथील कपिलनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर ‘झिरो एफआयआर’द्वारे प्रकरण सेलू पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले. भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला होता.

मात्र पोलीस निरीक्षक नरेंद्र निस्वादे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने पुलगाव परिसरात सापळा रचून आरोपीला अटक केली. या कारवाईत अखिलेश गव्हाणे, मनोहर मुडे, सचिन वाटखेडे, ओमप्रकाश तल्लारी व विनायक गोडे यांनी सहभाग घेतला. या धडक कारवाईमुळे सेलू पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### कर्जदार महिलांच्या पैशांवर डल्ला

# २१ लाखांचा अपहार, ७ कर्मचारी अटकेत

**वर्धा जनमाध्यम :** गरीब व गरजू महिलांना कर्जपुरवठा करणाऱ्या भारत फायनान्शियल इन्क्लुजन लिमिटेड कंपनीच्या वर्धा व सेलू शाखांमध्ये २१ लाख ११ हजार ५३२ रुपयांच्या आर्थिक अपहाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कंपनीच्या सात कर्मचाऱ्यांविरुद्ध रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, स्वराज बालुरकर, सौरभ शिंदे, दर्शन उईके, हिमांशू बागडे, संकेत कदम, युपल गायकवाड आणि ओंकारेश्वर शर्मा हे संगम मॅनेजर पदावर कार्यरत होते. सदस्यांकडून साप्ताहिक हप्ते व कर्जफेडीची रक्कम वसूल करून ती कंपनीच्या खात्यात जमा करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती.

मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदस्यांची पडताळणी केली असता अनेक महिलांनी हप्ते नियमित भरल्याचे सांगितले. कंपनीच्या नोंदी तपासल्यानंतर संबंधित रक्कम जमा न झाल्याचे आढळून आले. तपासात आरोपींनी ११८ सदस्यांकडून वसूल केलेली रक्कम परस्पर वापरून अफरातफर केल्याचे समोर आले.

आरोपींनी पैसे परत करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र मुदत संपूनही रक्कम जमा न झाल्याने कंपनीने पोलिसांत तक्रार दाखल केली. रामनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत विश्वासघात, अपहार व फसवणुकीचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यातील मायक्रो फायनान्स क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

# गोरस भंडार बंदीविरोधात वर्धा पेटले

## गांधीभूमीत गोरससाठी जनशक्ती एकवटली; प्रशासनाविरोधात हजारोंचा एल्गार



**वर्धा जनमाध्यम :** गोरस भंडारवरील प्रशासकीय कारवाईच्या निषेधार्थ आणि संस्था पूर्ववत सुरू करण्याच्या मागणीसाठी आज वर्ध्यात हजारो नागरिक, शेतकरी, दूध उत्पादक, कर्मचारी व सर्वपक्षीय कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. गोरस भंडार बचाव नागरी समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या भव्य मुक मोर्चाने शहराचे लक्ष वेधून घेतले.

मगन संग्रहालय परिसरातील गोरस भंडार मुख्यालयापासून मोर्चाची सुरुवात झाली. स्टेट बँक चौक, इंदिरा मार्केट, सोशलिस्ट चौक, बडे चौक, इतवारा चौक मार्गे बाबासाहेब आंबेडकर चौकात मोर्चाचा समारोप झाला. त्यानंतर प्रतिनिधी मंडळाने जिल्हाधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर करून गोरस भंडारवरील बंदीची कार्यवाही तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, सर्वोदय नेते अविनाश काकडे, काँग्रेस नेते अभ्युदय मेघे, सुनील कोल्हे, मनोज चांदुरकर, राजेंद्र शर्मा, ईक्राम हुसेन, सुरेश ठाकरे, नीरज गुजर, विशाल मानकर, हरीश इथापे, गोविंदा डोळे, बाळा माऊसकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले की, १९३८ पासून कार्यरत असलेली गोरस भंडार ही संस्था वर्ध्याच्या सहकार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. कोणतीही पूर्वसूचना किंवा सुधारणा करण्याची संधी न देता करण्यात आलेली कारवाई अन्यायकारक असून त्यामुळे शेतकरी, दूध उत्पादक, कर्मचारी व वितरकांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम झाला आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा धक्का बसला आहे. ‘संस्था बंद करण्याऐवजी त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, उत्पादन व विक्री केंद्रे तात्काळ सुरू करावीत आणि संबंधित घटकांशी संवाद साधूनच पुढील निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली. जवळपास शतकभराची परंपरा असलेल्या गोरस भंडारचे अस्तित्व वाचविण्यासाठी लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मुन्ना झाडेंना जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्याच्या दृष्टीने नगरसेवक शैलेंद्र उर्फ मुन्ना झाडे यांची वर्धा जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. वर्ध्यात आयोजित पक्षाच्या आढावा बैठकीत



जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, प्रदेश सरचिटणीस सुनील राऊत आणि युवा नेते समीर देशमुख यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या झाडे यांनी विविध लोकहिताच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

नियुक्तीनंतर झाडे यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी आमदार सुरेश देशमुख तसेच वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मोईमध्ये तीव्र पाणीटंचाई; तोडगा न निघाल्यास ठिय्या आंदोलनाचा इशारा



**सेलू जनमाध्यम** : तालुक्यातील मोई ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वॉर्ड क्रमांक ३ मध्ये पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायत प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

वॉर्ड क्रमांक ३ मध्ये नळाद्वारे नियमित व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना दैनंदिन गरजांसाठी पाण्याचा शोध घ्यावा लागत आहे. अनेक कुटुंबांना शेतातील विहिरी किंवा अन्य स्त्रोतांवर अवलंबून राहावे लागत असून महिला व ज्येष्ठ नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत सदस्य चंदन शंकर कांबळे यांनी ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांना लेखी निवेदन सादर करून तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे. यापूर्वीही अनेकदा प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते; मात्र समस्येचे निराकरण झाले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

पुढील तीन दिवसांत वॉर्ड क्रमांक ३ मधील पाणीपुरवठा नियमित व सुरक्षित करण्यात यावा. अन्यथा नागरिकांसह ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल,

असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईचा प्रश्न अधिक तीव्र होत असताना प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. आता प्रशासन यावर कितपत तत्परतेने कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# देवस्थान जमिनींवर सरकारचा डोळा ; कायदा मागे घ्या, अन्यथा रस्त्यावर उतरू

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा इशारा; जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन



**वर्धा जनमाध्यम** : शासनाच्या प्रस्तावित ‘महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम, २०२६’ विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने तीव्र आक्षेप नोंदवत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. या कायद्यामुळे राज्यातील देवस्थाने, मठ, दर्गे आणि धार्मिक संस्थांच्या अस्तित्वावरच गदा येण्याची शक्यता असल्याचा आरोप पक्षाने केला आहे.

देवस्थानांच्या इनाम जमिनींच्या उत्पन्नातून पूजाअर्चा, महाप्रसाद, अन्नदान, यात्रोत्सव, वारकरी सेवा तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. या जमिनींचे निर्मूलन झाल्यास धार्मिक व सामाजिक व्यवस्था कोलमडून पडेल, अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली. तसेच या निर्णयामुळे जमिनींवर अतिक्रमण, अनधिकृत हस्तांतरण आणि व्यापारीकरणाला चालना मिळण्याचा धोका असल्याचेही नमूद करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात प्रस्तावित कायदा तात्काळ मागे घेण्याची, देवस्थान इनाम जमिनींना स्वतंत्र कायदेशीर संरक्षण देण्याची आणि अंतिम निर्णयापूर्वी राज्यभरातील धार्मिक संस्था, विश्वस्त, पुजारी व भाविकांची सार्वजनिक सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली.

शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास देवस्थान जमिनींच्या संरक्षणासाठी राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी प्रदेश सरचिटणीस सुनील राऊत, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नावेद शेख, दशरथ ठाकरे, संदीप किटे, प्रणय कदम, मुन्ना झाडे, सोहमसिंग ठाकूर, मिलिंद हिवलेकर यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुणे दारूकांडानंतर उत्पादन शुल्क विभागाचा धडाका

## वर्ध्यात २० गुन्हे दाखल; १० आरोपी अटकेत, साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा जनमाध्यम :** पुण्यातील विषारी दारूकांडानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू व्यवसायाविरोधात आक्रमक मोहीम हाती घेतली असून वर्धा जिल्ह्यात धडक कारवाई करत २० गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत १० आरोपींना अटक करण्यात आली असून ४ लाख ३५ हजार १५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांच्या निर्देशानुसार विभागीय उपायुक्त गणेश पाटील व जिल्हा अधीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. कारवाईदरम्यान अवैध दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे तब्बल १० हजार १८० लिटर रसायन नष्ट करण्यात आले. तसेच १९२ लिटर गावठी दारू आणि ८ लिटर विदेशी मद्य जप्त करण्यात आले.

भरारी पथकाचे निरीक्षक एम. एम. शेख यांच्या नेतृत्वाखाली दुय्यम निरीक्षक डी. वाय. राऊत, आर. यु. काष्ठे तसेच जवान अमित नागमोते, योगेश गावंडे, गिरीष बावने आणि सुजाता भारस्करे यांनी ही कारवाई केली.

पुणे दारूकांडानंतर राज्यभर अवैध दारू व्यवसायावर लक्ष केंद्रीत करण्यात आले असून वर्ध्यातील या धडक कारवाईमुळे दारू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे. अवैध दारूविषयी माहिती असल्यास नागरिकांनी उत्पादन शुल्क विभागाला कळवावे, असे आवाहन विभागाने केले आहे.

# इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि आधुनिक लॉजिस्टिक्स क्षेत्रात महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण करणार -मुख्यमंत्री

**■ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत दोन सामंजस्य करार ■ महाराष्ट्रात 4,080 कोटींची गुंतवणूक; 4,750 रोजगारांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निर्मिती**

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्य शासनाला केवळ प्रशासन म्हणून नव्हे, तर तुमचा भागीदार समजा. राज्यात संपूर्ण औद्योगिक परिसंस्था ऊभी राहावी, ही राज्य शासनाची भूमिका आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे शक्तिकेंद्र असलेल्या महाराष्ट्राला इलेक्ट्रानिक्स ऊत्पादन आणि आधुनिक लाजिस्टिक्स क्षेत्रात देशातील इतर राज्यांपेक्षा वेगळी ओळख निर्माण करण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे ऊद्योगांच्या विस्तारासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऊद्योजकांना दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख ऊपस्थितीत 'वर्षा' निवासस्थानी महाराष्ट्र शासन आणि इलेक्ट्रानिक्स ऊत्पादन क्षेत्रातील आघाडीची जबिल तसेच महाराष्ट्र शासन आणि दुबईस्थित आरएसए ग्लोबल यांच्यात दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमुळे महाराष्ट्रात ४ हजार ८० कोटी रु पयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ४ हजार ७५० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांच्या संधी निर्माण होणार आहेत.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या दोन्ही प्रकल्पांमुळे महाराष्ट्रातील औद्योगिक गुंतवणूक, निर्यात क्षमता आणि आधुनिक लाजिस्टिक्स व्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून ऊच्च कौशल्याधारित रोजगार निर्मितीला वेग मिळेल. तसेच इलेक्टानिक्स ऊत्पादन आणि लाजिस्टिक्स क्षेत्रातील महाराष्ट्राचे अग्रस्थान आणखी मजबूत होणार आहे.



**पुण्यात जबिलचा १,५०० कोटींचा विस्तार प्रकल्प-** जबिल कंपनी पुण्यात इलेक्टीनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हिसेस (ईएमएस) विस्तार प्रकल्प ऊभारणार आहे. ५जी ऊपकरणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित नेटवर्किंग स्विचगिअर्सच्या ऊत्पादनासाठी कंपनी १ हजार ५०० कोटी रु पयांची गुंतवणूक करणार असून त्यातून सुमारे ४ हजार थेट रोजगार निर्माण होणार आहेत. महाराष्ट्रात गेली २३ वर्षे कार्यरत असलेल्या जबिलचे राज्यात १० हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनीची नवी अत्याधुनिक ऊत्पादन सुविधा १७ जून २०२६ रोजी सुरू होणार आहे.

**रायगडमध्ये अल्ट्रा मेगा लाजिस्टिक्स पार्क-** महाराष्ट्र शासन आणि आरएसए लाजिस्टिक्स अँड ट्रान्सपोर्टेशन प्रा. लि. यांच्यात झालेल्या दुस-या सामंजस्य करारानुसार रायगड जिल्ह्यातील ऊरण येथील जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीए) परिसरात २५ हेक्टर क्षेत्रावर अत्याधुनिक 'अल्ट्रा मेगा लाजिस्टिक्स पार्क' ऊभारण्यात येणार आहे.या प्रकल्पासाठी २ हजार ५८० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून सुमारे ७५० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. कंटेनर स्टॅकिंग, कंटेनर धुलाई व स्वच्छता, दुरु स्ती, रिकाम्या कंटेनर्सची हाताळणी आणि साठवण यांसारख्या अत्याधुनिक सुविधा येथे विकसित करण्यात येणार आहेत. ऊद्योग विभागाचे प्रधान सचिव डा. पी. अन्बळगन, ऊद्योग विकास आयुक्तदीपेंद्रसिंह कुशवाह, जबिलचे ग्लोबल सीईओ माईक दस्तूर, व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला, ऊपाध्यक्ष देबाशीष चौधरी, संचालक संतोष भगवत तसेच आरएसए ग्लोबलचे अध्यक्ष अजय इंद्रवदन शाह, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक प्रकाश राव आणि मानव संसाधन प्रमुख मोहन लिमये यावेळी ऊपस्थित होते.

## राज्यसभा निवडणुकीसाठी मल्लिकार्जुन खर्गे यांनी उमेदवारी अर्ज केला दाखल

**बेंगळुरू /वृत्तसंस्था :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (एआयसीसी)चे अध्यक्ष आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी कर्नाटकमधून राज्यसभा निवडणुकीसाठी आपला ऊमेदवारी अर्ज दाखल केला आहे. राज्यसभा निवडणूक १८ जून रोजी होणार आहे. ऊमेदवारी अर्ज दाखल करताना के. सी. वेणुगोपाल, राहुल गांधी, मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, रणदीप सिंह सुरजेवाला तसेच कर्नाटक प्रदेश काँग्रेस कमिटी (केपीसीसी)चे अध्यक्ष बी. के. हरिप्रसाद यांच्यासह अनेक प्रमुख नेते ऊपस्थित होते.शुक्रवारी बेंगळुरू येथील विधान सौधामध्ये एआयसीसीचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी निवडणूक



अधिका-यांसमोर राज्यसभेसाठी औपचारिकपणे आपला ऊमेदवारी अर्ज सादर केला.ऊमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितले की, त्यांच्या ऊमेदवारीला पक्षातील सर्व आमदार आणि नेत्यांचा एकमताने पाठिंबा आहे. ते म्हणाले, आज मी माझा ऊमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सर्व आमदार आणि पक्षाच्या नेत्यांनी मला ऊमेदवार म्हणून निवडले आहे. त्यांच्या विश्वासाबद्दल आणि पाठिंब्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.खर्गे यांनी राज्यसभा निवडणुकीत काँग्रेस ऊमेदवारांच्या विजयाबाबत पूर्ण विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले की, पक्षाची एकजूट, शिस्त आणि संघटित कार्यपद्धती हीच काँग्रेसची सर्वात मोठी ताकद आहे. ते पुढे म्हणाले की, आमदार, नेते आणि कार्यकर्ते यांनी एकत्रितपणे काम केल्यास काँग्रेस ऊमेदवारांचा विजय निश्चित आहे. खर्गे यांनी विश्वास व्यक्त केला की, काँग्रेसचे सर्व ऊमेदवार या निवडणुकीत यश मिळवतील.

## महाराष्ट्राचा नवा विक्रम; 10 लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पार

**पुणे/प्रतिनिधी :**सौर कृषिपंपांच्या ऊभारणीत महाराष्ट्राने देशात नवा इतिहास रचत १० लाख सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याचा टप्पा पूर्ण केला आहे. प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेअंतर्गत ही ऐतिहासिक कामगिरी साध्य करण्यात आली असून, देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के पंप महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत.महावितरणकडून या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, बुधवारी (ता. ३ जून) महाराष्ट्राने १० लाख सौर कृषिपंपांचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. यामुळे सौरउर्जेच्या वापरातून कृषी क्षेत्राला शाश्वत उर्जा ऊपलब्ध करू न देण्यात राज्याने देशात आघाडी कायम राखली आहे.ऊपलब्ध आकडेवारीनुसार, देशभरात आतापर्यंत १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ पंप महाराष्ट्रात कार्यान्वित झाले असून, हा देशातील एकूण संख्येच्या ६४ टक्के इतका वाटा आहे. ऊर्वरित सर्व राज्यांमध्ये मिळून ५ लाख ६१ हजार ८१७ सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. दरम्यान, महावितरणने मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेअंतर्गत एका महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याची विक्रमी कामगिरी केली होती. डिसेंबर २०२५ मध्ये या ऊल्लेखनीय कामगिरीची नोंद गिनीज वर्ल्ड रेकार्डमध्ये करण्यात आली आहे.सौर कृषिपंपांमुळे शेतक-यांना दिवसा वीज ऊपलब्ध होत असून, वीजबिलाचा भार कमी होण्यास तसेच सिंचनासाठी शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्याय ऊपलब्ध होण्यास मदत होत आहे. त्यामुळे राज्यातील सौर कृषिपंप योजनेला शेतक-यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.



## अकोला-दर्यापूर रस्ते अपघातात पती-पत्नीचा जागीच मृत्यू; ग्रामस्थांनी केला रास्ता रोको

**अकोला/प्रतिनिधी :** मोलमजुरी करून ऊदरनिर्वाह करणा-या पती-पत्नीचा पहाटे पाच वाजेच्या सुमारास अकोला-दर्यापूर मार्गावरील खरप जवळ झालेल्या भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी रस्त्यावर ऊतरून 'रास्ता रोको' आंदोलन सुरू केल्याने सुमारे दीड ते दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, खरप बुद्रुक येथील रहिवासी विजय पांडुरंग इंगळे व त्यांची पत्नी प्रतिभा विजय इंगळे हे दोघे दुचाकीवरून जात होते. दरम्यान भरधाव वेगाने जाणा-या अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही टक्कर इतकी भीषण होती की, दोघेही ५ ते १० फूट अंतरावर पडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ जमा झाले आणि त्यांनी आरोपी चालकाला तात्काळ अटक करण्याची मागणी करत रास्ता रोको आंदोलन सुरू केले. सुमारे एक ते दोन तास चाललेल्या या आंदोलनामुळे रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलीस प्रशासनाच्या अधिका-यांनी घटनास्थळ गाठून गावकरी व मृताच्या नातेवाईकांशी चर्चा करून आरोपींना लवकरच अटक करण्याचे आश्वासन दिले. यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, अपघाताला जबाबदार असलेल्या आरोपींचा शोध घेउन अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा स्पष्ट इशारा मृतांच्या नातेवाईकांनी दिला आहे.




## एसटी स्थानके व बसेसची दर चार तासांनी स्वच्छता होणार -परिवहन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ आज मुंबईतील परळ बसस्थानक येथे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या ऊपक्रमामुळे राज्यातील बसस्थानके, एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे अधिक स्वच्छ, सुंदर व प्रवासी-अनुकूल बनविण्याचा महामंडळाचा संकल्प असल्याचे सरनाईक यांनी यावेळी सांगितले.परळ बसस्थानक येथे आयोजित कार्यक्रमात स्वच्छता मोहिमेसाठी ऊपलब्ध करू न देण्यात आलेल्या आधुनिक यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानके आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता ऊपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.यावेळी बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून



महाराष्ट्राच्या जनजीवनाचा अविभाज्य भाग आहे. दररोज लाखो प्रवासी एसटीच्या सेवांचा लाभ घेतात. त्यामुळे त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा ऊपलब्ध करून देणे ही महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेली ही राज्यव्यापी स्वच्छता मोहीम प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, आनंददायी आणि समाधानकारक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**प्लास्टिक पिशव्या व बाटल्यांचे पुनर्वापरासाठी संकलन-**पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छता मोहिमेदरम्यान आढळणा-या प्लास्टिकच्या बाटल्या व पिशव्या संकलित करू न त्यांचे पुनर्वापर (रिसायकलिंग) करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. या प्रक्रियेतून विविध टिकाउ व ऊपयुक्त ऊत्पादने तयार करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.सरनाईक पुढे म्हणाले की, स्वच्छता ही एकदिवसीय मोहीम नसून सातत्याने राबविण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे या मोहिमेच्या अंमलबजावणीवर वरिष्ठ अधिका-यांमार्फत नियमित देखरेख ठेवली जाणार असून स्वच्छतेच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक बसस्थानकावरील स्वच्छता व्यवस्थेचे नियोजनबद्ध निरीक्षण करण्यात येईल तसेच प्रवाशांकडून मिळणा-या सूचना आणि अभिप्रायांनाही प्राधान्य दिले जाईल.

**विस्तारित चार्जिंग केंद्राचे भूमिपूजन**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत एसटी महामंडळाने आपल्या सर्व २५१ आगारांमध्ये ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे ऊभारण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार परळ आगारात विस्तारित नउ चार्जिंग केंद्रांच्या ऊभारणीचे भूमिपूजन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, विभागीय नियंत्रक, कर्मचारी प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर ऊपस्थित होते. कार्यक्रमानंतर सरनाईक यांनी परळ बसस्थानक परिसर, प्रवासी प्रतीक्षागृह, प्रसाधनगृहे आणि इतर सुविधांची पाहणी करू न संबंधित अधिका-यांना आवश्यक सूचना दिल्या.राज्यभर एकाच वेळी सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेमुळे एसटी स्थानकांच्या स्वच्छतेत लक्षणीय सुधारणा होउन प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा ऊपलब्ध होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पावसाळ्याच्या आगमनाची चाहूल लागताच बाजारात जांभळांची आवक वाढली

**वर्धा/प्रतिनिधी :** ऊन्हाळ्याचा शेवट आणि पावसाळ्याच्या आगमनाची चाहूल लागताच बाजारात जांभळांची आवक वाढू लागली आहे. शहरात मागील काही दिवसांपासून रस्त्यांवर, चौकांमध्ये तसेच भाजी बाजार परिसरात जांभूळ विक्रेते दिसून येत आहेत. सध्या जांभूळ ३०० रु पये किलो दराने विकले जात असून, ग्राहकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.काळसर-जांभळ्या रंगाचे आणि आंबट-गोड चवीचे हे हंगामी फळ केवळ चविष्टच नाही, तर आरोग्यासाठीही अत्यंत लाभदायक मानले जाते. विशेषत? मधुमेह नियंत्रण, पचनसंस्थेचे आरोग्य आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी जांभूळ ऊपयुक्त असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.जांभळामध्ये आढळणारे जॅम्बोलिन आणि जॅम्बोसीन हे घटक रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे मधुमेहाच्या रु ग्णांसाठी जांभूळ फायदेशीर ठरते. पचनशक्ती सुधारते: जांभळातीलतंतूमय पदार्थ (फायबर) पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करतात. अपचन, गॅस आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्यांमध्येही ते ऊपयुक्त ठरते.आंबट-गोड चवीच्या जांभळांची बाजारपेठेत आवक वाढली असून, जागोजागी रस्त्यावर जांभळांच्या हातगाड्या दिसून येत आहेत.

## तामिळनाडूच्या राजकारणात मोठा भूकंप: अन्नामलाई यांचा भाजपला रामराम, राजीनामा मंजूर

**चेन्नई/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** तामिळनाडूच्या राजकारणात एक मोठी घडामोड घडली असून, सिंघम म्हणून ओळखले जाणारे तामिळनाडू भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी ५ जून २०२६ रोजी त्यांचा राजीनामा अधिकृतपणे मंजूर केला आहे, ज्यामुळे अन्नामलाई आणि भाजपच्या राजकीय वाटा आता कायमच्या वेगळ्या झाल्या आहेत.



के. अन्नामलाई यांनी २ जून २०२६ रोजी आपला राजीनामा पक्षाच्या नेतृत्वाकडे सुपूर्द केला होता. या निर्णयापूर्वी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आणि पक्षाचे सरचिटणीस बी.एल. संतोष यांच्याशी सविस्तर चर्चा केली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षाच्या नेतृत्वाने त्यांना आपला निर्णय मागे घेण्याची विनंती केली होती, परंतु अन्नामलाई आपल्या निर्णयावर ठाम राहिले. भाजप सोडल्यानंतर आता के. अन्नामलाई काय पाउल ऊचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांनुसार, ते लवकरच एका नवीन राजकीय आंदोलनाची घोषणा करण्याची शक्यता आहे, ज्याचे रूपांतर भविष्यात एका स्वतंत्र प्रादेशिक पक्षात होउ शकते. अन्नामलाई यांनी याआधीच संकेत दिले होते की, तामिळनाडूमध्ये राष्ट्रीय पक्षांपेक्षा समाजकेंद्रित नवीन राजकीय पर्यायाची गरज आहे.

के. अन्नामलाई यांच्या या निर्णयामागे काही महत्त्वाची कारणे मानली जात आहेत. तामिळनाडू भाजपमधील अंतर्गत समीकरणे आणि एआयएडीएमके सोबतच्या युतीवरून झालेले मतभेद त्यांच्यासाठी अडचणीचे ठरले होते. तसेच केंद्र सरकारच्या काही धोरणांबाबत, विशेषत? तीन भाषा सूत्राबाबत अन्नामलाई आणि राज्यातील राजकीय वातावरणात असलेल्या मतभेदांचा परिणाम त्यांच्या भूमिकेवर झाल्याचे बोलले जात आहे. अन्नामलाई हे सुरुवातीपासूनच आक्रमक शैलीसाठी ओळखले जातात आणि पक्षाच्या चौकटीत राहून काम करण्यापेक्षा, ते स्वत?ची एक स्वतंत्र राजकीय जमीन तयार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे समजते.२०२० मध्ये आयपीएसची नोकरी सोडून राजकारणात आलेल्या अन्नामलाई यांनी अत्यंत कमी काळात तामिळनाडू भाजपमध्ये स्वत?ची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या राजीनाम्यामुळे तामिळनाडूतील भाजप कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. पक्षासाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे, कारण अन्नामलाई हे भाजपचा आक्रमक चेहरा म्हणून ओळखले जात होते. आता आगामी काही दिवसांत के. अन्नामलाई आपल्या पुढील वाटचालीबाबत कोणती अधिकृत घोषणा करतात, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

## ३०० कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम होईल- वनमंत्री गणेश नाईक

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात विविध उपक्रमांचे उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी :**पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या एक पेड मां के नाम या अभियानातून देशभरात वृक्षारोपणाची लोकचळवळ ऊभी राहिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील राज्यव्यापी ३०० कोटी वृक्षलागवड अभियानातून महाराष्ट्र हरित आणि पर्यावरणदृष्ट्या अधिक सक्षम होईल, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय ऊद्यानात केंद्रीय कर्मचारी निवासस्थान संकुलाचे भूमिपूजन आणि पर्यावरण जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष प्रचार वाहनाचे ऊद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. गृह स्वयं पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय ऊपाध्याय, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार मनीषा चौधरी, प्रभाग समिती अध्यक्ष प्रकाश दरेकर, गणेश शंकर, सरिता झोरे, भाजप महिला मोर्चा अध्यक्षा अंकिता सावे, मुख्य वनसंरक्षक डा. जितेंद्र रामगावकर, मुख्य वनसंरक्षक (सीसीएफ) के. प्रदीपा, एन.आर. प्रवीण, वन विभागाच्या ऊपसचिव निकिता पांडे तसेच संजय गांधी राष्ट्रीय ऊद्यानाच्या संचालिका अनिता पाटील ऊपस्थित होत्या. नाईक म्हणाले की, ग्लोबल वार्मिंगमुळे पर्यावरण संरक्षणाची गरज सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली आहे. पारंपरिक पेट्रोल आणि डिझेल इंधनांना पर्याय म्हणून सौर आणि पवन उर्जेसारख्या पर्यावरणपूरक उर्जा स्रोतांवर भर देण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र वेगाने प्रगती करत असून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखण्याचे काम शासन करत आहे.

संजय गांधी राष्ट्रीय ऊद्यानातील वन्यप्राण्यांना जंगलातच खाद्य ऊपलब्ध व्हावे यासाठी जांभूळ, पेरू , फणस यासारख्या फळझाडांची मोठ्याप्रमाणावर लागवड करण्यात येणार आहे. त्यामुळे वन्यप्राणी अन्नाच्या शोधात जंगलाबाहेर येण्याचे प्रमाण कमी होईल. डोंगरवस्त्या आणि पाड्यांपर्यंत रस्ते सुविधा पोहोचविण्यासोबतच देवराई आणि वनराई निर्माण करण्यास प्राधान्य दिले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या विनंतीनुसार सामाजिक वनीकरण विभागामार्फत मुंबईसाठी एक लाख वृक्षरोपे ऊपलब्ध करून दिली जाणार आहेत. वन कर्मचा-यांना आवश्यक सुविधा व आधुनिक साधने ऊपलब्ध करू न देण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून वनविभागासाठी रोख्यांच्या माध्यमातून निधी ऊभारण्याचाही विचार सुरू आहे. राज्यातील पाच विभागांमध्ये टिश्यू कल्चर केंद्रे सुरू झाली असून त्यातून मोठ्या प्रमाणात दर्जेदार रोपनिर्मिती केली जाणार आहे. २०४७ पर्यंत विकसित आणि सामर्थ्यवान भारत घडविण्यासाठी पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहनही वनमंत्री नाईक यांनी केले.




आमदार मनीषा चौधरी यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या नावाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. प्लास्टिक हटाव, पर्यावरण बचाव हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आमदार प्रकाश सुर्वे म्हणाले की, वाढत्या ऊष्णतेच्या लाटांमुळे पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे. वृक्षारोपण हा त्यावरील प्रभावी ऊपाय असून वृक्षांमुळे पाउस वाढतो आणि पाणी संवर्धनास मदत होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या ३०० कोटी वृक्षलागवड अभियानाला नागरिकांनी कृतीशील प्रतिसाद द्यावा.आमदार संजय ऊपाध्याय यांनी निसर्गाचा अमूल्य ठेवा पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षित पोहोचविण्यासाठी वृक्षारोपणासोबतच इंधन बचतीकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. वाहनांचा वापर कमी करून सायकलचा वापर वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.आमदार प्रवीण दरेकर यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली वनविभागात सकारात्मक बदल घडत असल्याचे सांगितले. संजय गांधी राष्ट्रीय ऊद्यानात भव्य प्रवेशद्वार आणि आधुनिक ग्रंथालय ऊभारण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

जितेंद्र रामगावकर यांनी राज्यातील ३०० कोटी वृक्षलागवड मोहिमेद्वारे महाराष्ट्रातील वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे ऊद्दिष्ट असल्याचे सांगितले. तर के. प्रदीपा यांनी राज्यातील टिश्यू कल्चर केंद्रांमधून दीड कोटी रोपांची निर्मिती करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आल्याची माहिती दिली.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संजय गांधी राष्ट्रीय ऊद्यानाच्या संचालिका अनिता पाटील यांनी मुंबईच्या मध्यवर्ती भागात असलेले हे ऊद्यान शहराचे फुफ्फुस असल्याचे सांगितले. ऊद्यानाला पर्यटन आणि पर्यावरण शिक्षणाचे केंद्र बनविण्याच्या दृष्टीने विविध ऊपक्रम राबविण्यात येत असून ३४ हेक्टर क्षेत्रावर मियावाकी पद्धतीचे जंगल विकसित करण्यात येणार आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## तृणमूलला ओहोटी

तृणमूल काँग्रेसच्या २८ वर्षांच्या राजकीय इतिहासातील सर्वात मोठे वादळ अखेर अधिकृत फुटीच्या रूपाने समोर आले. ही ऐतिहासिक फूट पश्चिम बंगालसह राष्ट्रीय राजकारणाला कलाटणी देणारी ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षात धुमसत असलेल्या असंतोषाची ही परिणती आहे. पक्षाच्या ८० आमदारांपैकी तब्बल ५८ बंडखोर आमदारांनी ममता बॅनर्जी यांच्या पसंतीला बाजूला सारून ऋतब्रत बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड केली. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि ममतांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्या एकतर्फी आणि कॉर्पोरेट कार्यपद्धती विरोधातील हे बंड आहे. या गटाने विधानसभेतील अपयशासाठी थेट सर्वोच्च नेतृत्वाच्या राजकीय रणनीतीला जबाबदार धरले. पराभूत मानसिकतेतून बाहेर पडण्याऐवजी पक्षात अंतर्गत चिखलफेक सुरू झाली आणि पुढे याचे रूपांतर बंडामध्ये झाले. बंडखोर आमदारांनी ममतांबद्दल आदर कायम ठेवत अभिषेक यांच्या अहंकारी वर्तनावर टीका करत थेट पक्षावरच दावा ठोकला.मध्यंतरी तृणमूलच्या एका खासदारांनी आगामी दोन वर्षांत पक्ष संपण्याची भीती व्यक्त केली होती. एक दशकाहून अधिक काळ ममतांचे राजकीय वर्चस्व अबाधित होते. झुंजार नेत्या ही त्यांची प्रतिमा पक्षाच्या यशाचा मुख्य पाया होती. परंतु, घर फिरले की वासे फिरतात, या उक्तीनुसार विधानसभेतील पराभवाने पक्षाच्या वर्षानुवर्षे लपलेल्या कमकुवत बाजू चव्हाट्यावर आणल्या. खासकरून अभिषेक यांच्याबद्दलचे 'अंधप्रेम' पक्षाला आतून पोखरत चालले होते. या अंतर्गत वादात ठिणगी टाकण्याचे काम विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीने केले. पक्षनेतृत्वाने ज्येष्ठ नेते सोभनदेव चट्टोपाध्याय यांची शिफारस करणारे पत्र पाठवले. मात्र, आ. ऋतब्रत बॅनर्जी आणि सांदिपन साहा यांनी या पत्रावर आपल्या बनावट स्वाक्षऱ्या केल्याचा खळबळजनक आरोप केला. यामुळे पक्षाची प्रतिमा धुळीला मिळाली. आरोप करणाऱ्या आमदारांना पक्षविरोधी कारवायांचे लेबल लावून बडतर्फ केले गेले. या हुकूमशाही पद्धतीमुळे आमदारांमधील संताप अनावर झाला. परिणामी ममतांनी बोलावलेल्या बैठकीवर तब्बल ६० आमदारांनी बहिष्कार टाकला. तिथेच नेतृत्वाची पक्षावरील पकड सैल झाल्याचे स्पष्ट झाले.अखेर ५८ बंडखोर आमदारांनी हकालपट्टी झालेले नेते ऋतब्रत बॅनर्जी यांना विधिमंडळ दलाचे नेते म्हणून पाठिंबा देणारी पत्रे विधानसभा अध्यक्षांकडे सुपूर्द केली. त्यांनी मंजुरी देताच तृणमूल काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाचे अधिकृतपणे दोन गटांत विभाजन झाले. विधिमंडळातील बहुमताचे नियंत्रण बंडखोरांच्या हातात गेल्यामुळे ममता आणि अभिषेक यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत. सध्या दोन्ही गट ममता बॅनर्जी यांच्या नावाचा आणि प्रतिमेचा वापर करत आहेत. परंतु पडद्यामागील खरा संघर्ष तृणमूल काँग्रेसचे भविष्य नेमके कोणाच्या हातात असणार, यावरूनच सुरू आहे. पक्षातून फुटणाऱ्या गटाला मान्यता मिळवण्यासाठी दोन तृतीयांश म्हणजेच ८० पैकी ५४ आमदारांची गरज आहे. ऋतब्रत बॅनर्जी यांच्यासोबत ५८ आमदार असल्याने अपात्रतेची अडचण येण्याची शक्यता दिसत नाही. पण महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीनंतर जशी न्यायालयीन लढाई सुरू झाली, तशीच बंगालमध्ये सुरू होणार हे निश्चित. येणारा काळ ममता बॅनर्जी यांच्यासाठी कसोटीचा असणार आहे. ज्या नेत्यांनी पक्षाला तळागाळातून उभे केले, त्यांना डावलून निर्णय घेतले जातात, तेव्हा असा स्फोट होतो. कोलकाता महापालिकेचे महापौर, तृणमूलचे नेते फिरहाद हाकीम यांचा राजीनामा हा ममतांसाठी मोठा धक्का आहे. ममतांच्या जहाजाला लागलेली गळती त्यांच्या सर्वात विश्वासू सहकाऱ्यांपर्यंत पोहोचली आहे. ऋतब्रत बॅनर्जी यांचा गट पक्षचिन्हावर दावा करेल, तेव्हा ममतांसमोर स्वतःच्या पक्षाचे अस्तित्व वाचवण्याचे आव्हान असेल. त्यांनी तातडीने इंडिया आघाडीची बैठक बोलावण्याची मागणी केली. परंतु, प. बंगालमध्ये ज्या काँग्रेस आणि डाव्या पक्षांसोबत तृणमूलचा स्थानिक पातळीवर छत्तीसचा आकडा राहिला, ते पक्ष दीदींना वाचवण्यासाठी कितपत पुढे येतील, हा मोठा प्रश्न आहे. कारण राजकारणात सहानुभूतीला स्थान नसते, तिथे केवळ संख्याबळाचा आदर केला जातो.भारतातील प्रादेशिक पक्षांचे भवितव्य अधिक गडद होत चालले आहे, ही बाब बंगालमधील बंडाने स्पष्ट केली. विरोधक या घडामोडींचे खापर भाजपवर फोडत असले तरी प्रत्यक्षात वैयक्तिक राजकीय महत्त्वाकांक्षा हे याचे मूळ कारण आहे. वर्षानुवर्षे एखाद्या कंपनीप्रमाणे पक्षाची मालकी आपल्या दावणीला बांधताना कार्यकर्ते-नेत्यांच्या वाढत्या आकांक्षांकडे, भूमिकांकडे दुर्लक्ष होत राहिल्यामुळे अशी फूट पडण्यास जागा तयार होते. शिवसेना, राष्ट्रवादी, तृणमूलच्या घटनांमध्ये एक समान धागा दिसतो, तो म्हणजे या तिन्ही पक्षनेतृत्वांना पक्षातील धुसफूस वाढत चालल्याचा इशारा निकटवर्तीयांनी दिला होता. अशा वेळी चाणाक्षपणा दाखवत पक्षांतर्गत असंतोष शांत करण्याचे कौशल्य नेतृत्वाने दाखवणे गरजेचे असते. त्याऐवजी आपल्याच म्हणण्यावर अडून राहण्याची हटवादी भूमिका घातक ठरते, हा या प्रकरणांचा संदेश आहे.समाजशास्त्राचे अभ्यासक मॅक्स वेबर यांच्या मते, राजकीय पक्षांचे अस्तित्व हे प्रामुख्याने तीन प्रकारच्या अधिकारांवर टिकून असते. घराणेशाही, तर्कसंगत निर्णय आणि करिष्मा. जे राजकीय पक्ष केवळ करिष्मा किंवा घराणेशाही अधिकारावर चालतात, ते तात्पुरते यशस्वी झाले तरी दीर्घकाळ टिकू शकत नाहीत. पक्षाचे अस्तित्व कायम राखण्यासाठी त्याला तर्कसंगत कायदेशीर स्वरूप देणे म्हणजेच पक्षात लोकशाही नियम, घटना आणि संस्थात्मक चौकट तयार करणे अत्यंत आवश्यक असते. भारतातील बहुतांश प्रादेशिक पक्ष हे एका विशिष्ट नेत्याच्या वैयक्तिक करिष्म्यावर उभे राहिलेले आहेत. या पक्षांमध्ये निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्णपणे एकाच व्यक्तीभोवती केंद्रित असते. जोपर्यंत करिष्मा असणारा हा नेता सक्रिय असतो, तोपर्यंत पक्ष एकसंध राहतो. परंतु, त्याच्या राजकीय प्रभावाला मर्यादा येतात, ओहोटी लागते तेव्हा पक्षाला संस्थात्मक स्वरूप न दिल्याचा फटका बसतो. तृणमूल काँग्रेसने पक्षामध्ये लोकशाही मार्गाने निर्णय घेतले जातील अशी कोणतीही संस्थात्मक साखळी तयार केली नाही. सत्तेचे कोंदण असेपर्यंत सारे सुरळीत सुरू राहिले; पण सत्तेचा आधार नाहीसा झाल्याबरोबर संपूर्ण संघटना पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली.


ोदींनी सर्वानाच फसवले : अण

## धोतरात झुरळ...

**झुरळ जनता पार्टीने सोशल मिडियावर घातलेला गराडा अचानक अण्णा हजारे यांनी मोबाईलवर पाहून मोदीने सर्वांना फसवले अशी आरोळी (केविलवाण्या आवाजात) फोडली. कारण समाज माध्यमावर झुरळ खूप फिरत असताना त्या ते 'आप' ले समर्थन करणारे पिल्लू आहे असा तपास लागला.**

कापसाच्या धाग्यातून निघणारे सूत भारताच्या नकाशावर दक्षिण राज्य,मध्य व पश्चिमी राज्यात दिसून येते.देशाच्या इतिहासात कापसाच्या बदल्यात सोन्याची तुलना करणारा काळ आजोबा,बाबा यांनी पहिला अनुभवला. त्या कापसाच्या गाठी इंग्रजांनी इंग्लंडला वाहून नेल्यात.त्यावर सूत गिरण्यात प्रक्रिया करून तलम आणि आकर्षक कपडे तयार केल्या गेले.कापूस उत्पादनामुळे लबालब असणारे गावचे गाव तिथले शेतकरी,जमीनदार,कामगार,कारागीर,मोलमजूर गुण्यागोविंदाने राहत होते.ग्रामीण अर्थव्यवस्था व सामाजिक व्यवस्था भक्कम मजबूत होती.कारण शेतावरच्या मजुरापासून गावातील कुटीर व हस्तकला उद्योग सहकारी भावनेतून बंधूभावाने चालत होते.त्यामुळे ग्रामीण भारताचे चित्र अगदी आनंदाच्या टक्केवारीत अग्रणी होते.कारण त्यांचा उद्देश अल्पसंतोषीपणा म्हणजे 'थोड्यातगोडी,अधिकात लबाडी' या तोडीचा होता.

स्वातंत्र्याच्या चळवळीत ग्रामीण जनतेचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे पुरावे विदर्भातील शाहिद गावांच्या संख्येवरून तर गुजरातचे बारडोली,बिहारचे चंपारण्य तर दक्षिणेतील नक्षल अशा ग्रामीण भागाचा इतिहास साक्षीदार आहे.कापूस,ऊस, निळ आणि मसाल्याचे पदार्थ भारतीय व्यापारी निर्यातीचे पीक हे इतिहासात पुरावेदार म्हणून आपण तपासू शकतो.कापसाची उत्पत्ती विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील कळंब या ठिकाणी झाल्याचे विकिपीडिया सांगू शकते.तर कापसाच्या गिरणीचा भोंगा अनुभवणारे कामगार याच मराठी मातीचे माणसे सदनिकेत, चाळीत राहून उभी झाली.ह्याचे पुरावे मुंबई,इचलकरंजी,अचलपूर,नागपूर अशा अनेक ठिकाणी असलेल्या गिरणीकामगराच्या वस्त्याचे दाखले देता येईल.

वाशिम जिल्ह्यात लाड कारंज्याचा इतिहास कापसाची पेठ म्हणून सावकारी करणारा तालुका म्हणून होती.त्या वैभवाची झालेल्या धूळधाणीला कारण कोण? ह्यावर विचार केला गेला पाहिजे असे आता वाटते.तेव्हा विचार करत असताना एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे स्वातंत्र्य नंतरचे राजकीय धोरण!

'भारत ग्रामीण वस्तीचा देश आहे' प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी ह्या विधानाचे उद्घोषण केल्यानंतर ग्रामीण भारताचे चित्र नजरेसमोर ठेवून भारताच्या विकासाची पायाभरणी केली.जलसिंचनातून शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी धरणे,शेतमालाच्या प्रक्रियेसाठी उद्योग.त्यासाठी वीज निर्मिती,प्रक्रिया मालासाठी बाजारपेठ म्हणजे परिवहन आणि दळणवळण व त्यासाठी रस्ते,म्हणून जडउद्योग टाटा,बिर्ला बजाज यांची मोटर गाड्या कारखाने अशी एक एक देशव्यापी कामकाज सुरू असताना किमान चौदा वर्षात देशभरात असंख्य उद्योग उभे करीत नेहरू १९६४ मध्ये अचानक देश सोडून गेले.

त्यानंतरचे काम नेहरू कन्या इंदिरा यांनी केले.स्वातंत्र्यानंतरचा देश भूक आधी नंतर विकास या स्थरावर असताना, शेतजमिनीला हरित क्रांतीने नवजीवन दिले.स्वामिनाथन यांनी हरित क्रांती,श्वेत क्रांती सोबत शत्रू राष्ट्राला नमवण्यासाठी पोखरणची परमाणु चाचणी अशा ऐतिहासिक नोंदी इतिहास मिटवू शकत नाही.प्रियदर्शनीचे सरकार आणीबाणीने बदलले.तिची हत्या झाली.तरी सुद्धा देशाच्या परिस्थितीत तसूभर अडचण येऊ नये म्हणून राजकुमाराचे जीवन जगणारे राजीव गांधी यांनी देशाची कमान सांभाळून आधुनिक जगात भारताची ओळख करून दिली.त्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विकसित करताना संगणक युगाचा उदय झाला.

त्यावेळी साता समुद्रापलीकडे जाऊ नये अशी संस्कृती जपणारी जमात संगणक युगाला विरोध करीत होती. आता त्याच तंत्रज्ञानाच्या भरवशावर विदेशी सेवांचा लाभ घेऊन फॉरेन टूर करणारे पालक आज ही हयात आहे. देशाने १९९३ मध्ये गॅट करार स्वीकारून आंतरराष्ट्रीय स्तरावर कृषी,सेवा तथा व्यापार क्षेत्रात पदार्पण केले.अशा सर्व घडामोडी गेल्या तीन पिढ्या घडल्या आणि सलग एकविसाव्या शतकाला सुरुवात झाल्यानंतर राजकीय घडामोडीला 'भ्रष्टाचार'शीर्षकाने फेरबदल करण्याचे प्रकार सुरू झाले.

सन २००५मध्ये माहितीचा अधिकार देशस्थ नागरिकांना डॉ. मनमोहनसिंग प्रधानमंत्री असताना लागू केला.त्याच नेतृत्व गांधी टोपीतील धोतरधारी महाराष्ट्रातील समाजसेवकाने केले.पुढे भ्रष्टाचार आंदोलनात लोकपाल राष्ट्रपतीचे समक्ष पद निर्मितीचे खूळ डोक्यात भरून प्रशासकीय व्यवस्थेची अदृश्य टीम निर्माण करण्याची तयारी सुरू झाली.त्याचा रेटा आपल्या पदरी पाडून दिल्ली मध्ये 'आप' ले सरकार दिले.

डॉ.मनमोहन सिंग प्रधानमंत्री असताना काँग्रेसचे भूमी सुधार धोरण हे शेतीचे सिलिंग आहे अशी अफवा पसरवून भू-सुधारणा अधिसूचना विरोधी आंदोलन झाले आणि २०१४ मध्ये काँग्रेसचे सरकार पडल्या गेले.आता गेल्या बारा वर्षाचा आढावा घेतला असताना 'अच्छे दिन'चे दीनदयाल दिवस आल्याचे पेट्रोल पंपवर होणारे भांडणे,इंधन वायूचे परिणाम व त्यामुळे देशात जागतिक युद्धाचे निमित्ताने सुरू असलेले राजकारण, पिढ्यांना बरबाद करणारे पेपरफुटीसारखे प्रकार समोर येत असताना; सर्वोच्च न्यायालयातून बेरोजगारांना 'झुरळ' असा उपहासात्मक शब्द आणि त्यावरून समाज माध्यमाद्वारे उठणारे झुरळी वादळ, या घटनांनी गेल्या तेरा वर्षापासून मूकनायक असलेले अण्णा! आता कबूल करतात की मोदीने सर्वांना फसवले.

ही बातमी वाचली आणि लगेच डोक्यात विचार आला. धोतरात झुरळ शिरले.झुरळ जनता पार्टीने सोशल मिडियावर घातलेला गराडा अचानक अण्णा हजारे यांनी मोबाईलवर पाहून मोदीने सर्वांना फसवले अशी आरोळी (केविलवाण्या आवाजात) फोडली. कारण समाज माध्यमावर झुरळं खूप फिरत असताना त्या ते 'आप' ले समर्थन करणारे पिल्लू आहे असा तपास लागला.

त्यामुळे अण्णाने धोतर झटकून झुरळ निघते की काय असा अंदाज घेतला आणि मोदीने सर्वांनाच फसवले असे हातवर करून कबुली दिली.त्यामुळे अण्णा कुठल्या मुद्याकडे 'आप' ले लक्ष वळवण्याचा प्रयत्न करतात हे झुरळाची भुरळ पडलेल्या सद्सदविवेक असलेल्या माझ्या युवा पिढीतील मतदारांनी ओळखले पाहिजे.

ज्या देशाचा इतिहास ज्या पक्ष संघटनेने घडवला, त्या पक्षाचे ध्येय,धोरण,बलिदान आणि देशव्यापी दृष्टी तपासली पाहिजे.विश्वगुरूच्या शर्यतीत धावणारे वैशाखनंदन पंचांननाचा पोशाख परिधान करून फसले. त्याला धोतरात झुरळ गेलेला आता बोंबाबोंब करून सांगत असेल तर नक्कीच अभ्यासक इशारा समजून जातील.कापसाचा देश फक्त मिनिस्टर खादी आणि अण्णा सारखे समाज सेवक खादीचे धोतर घालून अनुदान,मानधन,निवृत्ती वेतन यावर डल्ला मारून युवा पिढीचे आयुष्यपणाला लावून बसले.

धोतरात झुरळ शिरले काय आणि न्यायालयात बरगळले काय तरी झुरळ कचरा आणि अडगळीतच राहणार.सध्या ते धोतरात झुरळ जाणवल्याने जागे झाले असले तरी...



**डॉ.प्रवीणकुमार राऊत**
मो.७७९८६४५५६५

## अपात्र लाभार्थ्यांनी लाटले तब्बल २६ हजार कोटी

लाडकी बहीण योजना विधानसभेच्या निवडणुकी अगोदर घोषित झाली. त्यावेळी अनेक महिलांनी अर्ज केले.ज्या अटी सरकारने ठरविल्या होत्या त्याप्रमाणे ही योजना सुरु झाली. विशेष म्हणजे स्वघोषणापत्राच्या आधारे हे अर्ज स्वीकारले गेले.त्याचा फायदा अनेकांनी घेतला.विशेष म्हणजे ही योजना केवळ लाडक्या बहिणीसाठीच होती. पण त्याचा फायदा तब्बल चौदा हजार पुरुषांनी घेतला अनेक सरकारी नोकरीतील लाभार्थी या योजनेचा फायदा घेऊन गेले. या योजनेसाठी उत्पन्नाची अट अडीच लाख एवढी होती. तथापि या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांनी या योजनेचा फायदा गेले सुमारे २२ महिने घेतला अशांची संख्या दहा लाख एवढी प्रचंड आहे. एका बातमीनुसार ५ लाख सरकारी कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे गेल्या बावीस महिन्यात राज्य सरकारचे तब्बल २६ हजार ७३० कोटी रुपये लाटले आहेत. अपात्र महिलांकडून रक्कम वसूल न करण्याची भूमिका सरकारने घेतली आहे हे सारे पैसे सरकारचे म्हणजे जनतेचे आहेत जे जनतेकडून वसूल करण्यात आले आहेत. केवळ मते जातील या भावनेतून परत वसूल न करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे तो कितपत योग्य आहे.अनेक पुरुषांनी याचा लाभ कसा घेतला. हे सारे प्रश्न सामान्य जनतेला पडले आहेत.कारण सरकारला लोकांच्या कडून कराद्वारे पैसा जमा होतो एखाद्या योजनेची सरकारी पातळीवर कशी वाटचाल होते हे लाडकी बहीण या योजनेद्वारे दिसून आले आहे.

शांताराम वाघ

जनमाध्यम संवाद

## इंडिया आघाडीच्या बैठकीकडे लक्ष

राजधानी दिल्ली येथे ८ जून रोजी इंडिया आघाडीची महत्त्वाची बैठक होणार असून प्रामुख्याने महागाई आणि बेरोजगारी यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा होणार आहे.तसेच विधानसभा निवडणुकीतील नुकत्याच झालेल्या पराभवांच्या आणि भाजपच्या वाढत्या ताकदीच्या पार्श्वभूमीवर विरोधी नेते आता आपले मतभेद बाजूला ठेवून 'लोकशाही वाचवण्यासाठी' एकत्र येण्याची तयारी करत आहेत.नीट परीक्षा,मतदार संघपुनर्रचना, निवडणुकांपूर्वी मतदार याद्यांची विशेष सखोल पूनर्तपासणी,निवडणूक आयोगाच्या भूमिकेबाबत आवाज उठविणे, एक राष्ट्र एक निवडणूक, प्रस्ताव आणि वक्फ कायदा, यासारख्या प्रश्नांवर चर्चा तसेच पुढील राजकीय रणनीती आखली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.इंडिया आघाडीपासून सावध भुमिका घेणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांच्यासह ओमर अब्दुल्ला, हेमंत सोरेन, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, उद्धव ठाकरे हे देखील उपस्थित राहणार असल्याचे राजकीय गोटातून बोलले जात आहे. या बैठकीला जवळपास १७ विरोधी पक्ष सहभागी होण्याचा अंदाज बांधला जात आहे. त्यामुळे या बैठकीला महत्व प्राप्त झाले आहे.

राजू जाधव

**सत्ताधिशांचे अमरत्वाचे प्रेम हे निस्वार्थी वा जनसेवेप्रती निष्ठा असणा-या बोधीसत्व संकल्पनेसारखे नसून ते निव्वळ सत्तेवर राहण्यासाठी मृत्यू अडसर बनू नये यासाठी आहे.**

## सत्तेच्या अमरत्वाची तृष्णा



जागतिक मानवी इतिहास पाहीला तर असे दिसते की, मानवाला अमरत्वाची ओढ आहे. कारण त्याला मृत्यूचे भय आहे. खास करून जे जे खलपुरूष इतिहासात होऊन गेले त्यांनी अमर होण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. कारण एखाद्या सत्ताधिशाने हस्तगत केली की, त्याने आपल्या सत्तेच्या नि सामर्थ्याच्या बळावर स्वत:ला अमर होण्याचे स्वप्न पाहीले आहे. कारण सत्ता हस्तगत करताना त्याने जी कांही हिंसा केली असेल तशी हिंसा आपण सत्तेतून पायउतार झाल्यावर आपल्याबाबत होऊन आपला मृत्यू क्लेशदायक होईल, अशी भीती त्याला असते.

रशियातून नुकतीच एक बातमी आली आहे की, रशियन राष्ट्राध्यक्ष ब्लादीमीर पुतीन यांनी सुमारे २.१५ लाख कोटी रूपयांचा स्वत:च्या अमरत्वासाठीचा गुप्त प्रकल्प हाती घेतला आहे. सध्या पुतीन हे ७३ वर्षाचे असून या प्रकल्पाच्या माध्यमातून सध्याच्या प्रयत्नातून त्यांना एकूण १२० वर्षाचे आयुष्य मिळवायचे आहे. यासाठी त्यांनी वय रोखण्यासाठी जीन थेरपी ट्रीटमेण्ट सुरू केली असून त्याचाच भाग म्हणून मध्यंतरी त्यांनी उणे ११२ डिग्री तापमानाच्या अतिथंड पाण्यात निर्वस्त्र उभे राहण्याचा प्रयोग केला होता!

हा प्रयोग यशस्वी होऊन पुतीन यांनी १२० वर्ष पुर्ण केली तर ते १२० व्या वर्षीही राष्ट्राध्यक्ष असतील आणि १२० व्या वर्षी कदाचित पुढील अमरत्वाचा प्रयोगही यशस्वी करतील!पुतीन यांचा हा स्वप्नवत असा प्रकल्प पुर्ण करण्याची जबाबदारी त्यांची डॉक्टर मुलगी मारीया वोरोत्सोवा हीच्या देखरेखी खाली चालू आहे. याशिवाय डॉ. मिखाईल कोवलचुक हे संशोधक येत्या तीन चार वर्षात म्हणजे २०३० पर्यंत नवीन अवयव तयार करून ते नवीन अवयव पुतीन यांच्या शरीरात प्रत्यारोपित करून जूने अवयव बदलण्यात येतील. शिवाय क्रायोथेरपी तंत्रज्ञान वापरून रक्त गोठवणे व डुकराच्या प्रजातीपासून नवीन अवयव निर्माण करणे हे देखील या प्रकल्पात अंतर्भूत आहे.

पुतीन हे कधी पंतप्रधान म्हणून तर कधी राष्ट्राध्यक्ष म्हणून १९९९ पासून रशियाचे सत्ताधिश आहेत. म्हणजे गेली २६ वर्ष सत्तेत आहेत आणि १२० वर्ष जगणार म्हटल्यावर अजून ४७ वर्ष ते सत्तेत राहण्यासाठी प्रयत्न करत आहेत. सर्वच अचाट नि अफाट आहे.पुतीन यांनी गेली २६ सर्व सत्तेत राहण्यासाठी काय काय केले हा या लेखाचा विषय नाही. पण त्यांनी जे कांही केलं आहे, त्याची स्मृती आणि कृत्यांची स्वप्ने त्यांच्या वर्तमानाला अस्वस्थ करत असावीत म्हणून त्यांनी हा स्वप्नवत प्रकल्प हाती घेतला असावा.

जगाच्या ईतिहासात अलेक्झांडर हा जेंव्हा मॅसीडोनियाचा राजा झाल्यावर त्याने अमर होण्यासाठी खूप प्रयत्न केले होते म्हणतात. प्राचीन इजिप्शियन राजे देखील अमरत्वाच्या आशेने एवढे झपाटलेले होते की, ते मृत्यूला मृत्यू न म्हणता दुस-या विश्वात जाण्याचा मार्ग म्हणून स्वत: सोबत दासदासींना ठार मारून आपल्या कबरीत गाडत होते. आपण अमर होऊ या आशेने चीनी सम्राट चिंग शी व्हांग ने मातीचे ८००० सैन्य निर्माण करून आपल्या कबरीत २००० वर्षापुर्वी उभारले होते. अमर होण्याची भुरळ जवळपास सर्वच क्रुर राजांना होती हेच यातून दिसते.

हॉलीवुडमधे 'इंडियाना जोन्स' असो वा 'द ममी' सारख्या सिनेमांची कथा अमरत्वाचे वरदान मिळविण्यासाठी केलेल्या मानवी प्रयत्नांचे दर्शन आहे. भारतीय प्राचीन पुराणे तर अशा कथागाथांनी भरलेली आहेत. महिषासुर, हिरण्यकशिपू, रावण, जरासंध, दुर्योधन आणि अशा कित्येक क्रुर शासकांनी अमरत्वाचे वरदान मिळवले होते म्हणतात पण देवांनी अनेक खटपटी करून त्या दैत्यांना मारले अशी लोकांची श्रद्धा आहे.सत्ताधिशांचे मृत्यूचे भय हे त्यांना अमरत्वाची भुरळ पाडणारे आहे. कारण सत्ताविहीन जगणे ज्यांना कठिण असते वा ज्यांच्या सत्ताप्राप्तीचा उद्देश द्वेषशमन नि सुड असतो असे सत्ताधिश सत्ता सोडू ईच्छित नाहीतच नव्हेतर सत्तेवर राहण्यासाठी अमरत्वाचा कंठा गळ्यात घालून आपल्या जीवनाबरोबर आपल्या सत्तेच्या सिंहासनालाही अमरत्व प्राप्त करण्यासाठी धडपडतात.

भारतात मर्यादा पुरोषत्तम प्रभु श्रीराम वा योगेश्वर श्रीकृष्ण यांनी कधीही अमरत्व मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. श्रीराम शरयूत अंतर्धान पावले तर श्रीकृष्ण यांच्या पायाला बाण लागल्यामुळे त्यांचे कार्य समाप्त झाले. ज्या दोन महापुरूषांना भारतीय समाज दैवत मानतो त्यांनाही अमरत्वाची आस नव्हती हे विशेष!

भारतीय तत्वज्ञानात भगवान गौतम बुद्ध यांनी मानवी जीवनाच्या मर्त्यतेचे तत्व सांगून मानवी जीवनाची महानता सांगीतली. याबद्दल अनेक जातककथा आहेत, आणि बुद्ध हे ऐतिहासिक व्यक्तीमत्व आहे म्हणून त्यांच्या विचारांचे महत्व अधिक आहे.भारतात अनेक लेखकांनी भारतीय तत्वचिंतनातील अमरत्व ही संकल्पना अभिलाषा वा तृष्णा स्वरूपात मांडली. ययाती ही कादंबरी अमरत्व नि तारूण्य याची मानवी मनातील अभिलाषा स्पष्ट करताना त्याला वैगुण्य या अर्थाने पाहते. पण अमरत्वाचे गौरवीकरण करत नाही. अमरत्वाला भारतीयांनी चिरंजीवत्व असे नांव देऊन अश्वत्थामा या महाभारतातील पात्राने अमरत्वाला शाप या स्वरूपात मांडले आहे. जी.ए.कुलकर्णी यांची भेट ही कथा अमरत्वाला शाप ठरवून मानवी प्रबोधन करते.

सत्ताधिशांचे अमरत्वाचे प्रेम हे निस्वार्थी वा जनसेवेप्रती निष्ठा असणा-या बोधीसत्व संकल्पनेसारखे नसून ते निव्वळ सत्तेवर राहण्यासाठी मृत्यू अडसर बनू नये यासाठी आहे. कारण राम, कृष्ण यांच्याप्रमाणेच महावीर, बुद्ध यांनीही अमरत्वासाठी प्रयत्न केलेले नाहीत. कारण ते राजपुत्र असूनही ते सत्ता त्यागून महान बनले होते, त्यांच्या महानतेत सत्तेचे दासत्व नव्हते.

पुतीन या अमरत्वाच्या प्रकल्पामुळे रशियन इतिहासातील रासपुतीन या अशाच एका व्यक्तीमत्वाची आठवण करून देणारा आहे. रासपुतीन हा स्त्रीलंपट, व्यभिचारी, अनितीमान असा होता. आज तो असता तर त्याचे नांव एपस्टिन फाईल्स मधेच शोभून दिसले असते. पण तो तसा थेट सत्ताधिश नव्हता पण राजा निकोलस झार नि राणी अलेक्झांड्रा यांचे आधारे तोच रशियाचा सर्वसत्ताधिश बनला होता. विविध रोग बरे करून, प्रदिर्घ तारूण्य नि बलशाली दिर्घाआयुष्य देण्याची स्वप्ने दाखवत त्याने झारशाही ताब्यात घेतली होती. स्वत:ला दैवी समजणा-सा या रासपुतीनचा मृत्यू २९ डिसेंबर १९१६ रोजी बंदुकीच्या गोळ्या खाऊन झाला.

आज अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप, चीन मधे शी जींनपींग, कोरीयात किम जोंग, ईस्त्राईलमधे नेतन्याहू भारतात नरेंद्र मोदी सत्तेत आहेत आणि आणखी असे अनेक देश आहेत, ज्यात त्यांचे सत्ताधिश अनेक वर्ष सत्तेत आहे कारण आपपल्या देशात सत्तेत राहण्यात ते यशस्वी झालेले आहेत. ते कसे यशस्वी झालेत हा या लेखाचा विषय नाही पण प्रत्येकाला सत्ता गेल्यावर आपले काय होईल ही भीती आहे. मोदींनी स्वत:ला नॉन बायोलॉजीकल असल्याचा केलेला दावा नि मोदी भक्तांनी त्यांना दिलेली ईश्वरी अवताराची उपमा या परीप्रेक्ष्यात पाहता येईल काय? याचे उत्तर अजून तरी समोर येत नाही. मोदीजींची मजल आजवरच्या माहीतीनुसार केवळ मश्रुम सेवन करण्यापर्यंतच आहे हे विशेष कौतुकास्पद आहे.

**राज कुलकर्णी**

शनिवार, दि. ६ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# चार चिमुकल्यांच्या हत्येचा अखेर न्याय..!

## चार बालहत्या-बलात्कार प्रकरणात आरोपीला फाशी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ : जळगाव जिल्ह्यातील रावेर येथील चार अल्पवयीन बालकांच्या निर्घृण हत्याकांड व बलात्कार प्रकरणात न्यायालयाने आरोपी महेंद्र सीताराम बरेला याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावत ऐतिहासिक निर्णय दिला आहे. या निकालामागे तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा सध्याचे यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी केलेल्या अत्यंत काटेकोर आणि वैज्ञानिक तपासाची निर्णायक भूमिका ठरली.**



ऑक्टोबर २०२० मध्ये रावेर तालुक्यातील शेतातील घरात दोन मुली व दोन मुलांचे मृतदेह आढळून आले होते. तपासादरम्यान १३ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याचे उघड झाले. घटनास्थळी कोणताही ठोस पुरावा नसतानाही तपास अधिकारी कुमार चिंता यांनी पारंपरिक आणि तांत्रिक तपासपद्धतींचा प्रभावी वापर केला. 'लास्ट सीन थिअरी', साक्षीदारांचे जबाब, आरोपीच्या संशयास्पद हालचाली तसेच न्यायवैज्ञानिक पुराव्यांची अभेद्य साखळी उभी करून त्यांनी आरोपीचा थेट सहभाग न्यायालयात सिद्ध केला. वैज्ञानिक पुरावे, वैद्यकीय अहवाल आणि घटनास्थळावरील तपासाच्या आधारे आरोपीविरुद्ध भक्कम आरोपपत्र सादर करण्यात आले. सुमारे सहा वर्षे चाललेल्या सुनावणीनंतर भुसावळ येथील विशेष न्यायालयाने हा गुन्हा "दुर्मीळातील दुर्मीळ" (Rarest of Rare) स्वरूपाचा असल्याचे नमूद करत आरोपीला भादंवि कलम ३०२ अंतर्गत फाशीची शिक्षा सुनावली. तसेच पोक्सो व इतर गंभीर कलमांखाली जन्मठेपेची शिक्षाही ठोठावण्यात आली.

या उल्लेखनीय तपासाची दखल घेत सदानंद दाते यांनीही व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीत कुमार चिंता यांचे विशेष अभिनंदन केले. हा निकाल यवतमाळ पोलीस दलासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

# पर्यावरण वाचवायचे असेल तर जीवनशैली बदलावी लागेल

## पुसदमध्ये सायकल-ई-बाईक रॅलीतून जनजागृती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ५ :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पुसद येथील विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी पर्यावरण जनजागृतीसाठी सायकल व ई-बाईक प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. वाढते प्रदूषण, बिघडत चाललेले पर्यावरणीय संतुलन आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याची गरज असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात गीताई केंद्र येथे झाली. यावेळी उपविभागीय अधिकारी आशिष बिजवे यांचे विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी वृक्ष भेट देऊन स्वागत केले. माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष गजानन जाधव, पंकज पाल महाराज, मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रमेश डंबोळे, वसुंधरा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अमोल गंगात्रे, ज्ञानदीप अकॅडमीचे कौस्तुभ धुमाळे, नाम फाउंडेशनचे अध्यक्ष स्वप्नील देशमुख, डॉ. संजय अग्रवाल, अजय क्षीरसागर, शांतिसागर इंगोले यांच्यासह अनेक निसर्गप्रेमी उपस्थित होते.मार्गदर्शन करताना आशिष बिजवे यांनी शासनाच्या विविध पर्यावरणपूरक योजनांची माहिती दिली. तसेच पुसद तालुका जलसंधारणाच्या बाबतीत मागे असल्याबद्दल खंत व्यक्त करत जलस्रोत संवर्धनासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. गीताई केंद्र येथून सुरू झालेली प्रभात फेरी छत्रपती शिवाजी महाराज चौक, नेताजी सुभाषचंद्र चौक, कापड लाईन, महात्मा गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे स्व. वसंतराव नाईक चौक येथे पोहोचली. येथे डॉ. संजय अग्रवाल यांनी प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे मानवी आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांविषयी माहिती दिली. समारोपस्थळी सप्तखंजिरी वादक पंकज पाल महाराज यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व सोप्या व प्रभावी शैलीत पटवून दिले. "मंदिरे आणि देव जितके आवश्यक आहेत, तितकीच झाडेही आवश्यक आहेत," असे सांगत त्यांनी वृक्षारोपणाचा संदेश दिला. समारोपीय भाषणात मोक्षधाम व पुसद गार्डन क्लबचे अध्यक्ष दीपक आसेगावकर यांनी पर्यावरणपूरक दहन प्रक्रियेची माहिती दिली. तसेच पुढील वर्षी पुसनदी स्वच्छता अभियान राबविण्यासाठी सर्व सामाजिक संघटनांनी एकत्र येण्याचे आवाहन केले.यावेळी मिशन ग्रीनच्या पर्यावरण संवर्धन कार्याची दखल घेत निसर्ग संवादचे गजानन वायकुळे आणि राजीव कांडलकर यांनी संस्थेला ११ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. कार्यक्रमाच्या समारोपानंतर माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनतर्फे सहभागींसाठी फराळाची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमात मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था, माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, वसुंधरा बहुउद्देशीय संस्था, रुग्णमित्र फाउंडेशन, ज्ञानदीप अकॅडमी, नाम फाउंडेशन, रोटरी क्लब, लॉयन्स क्लब, डॉक्टर असोसिएशन, वंदे मातरम् सायकल ग्रुप, पतंजली योग समिती, निसर्ग संवाद, पुस सेवा फाउंडेशन आणि गीताई केंद्र यांच्यासह अनेक सामाजिक संघटनांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# शिवसेनेकडून निराधार व वृद्धापकाळ योजनांसाठी मोफत प्रस्ताव..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. ५ :** शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपशहर प्रमुख सुनील क्षिरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त राळेगाव येथे सामाजिक बांधिलकी जपत पात्र लाभार्थ्यांसाठी विविध शासकीय योजनांचे मोफत प्रस्ताव तयार करून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला.



शिवसेना शहर प्रमुख शंकर गायधने व तालुका प्रमुख विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव विनामूल्य तयार करण्यात आले. तसेच नवीन शिधापत्रिका धारकांना अन्न सुरक्षा योजना व प्राधान्य गटांतर्गत धान्याचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. शिवसेनेच्या वतीने लाभार्थ्यांचे प्रस्ताव तहसील कार्यालयाकडून मंजूर होईपर्यंत पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या उपक्रमांतर्गत अनेक ज्येष्ठ नागरिक व निराधार लाभार्थ्यांचे अर्ज तयार करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका संघटक प्रशांत वाघेकर, शहर संघटक योगेश मलोंढे, श्रीकांत कोदाणे, महिला आघाडीच्या पार्वता मुखरे यांच्यासह वैभव दुधे, सुधाकर शिखरे, हिमांशू कोहळे, शंतनू सहारे, राजू किन्हेकार, सुनील कुबडे, दीपक केवटे व रोहित वर्मा यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले असून अनेक गरजू लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

# 'एक पेड माँ के नाम' अभियानाला प्रतिसाद..!

## मंत्री उईके यांच्या हस्ते वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** वाढत्या तापमानवाढीच्या आणि पर्यावरणीय संकटांच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड ही केवळ मोहीम नसून काळाची गरज बनली आहे, असा ठाम संदेश जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमातून देण्यात आला. मेरा युवा भारतच्या पुढाकारातून राणा प्रताप नगर येथील शिवमंदिर परिसरात झालेल्या कार्यक्रमात आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



यावेळी बोलताना मंत्री उईके यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि तापमानवाढीच्या समस्यांवर वृक्षलागवड हा प्रभावी उपाय असल्याचे त्यांनी नमूद केले.'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत उपस्थितांनी वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला. या उपक्रमाला युवक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रफुल चव्हाण, नगरसेवक बाळासाहेब काळे, कीर्ती राऊत, मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सुरज शिंदे, अनिल ढेंगे, साई इंग्लिश लर्नर ॲकॅडमीचे अमित ढोणे, प्राची ढोणे, तुळजाई बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे आकाश धुरट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मेरा युवा भारत, यवतमाळ कार्यालयाचे अनिल ढेंगे व जिल्हा युवा अधिकारी सुरज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच साई इंग्लिश लर्नर ॲकॅडमीच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमासाठी रवि शेळके व मनीष आडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## थोडक्यात

### वादळानंतर पांढरकवडा पुन्हा उजळला..!

**महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा नगरपरिषदेत जाहीर सत्कार**

**पांढरकवडा :** ३० मे रोजी आलेल्या भीषण वादळामुळे विस्कळीत



झालेला पांढरकवडा तालुक्यातील वीजपुरवठा अवघ्या दोन ते तीन दिवसांत पूर्ववत करून महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यांच्या या अहोरात्र परिश्रमाची दखल घेत पांढरकवडा नगरपरिषदेतर्फे नगराध्यक्ष आतिश बोरेले यांच्या हस्ते महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.
वादळामुळे शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी वीज खांब उन्मळून पडले होते. तसेच मुख्य वीजवाहिन्यांवर मोठमोठी झाडे कोसळल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाला होता. नुकसानीची तीव्रता लक्षात घेऊन महावितरणने तातडीने पाच विशेष पथके कार्यरत केली. रविवार रात्रीपासून सुरू झालेल्या दुरुस्ती मोहिमेत कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर काम करून मंगळवारी संध्याकाळपर्यंत वीजपुरवठा सुरळीत केला. या मोहिमे दरम्यान उपकार्यकारी अभियंता संजय बोबडे व सहाय्यक अभियंता प्रीती महाडोळे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून कामाचे नेतृत्व केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही उत्कृष्ट कामगिरी केली. यावेळी नगराध्यक्ष आतिश बोरेले यांनी महावितरणच्या तत्परतेचे कौतुक करत संकटकाळात नागरिकांना दिलासा दिल्याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. सत्कारामुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



### पर्यावरणाचा संदेश सह चित्रपटाचे प्रमोशन..!

**'आऊट ऑफ सिलॅबस' साठी वृक्षारोपणाचा अनोखा प्रयोग**

**यवतमाळ :** चित्रपटाच्या प्रचाराला सामाजिक बांधिलकीची जोड देत 'आऊट ऑफ सिलॅबस' या आगामी मराठी चित्रपटाच्या प्रमोशनसाठी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त यवतमाळ येथे वृक्षारोपणाचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. 'दैनिक अजिंक्य भारत' समूहाच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात यवतमाळ अर्बन बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांच्या हस्ते वृक्षलागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाचे शहरात कौतुक होत आहे. यावेळी राजेश चक्रनारायण, भारत टोबरे,अजिंक्य भारत चे जिल्हा आवृत्ती प्रमुख राजकुमार भितकर, 'प्रयासवन' संस्थेचे महेंद्र गुल्हाणे तसेच व्यवस्थापक जयंत राठोड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षारोपणासोबतच रोपांच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प केला. यावेळी बोलताना डॉ. नितीन खर्चे यांनी 'आऊट ऑफ सिलॅबस' चित्रपटाला शुभेच्छा देत नागरिकांना चित्रपट पाहण्याचे आवाहन केले. पर्यावरण हा आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. या विषयावर भाष्य करणारा 'आऊट ऑफ सिलॅबस' हा चित्रपट ३ जुलै रोजी प्रदर्शित होत असून प्रत्येकाने तो पाहून त्यातील संदेश आचरणात आणावा, असे त्यांनी सांगितले.

# केळापूरच्या ३१ ग्रामपंचायतींचे राजकीय चित्र १२ जूनला स्पष्ट..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष



**पांढरकवडा, दि. ५ :** आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केळापूर तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतींच्या सदस्य पदांसाठी आरक्षण निश्चितीची प्रक्रिया सुरू झाली असून, येत्या १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता विशेष ग्रामसभांमध्ये आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

या सोडतीनंतर अनेक इच्छुकांचे राजकीय भवितव्य आणि निवडणुकीची समीकरणे स्पष्ट होणार असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष या प्रक्रियेकडे लागले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पांढरकवडा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील एकूण ३१ ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) तसेच संबंधित प्रवर्गांतील महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे.यासाठी संबंधित सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले असून, प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पारदर्शक पद्धतीने आरक्षण सोडतीची प्रक्रिया पार पडणार आहे. आरक्षण निश्चितीनंतर अनेक ठिकाणी संभाव्य उमेदवारांचे गणित बदलण्याची शक्यता असून, स्थानिक राजकारणाला नवी दिशा मिळणार असल्याची चर्चा सुरू आहे.प्रशासनाने नागरिक, मतदार आणि इच्छुक उमेदवारांना ग्रामसभेत उपस्थित राहून प्रक्रियेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांसाठी आरक्षण सोडत हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, त्यानंतर निवडणुकीच्या हालचालींना वेग येणार आहे. सदर माहिती तहसीलदार राजेंद्र इंगळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# यवतमाळ हादरले! मित्रांच्या टोळीने घरात घुसून केली युवकाची निर्घृण हत्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** शहरातील जामनकर नगर परिसर गुरुवारी दुपारी झालेल्या एका थरारक हत्याकांडाने हादरून गेला. घरात एकट्या असलेल्या ३० वर्षीय युवकावर धारदार शस्त्रांनी सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.



या प्रकरणी तीन संशयितांसह इतर साथीदारांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत युवकाचे नाव तेजस संजय गायकवाड (वय ३०) असे असून तो विदर्भ हाऊसिंग सोसायटी, जामनकर नगर येथे राहत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी तेजसची बहीण रेशमा गायकवाड, त्याची पत्नी रुपाली, वडील आणि मुलगा बाजारात गेले होते. त्यावेळी तेजस घरी एकटाच होता. दुपारी सुमारे १.१५ वाजता कुटुंबीय घरी परतले असता, रोहन इंगळे, प्रणय गुंजाळ आणि हर्षल मेश्राम हे तिघे घरातून घाईघाईने बाहेर पडून मोटार सायकलवरून पसार होताना दिसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घरात प्रवेश केल्यानंतर तेजस रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. त्याच्या मानेवर, डोक्यावर, छातीवर व पोटावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या गंभीर जखमा होत्या. कुटुंबीयांनी तातडीने त्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. तक्रारीनुसार, घटनेपूर्वी तेजसला एका मोबाईलवरून फोन आला होता. त्यावेळी फोन स्पीकरवर असल्याने आम्ही तुला भेटण्यासाठी येत आहोत असे संभाषण ऐकू आल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतरच ही रक्तरंजित घटना घडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, जुन्या भांडणाच्या कारणावरून हा हल्ला करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच आरोपी व त्यांचे काही साथीदार परिसरात धारदार शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करीत असल्याचाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी रोहन गणेश इंगळे, प्रणय अनिल गुंजाळ, हर्षल विजय मेश्राम यांच्यासह इतर साथीदारांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. पोलीस तपासानंतरच हत्येचे नेमके कारण आणि कटातील इतर सहभागींची भूमिका स्पष्ट होणार आहे.

# यवतमाळ तहसीलचे सर्व्हर ठप्प..! विद्यार्थ्यांचे भविष्य अधांतरी

## 'आदर्श सेतू केंद्र' संकल्पना कागदावरच, दाखल्यांसाठी विद्यार्थ्यांचे हेलपाटे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

**यवतमाळ, दि. ५ :** दहावी-बारावीच्या निकालानंतर महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेला वेग आला असताना यवतमाळ तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्रातील सर्व्हर गेल्या अनेक दिवसांपासून ठप्प असल्याने विद्यार्थी आणि पालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. शासनाच्या डिजिटल व्यवस्थेचा फज्जा उडाल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक असलेले उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला तसेच इतर महत्त्वाची कागदपत्रे वेळेवर मिळत नसल्याने प्रवेश प्रक्रिया रखडत आहे. अनेक विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करूनही त्यांना चार-पाच वेळा सेतू केंद्राचे फेरे मारावे लागत असून, त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, यवतमाळ तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्र गेल्या महिनाभरापासून "सर्व्हर डाऊन" या कारणाखाली नागरिकांना सेवा देण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना दररोज हेलपाटे मारावे लागत असून, सेतू केंद्रातील काही कर्मचाऱ्यांकडून उद्धट व असहकार्याची वागणूक मिळत असल्याची तक्रार विद्यार्थी आणि पालकांकडून केली जात आहे. "सर्व्हर सुरू झाल्यावर या", "माहिती नाही", "नंतर या" अशा उडवाउडवीच्या उत्तरांमुळे नागरिकांचा संताप वाढत आहे. त्यातच केंद्रामध्ये वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्था नसल्याने तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधाही उपलब्ध नसल्याने उन्हात तासन्तास उभे राहण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. दरम्यान, या गंभीर समस्येबाबत सातत्याने तक्रारी होत असतानाही प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच लोकप्रतिनिधींकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप पालक आणि विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. "डिजिटल इंडिया"च्या घोषणा केल्या जात असताना प्रत्यक्षात साधे नेटवर्कही उपलब्ध नसल्याने शासनाच्या डिजिटल व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सेतू केंद्रातील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून नागरिकांना सुरळीत सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा विद्यार्थी व पालकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.एकीकडे शासन "सुलभ प्रशासन" आणि "डिजिटल सेवा"चा दावा करत असताना दुसरीकडे विद्यार्थ्यांना मूलभूत दाखल्यांसाठीही वणवण भटकावे लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे प्रशासन नेमके कधी जागे होणार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी सुरू असलेला हा खेळ कधी थांबणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# महागावचे ठाणेदार धनराज निळे यांची कळंब येथे बदली

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ५ :** महागाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार धनराज निळे यांची कळंब येथे बदली झाल्याने तालुक्यातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला.



गेल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी कर्तव्यदक्ष, संयमी आणि जनसामान्यांशी सुसंवाद राखणारे अधिकारी म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली. निळे यांनी सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि संवेदनशील घटनांच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रभावी भूमिका बजावली. त्यांच्या कार्यकाळात अनेक गुन्ह्यांची उकल झाली असून अवैध धंद्यांविरोधातही त्यांनी कठोर कारवाई केली. त्यामुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींवर मोठ्या प्रमाणात अंकुश बसला. पोलीस अधिकारी-कर्मचारी यांच्यात संघभावना वाढविण्यासोबतच नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या कार्यशैलीमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला. त्यांच्या बदलीमुळे महागाव तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून पुढील सेवाकार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# विदर्भात होणार पाच आधुनिक संत्री प्रक्रिया प्रकल्प

## चार कोटींच्या प्रकल्पांसाठी ५० टक्के शासकीय अनुदान

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील संत्री उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा आणि कृषी प्रक्रिया उद्योगाला गती देणारा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. 'आधुनिक संत्री प्रक्रिया केंद्र उभारणे' या महत्त्वाकांक्षी योजने अंतर्गत नागपूर, अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यांतील पाच विविध ठिकाणच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांच्या प्रस्तावांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने अखेर प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

या मंजुरीमुळे विदर्भातील संत्री उत्पादक पट्ट्यात अत्याधुनिक प्रक्रिया केंद्रांचे जाळे निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने जारी केलेल्या निर्णयानुसार, प्रत्येकी ४ कोटी रुपये खर्चाच्या खालील पाच संस्थांच्या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे, त्यात कृष्णार्पण फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, मोर्शी (जि. अमरावती), कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर, बुलढाणा अर्बन फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, संग्रामपूर (जि. बुलढाणा), कृषी उत्पन्न बाजार समिती, काटोल (जि. नागपूर) आणि कृषी उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर (जि. नागपूर) यांचा समावेश आहे.

मंजूर झालेल्या सर्व प्रकल्पांची किंमत प्रत्येकी ४ कोटी रुपये असून, त्यांच्या उभारणीसाठी शासनाने काही महत्त्वपूर्ण अटी व शर्ती निश्चित केल्या आहेत. या योजनेअंतर्गत प्रकल्प उभारताना संबंधित लाभार्थी संस्थेला पहिल्यांदा स्वतःचा किमान १५ टक्के स्वनिधी खर्च करावा लागेल. उर्वरित ८५ टक्के रक्कम बँकेकडून कर्ज स्वरूपात उभारणे



आवश्यक राहील. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ प्रत्यक्ष पाहणी करून बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देईल. हा दाखला सादर केल्यानंतर शासनाकडून प्रकल्प किमतीच्या कमाल ५० टक्के मर्यादित (जास्तीत जास्त २ कोटी रुपये) अनुदान पणन मंडळामार्फत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल. निविदा प्रक्रियेत जर शासनाने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा कमी किमतीची निविदा मंजूर झाली, तर त्या मंजूर निविदा रकमेच्या ५० टक्केच अनुदान अनुज्ञेय राहील. प्रक्रिया केंद्रासाठी लाभार्थ्यांकडे स्वतःची किंवा किमान ३० वर्षांच्या दीर्घ मुदतीची भाडेतत्त्वावरील जागा असणे बंधनकारक आहे, जी शासनाकडे गहाण राहील.

### पुणे कृषी पणन मंडळ नोडल एजन्सी

या संपूर्ण योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे हे नोडल एजन्सी म्हणून काम पाहत आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यामुळे आता लाभार्थी संस्थांना त्वरित निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नियुक्ती करावी लागणार आहे. चालू आर्थिक वर्ष म्हणजेच सन २०२६-२०२७मध्येच या प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पांचे काम पूर्ण करण्याचे कडक आदेश शासनाने दिले आहेत. तसेच, प्रकल्पाचा दैनंदिन खर्च, वीज-पाणी देयके, देखभाल व मनुष्यबळाचा खर्च संबंधित संस्थांनाच करावा लागणार असून, त्यासाठी शासनाकडून कोणताही अतिरिक्त निधी मिळणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## शहरात डेंग्यू-चिकनगुनियाचा प्रादुर्भाव

**अमरावती-** पावसाळा सुरू होण्याआधीच अमरावती जिल्ह्यात मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियाने डोके वर काढले आहे. मुंबईहून आपआपल्या गावी परतलेल्या मजुरांच्या तपासणीत तब्बल ४२ जण मलेरियाग्रस्त आढळल्याने आरोग्य विभाग अलर्ट झाला आहे.आरोग्य विभागाने जानेवारी ते जूनदरम्यान जिल्ह्याभरात २ लाख ६१ हजार २८६ रक्तजल नमुन्यांची तपासणी केली आहे. यामध्ये मुंबईहून परतलेल्या १५० नागरिकांची सुध्दा वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, त्यात तब्बल ४२ जणांचे मलेरिया अहवाल पॉझिटिव्ह आले. हे सर्वजण मुंबईत नालेसफाई व कचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी गेले होते.दरम्यान, जिल्ह्यात जानेवारीपासून आतापर्यंत ३१७ डेंग्यू संशयीत रुग्णांचे रक्त तपासण्यात आले असता, त्यात ३४ डेंग्यू पॉझिटिव्हआढळून आले आहे. तर ३१३ तपासण्यांमध्ये चिकनगुनियाचे १३ रुग्ण आढळून आले आहेत. पावसाळा अद्याप पूर्णपणे सुरू झालेला नसतानाच या आजारांचे रुग्ण वाढू लागल्याने आरोग्य यंत्रणेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.घराभोवती पाणी साचू न देण्याचे, ताप आल्यास तातडीने तपासणी करून घेण्याचे आणि वैद्यकीय सल्ल्याशिवाय औषधे न घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# शहानूर प्रकल्पाचे पाणी बांधापर्यंत कधी पोहोचणार ?

## कालव्यांवरील कोट्यवधींचा खर्च ठरत आहे व्यर्थ

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तालुक्यासाठी वरदान ठरलेला शहानूर प्रकल्प सध्या शासन आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे चर्चेत आला आहे. प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा असूनही नियोजनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांना त्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, एकीकडे प्रकल्पाच्या कालव्यांच्या दुरुस्तीवर शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असताना, दुसरीकडे प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहोचत



नसल्याने हा सर्व खर्च पाण्यात जात असल्याची संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत.

शहानूर प्रकल्पाच्या कालव्यांवर दरवर्षी देखभालीच्या नावाखाली मोठा निधी खर्च केला जातो. मात्र, अनेक ठिकाणी हे कालवे फुटलेले आहेत, तर कुठे गाळ साचल्याने पाणी पुढे सरकत नाही. प्रशासकीय पातळीवर यावर केवळ वरवरची मलमपट्टी केली जात असल्याचा आरोप होत आहे. प्रकल्पात पाणी शिल्लक नसताना किंवा पाण्याचे नियोजन नसताना कालव्यांच्या सिमेंट सोंडणीवर खर्च करणे म्हणजे सरकारी तिजोरीची लूट असल्याचा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत.

आजच्या काळात सिंचनासाठी 'बंदिस्त पाइपलाइन' हे सर्वात प्रभावी माध्यम मानले जाते. कालव्याद्वारे पाणी सोडल्यास बाष्पीभवन आणि गळतीमुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होतो. याउलट, जर शासनाने कालव्यांवरील खर्च थांबवून तोच निधी पाइपलाइन टाकण्यासाठी वापरला असता, तर आज तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आली असती. पाइपलाइनमुळे शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यालाही शाश्वत पाणी मिळाले असते.जेव्हा प्रकल्पात पाणी नसते, तेव्हा कालव्यांचे काम करून काय साध्य होणार? असा सवाल शेतकऱ्यांनी विचारला आहे. शासनाने जुन्याच पद्धतीवर लाखो-कोटी रुपये खर्च करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पाइपलाइनद्वारे सिंचन सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेतकरी आधीच निसर्गाच्या लहरीपणाने होरपळला आहे. अशात प्रशासकीय अनास्थेमुळे हक्काचे पाणी मिळत नसेल, तर या प्रकल्पाचा उपयोग काय? आता तरी शासन याकडे गांभीर्याने बघून पाइपलाइनच्या मागणीचा विचार करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### फायदा काय?

१)पाण्याची बचत: गळती आणि बाष्पीभवन थांबून ४० ते ५० टक्के पाण्याची बचत होईल.२)शाश्वत सिंचन: शेवटच्या टोकाच्या शेतकऱ्यालाही हक्काचे पाणी मिळेल.३)खर्चात कपात: दरवर्षी कालवे दुरुस्तीवर होणारा अनावश्यक खर्च थांबेल.४)उत्पादनात वाढ: वेळेवर पाणी मिळाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी भर पडेल.

# ब्राम्हणवाडा थडी पोलीसांकडून अवैध रेती वाहतुकीवर कार्यवाई

## ३१ लाखाचा मुददेमाल जप्त

**बेलोरा/वार्ताहर**

५जून २०२६ रोजी सकाळी पोलीस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे पथक पोस्टे हददीमध्ये अवैदय धंदयाचे विरूध्द कार्यवाही करणे करीता पोस्टे हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत असता ग्राम ब्राम्हणवाडा थडी ते ग्राम घाटलाडकी रोडवरील विश्रोळी धरणाच्या कॅनॉल जवळ एक पांढ-या निळया रंगाच्या १२ चाकी टाटा कंपनीचा डंपर मध्ये गौन खनीज कन्हान रेती (वाळु) विनापरवाना अवैधरित्या चोरून घेवुन येत असतांना आढळला. सदर डंपरची पाहणी केली असता, एक पांढ-या निळया रंगाच्या १२ चाकी डंपर कमांक एम एच २७ बि एक्स १२२१ मध्ये विनापास परवाना १० ब्रास गौन खनीज कन्हान रेती (वाळु) किंमत १,००,०००/- रू तसेच डंपर किंमत ३०,००,०००/- रू असा एकुण ३१,००,०००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.



ग्रामीण पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी पोस्टे हददीत वरली जुगार, अवैध दारू विकी, गावठी हातभटटी व अवैध रेती वाहतुक, गौवंश वाहतुक यांचे विरूध्द कठोर कार्यवाही करणे बाबत सर्व ठाणेदार यांना आदेशित केले. पोकों अनुप मानकर यांचे फिर्याद रिपोर्ट वरून ढक चालक निलेश बाबुलाल गाडे वय ३५ वर्ष रा सालेपुरपांढरी ता. अचलपूर जि अमरावती व फरार आरोपी राजु उर्फ शेख नईम शेख करीम वय ३४ वर्ष रा जरूड ता. वरूड जि अमरावती यांचे विरूध्द पोस्टे ब्राम्हणवाडा थडी येथे अप नं २२४/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता २०२३, कलम ९,१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कलम ३,७ सार्वजनिक सपत्ती नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४, कलम १८४ मोटार वाहन अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सादरची कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांचे आदेशान्वये,अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड, अमरावती ग्रामीण, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे, उपविभाग अंजनगाव सुर्जी, पोलीस निरिक्षक किरण वानखडे, स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पो स्टे बांम्हणवाडा थडी येथील ठाणेदार प्रशांत जाधव, पोहेकों राजु मरस्कोल्हे बनं २२८३, पोशि अनुप मानकर बनं २३८२, पोशि अंकुश दाभाडे बनं ६४७ यांनी केली आहे.

# अमरावतीकरांच्या मदतीला डायल ११२ ची चमू

**अमरावती/का.प्र.**

नागरिकांना संकटकाळी तातडीने मदत मिळावी या उद्देशाने अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने डायल ११२ ही सेवा कार्यान्वित केली असून,या प्रणालीने गेल्या वर्षभरात २३ हजार ९४७ कॉलची दखल घेत सर्वच तक्रारींचे प्रभावी निवारण केले आहे. पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी आणि पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाने अवघ्या सात मिनिटांच्या सरासरी वेळात घटनास्थळी पोहोचण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. शहराच्या सुरक्षिततेसाठी ३८ वाहने आणि १०० प्रशिक्षित कर्मचारी रात्रंदिवस तैनात असून, ही यंत्रणा नागरिकांसाठी खऱ्या अर्थाने संकटमोचक ठरत आहे.अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षातून डायल ११२ प्रणालीचे कामकाज चालते.गेल्या काही कालावधीत अनेक लोकांचे प्राण वाचवण्यासह आत्महत्येसारख्या गंभीर घटना रोखण्यात पोलिसांना यश आले आहे. डायल ११२ वर येणाऱ्या प्रत्येक कॉलची दखल घेऊन त्यावर सूक्ष्म नियोजन केले जाते. यामुळेच राज्यभरात अमरावतीचा हा विभाग अव्वल ठरला आहे. मागील वर्षी आलेल्या एकूण २३ हजार ९४७ कॉलपैकी महिला सहाय्यासाठी ६६२१, अपघात प्रसंगात १०३५, आग लागल्यास १२०, मृतदेहाबाबत ८०, प्राणी संबंधित ११९ तर चोरीच्या घटनांसाठी १०१८ कॉल प्राप्त झाले होते. सर्वच कॉलवर पोलिसांनी तत्परतेने प्रतिसाद देत नागरिकांना दिलासा दिला आहे. या सेवेमुळे नागरिकांना चोवीस तास सुरक्षा पुरवण्याचे काम पोलीस विभाग प्रभावीपणे करत आहे. व्हॉईस कॉल किंवा मोबाईल अप्लिकेशनच्या माध्यमातून कोणताही नागरिक या सेवेची मदत घेऊ शकतो. दरम्यान, गेल्या वर्षभरात दोनशेहून अधिक बनावट कॉल आल्यामुळे पोलिसांचा वेळ आणि ऊर्जा वाया गेल्याचेही समोर आले आहे. अश प्रकारच्या आगाऊपणा करणाऱ्यांवर नियमानुसान कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

# मंदिरांच्या हितासाठी जिल्ह्यातील मंदिर विश्वस्त आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे दालनात

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील शेकडो मंदिरांचे विश्वस्त, पदाधिकारी व भक्तगण स्वयंप्रेरणेने उपस्थित राहून देवस्थान संरक्षणासाठी एकजूट दाखविली. विश्वस्तांनी सादर केलेल्या निवेदनाद्वारे मंदिरांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.



यावेळी प्रमुख मागण्या करण्यात आल्या.यात मंदिरांना दानरूपाने मिळणाऱ्या अथवा खरेदी केलेल्या शेतजमिनींचे मूल्यांकन कंपनी किंवा संस्थांप्रमाणे न करता शेती दराप्रमाणे करण्यात यावे. तसेच मंदिरांच्या दान व खरेदी दस्तांसाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.मंदिर मालकीच्या शेतीला नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ अथवा इतर कारणांमुळे नुकसान झाल्यास सर्वसामान्य शेतकऱ्यांप्रमाणे नुकसानभरपाई व शासकीय मदत देण्यात यावी. मंदिरांच्या शेतजमिनींना कुळ कायदा व कमाल जमीन धारणा (सिलिंग) कायद्यांतर्गत मिळालेली सूट कायम ठेवण्यात यावी व त्यासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या सूट प्रमाणपत्रांच्या अटी रद्द करण्यात याव्यात.

आशिष मारुडकर यांनी मंदिर व तीर्थक्षेत्र विकास निधी खर्च करताना संबंधित मंदिर संस्था, विश्वस्त मंडळे व स्थानिक व्यवस्थापन समितींना विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात यावेत.मंदिर व तीर्थक्षेत्र विकासासाठी निश्चित करण्यात आलेली जागा संबंधित विकास यंत्रणेकडे हस्तांतरित करण्याची अट रद्द करण्यात यावी असे प्रशासन व सरकार यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले.

यावेळी श्री कैलास पनपालिया यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' या मसुद्याविरोधात अमरावती जिल्ह्यातील विविध देवस्थान, मंदिर संस्था, विश्वस्त मंडळे आणि धार्मिक संघटनांनी तीव्र हरकत नोंदवित शासनाला सविस्तर निवेदने सादर केली. मंदिरांच्या जमिनी या कोणत्याही व्यक्तीच्या खासगी मालकीच्या नसून त्या समाजाने धर्मकार्यासाठी दान दिलेल्या आहेत. त्यामुळे अशा जमिनींवरील हक्क अबाधित ठेवणे ही शासनाची जबाबदारी आहे.देवस्थान इनाम जमिनींना धक्का पोहोचेल असा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. प्रस्तावित अधिनियमामुळे देवस्थान इनाम जमिनींचे अस्तित्व धोक्यात येणार असून अनेक मंदिरांची मालकी व पारंपरिक हक्क संपुष्टात येण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

शासनाने मंदिर विश्वस्त, धार्मिक संस्था व समाजप्रतिनिधी यांच्याशी व्यापक चर्चा करूनच कोणताही निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा उपस्थितांनी दिला.याप्रसंगी पद्मश्री जनार्दन पंत बोथे, दीपक सब्जीवाले,मीना पाठक,राजेंद्र टेंबे,संजय मेने,,सुनील काळमेघ,रवींद्र भोयर,विजय करडे,अनिल मापले, साहेबरावजी,श्रीकृष्ण मापले,अतुल ठाकरे,विनोद वानखडे,शुभम गुरुदेव,रामकृष्ण लांडोरे, सुरेश वामनराव, शंकर येवले,कृष्णाजी मारुडकर,मयूर महंत, गजानन मुदगल मारुती संस्थान मार्डी, अनिल वानखडे,मोहन इंगळे, युग धर्म प्रभुजी इस्कॉन,व्यंकटेश बालाजी ट्रस्ट,धीरज इंगळे,सोपान करडे,कैलास जिरापुरे, कैलास गिरोलकर, प्रशांत इंगोले,सुनील काळमेघ, विकास वैद्य, अविनाश देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थीत होते.

# संक्षिप्त

## तक्षशिला महाविद्यालयात वृक्षारोपण



**अमरावती-**येथील स्थानिक तक्षशिला महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाचा समतोल राखणे आणि निसर्गाचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आले.उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. प्रितेश पाटील व डॉ. रवींद्र तायडे, डॉ प्रणाली पेटे प्रा. सचिन कुमरे, डॉ. रुपेश भेलसरे, प्रा. ममता कळमकर, प्राध्यापक निरुपम भोरे, प्रा. समीर चौधरी तसेच महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी मंगेश वाघ दादू सावरकर सुरज नाईक उपस्थित होते.यावेळी बोलताना प्राचार्यांनी, केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन व जतन करण्याची जबाबदारी सर्वांनी घ्यावी, असे आवाहन केले. महाविद्यालयाच्या रासेयो आणि एनसीसी विभागाच्या पुढाकाराने हा परिसर हरित व सुंदर बनवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## जनजागृती सभा



**अमरावती-**अनुसूचित जाती मधील उपवर्गीकरणाला विरोध करण्याकरिता जनजागृती सभा गुरु रविदास भवन ,साई नगर येथे आयोजित केली होती. या सभेत सर्वश्री प्रा सुरेश पानझाडे,प्रा.डॉ. दिनेश रोजतकर, वासुदेवराव वानखडे,पांडुरंगजी खंडारे, दिंनेश चापके , निलेश जामठे, पी. बी.वनस्कर,कानडे यांनी उपवर्गीकरण कसे घातक आहे याबाबत अनेक दाखले देऊन मार्गदर्शन केले. प्रशांत विरुळकर, रमेश गवई, रमेश शेकोकार,गणेश इंगळे, दादाराव विरुळकर, प्रल्हाद खंडारे, उत्तम तायडे, गोंडेकर यांची उपस्थिती होती.संचालन व आभार प्रदर्शन दिनेश चापके यांनी केले. सभेला परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## रविवारी पत्रकार व कुटुंबियांसाठी आरोग्य तपासणी

**अमरावती -**धावपळीची जीवनशैली तसेच तणावपूर्ण वातावरणात काम करीत असताना पत्रकारांना अनेक शारीरिक समस्यांना तोंड द्यावे लागते, हीच गंभीर बाब डोळ्यासमोर ठेवत अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ तसेच महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन च्या वतीने रविवारी ( ता.सात) वॉलकट कंपाऊंड परिसरातील जिल्हा मराठी पत्रकार संघ भवनात प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, तसेच प्रसार माध्यमातील प्रतिनिधिंकरिता सकाळी आठ वाजेपासून आरोग्य तपासणी तसेच रक्तशर्करा तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सुप्रसिद्ध रामसाई हॉस्पिटल येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. नीलेश चांडक उपस्थित राहतील. हृदयरोग व जीवनशैली या विषयावर त्यांचे मार्गदर्शन सुद्धा लाभणार आहे. तसेच पत्रकारांची रक्त तपासणी केली जाईल. डॉ.निलेश चांडक व होमिओ डॉक्टर्स असोसिएशनचे डॉक्टर सुद्धा आरोग्य तपासणी करतील.कार्यक्रमाला सर्व पत्रकार तसेच त्यांच्या कुटुंबीयांना उपस्थित राहून आपली रक्त शर्करा तपासणी करणे तसेच धावपळीच्या युगात निरोगी जीवनशैली कशी विकसित करावी हे जाणून घ्यावे, असे आवाहन अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. स्वाती लबडे-पडोळे तसेच असोसिएशनचे सचिव डॉ.नंदकिशोर भुतडा यांनी केले आहे.

## त्रिवेणी प्री-प्रायमरी शाळेत पर्यावरण दिन साजरा



**अमरावती-**येथील अर्जुन नगर भागातील त्रिवेणी प्री-प्रायमरी शाळेत जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने बालकांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.शाळेच्या संचालिका धनेश्वरी धकाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी शालेय शिक्षिका, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून शाळा परिसरात वृक्षारोपण केले आणि 'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश दिला.कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका धनेश्वरी धकाते, मुख्याध्यापिका सृष्टी पाटील तसेच शिक्षक वृंद प्रिती राऊत, जयश्री धुमाळ आणि मंजुषा धजेकर प्रामुख्याने उपस्थित होत्या.

## गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे अनावरण

**अमरावती-**नजीकच्या मार्डी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रवर्तक बहुउद्देशीय संस्था तथा मैत्रेय युवा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मैत्रेय बौद्ध विहाराच्या वास्तूचे उद्घाटन तथा या विहारात तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचा अनावरण सोहळा विधिवत पार पडला.कार्यक्रमाला उद्घाटक खासदार बळवंत वानखडे, कार्यक्रम अध्यक्ष माजी मंत्री एड. यशोमती ठाकूर म्हणून उपस्थित होते. पूज्य भंते एस नागसेन, भिकू शिलानंद, भन्ते आनंद, भन्ते बुद्धसेन, आर्या प्रजापती थेरी यांच्या उपस्थितीत मैत्रीय बुद्ध विहारात तथागत गौतम बुद्ध मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. तत्पूर्वी भगवान गौतम बुद्धाची मूर्ती विशेष सजविलेल्या रथात ठेवून गावामधून धम्म रॅली काढण्यात आली.

# ...हा सामान्य भारतीयांच्या पैशांवरचा दरोडा!

ही माहिती तुमच्या पर्यंत पोहोचली का? भारतातलाच नव्हे तर जगातल्या सर्वात मोठ्या घोटाळ्यापैकी एक महाघोटाळा! सर्वसामान्य माणसांचे हजारो कोटी रुपये गिळंकृत करणारा मती गुंगवून टाकणारा अजस्त्र नि संतापजनक स्कॅम असे याचे वर्णन करता येईल!

एलआयसी मध्ये सामान्य माणसांचा पैसा गुंतला आहे. त्यामुळे तिथले पैसे अन्यत्र गुंतवताना तारतम्याने आणि काळजीपूर्वक गुंतवले जाणे अपेक्षित आहे मात्र फ्रॉड कंपनीत गुंतवणूक केल्याने काल एका दिवसांत एलआयसीने १६०० कोटी गमावलेत. एका व्यक्तीने जवळपास साडेपंधरा लाख कोटी रुपयांचे फेक फिगर्स दाखवून घोटाळा केला आहे. हा घोटाळेबाजही गुजराती निघाला, ह्याचे नाव आहे राजेश मेहता! ह्या घोटाळेबाजाच्या कंपनीच्या एकूण भांडवलात एलआयसीचे भांडवल आहे तब्बल १० टक्के! एलआयसीने ह्या कंपनीत २००० कोटींहून अधिक गुंतवणूक केली.

कंपनीच्या एका सजग शेअरहोल्डरने कळवले की, सर्व आकडे फुगवून दाखवले जात असावेत कारण एक टक्का देखील फिजिकल आयडेंटीटी नाही आणि इतक्या मोठ्या स्तरावरील कंपनीकडे जे इन्फ्रास्ट्रक्चर असायला हवे ते तर बिलकुल नाही. ह्या ईमेलने सेबीला जाग आली. पुढे जाऊन सेबीच्या चौकशीतून, जगातला सर्वात मोठा स्कॅम ठरेल असा हा अजस्त्र घोटाळा उघडकीस आला.

कंपनीने दाखवलेली आकडेवारी तब्बल ९९.८० टक्के खोटी आहे, गत तीन वर्षात त्यांच्या शेअरची किंमत ऐंशी टक्क्यांनी घसरली. एलआयसीने ह्यात २००० कोटी गुंतवले आहेत म्हणजे ह्याच घसरणीचा दर त्या गुंतवणुकीस लावल्यास २००० कोटी पैकी ८० टक्के म्हणजे १६०० कोटी रुपये बुडाले आहेत. हा पैसा सर्वसामान्य माणसांचा होता. विश्वास ठेवा किंवा न ठेवता तसेच मरा, पण आपल्या देशातील भ्रष्टाचार जवळपास सर्वोच्च पातळीवर आहे हे कटूसत्य आहे.


'राजेश एक्सपोर्ट्स' ही खरे तर सोन्याची आभूषणे बनवणारी छोटीशी कंपनी होती. कंपनीचा चेअरमन राजेश मेहता याच्यावर तब्बल १५.१५लाख कोटी रुपयांचा महसूल (रेव्हेन्यू) फुगवल्याचा गंभीर आरोप 'सेबी'ने केला आहे. जर हे आरोप सिद्ध झाले, तर हा भारतीय कॉर्पोरेट इतिहासातील सर्वात मोठा अकाउंटिंग घोटाळा ठरू शकतो. २० जून १९६४ रोजी बेंगळुरू येथे एका मध्यमवर्गीय जैन कुटुंबात जन्मलेल्या राजेश मेहताचे मूळ कुटुंब गुजरातच्या मोरबी येथील होते, जे १९४६ मध्ये बेंगळुरूमध्ये स्थायिक झाले. त्याचे वडील जसवंतराय मेहता हे एका खाजगी कंपनीत काम करायचे आणि नंतर त्यांनी 'राजेश डायमंड कंपनी' नावाने रत्नांचा छोटा व्यापार सुरू केला.

राजेशचे शालेय शिक्षण बेंगळुरूच्या 'सेंट जोसेफ स्कूल' मधून झाले. लहानपणी डॉक्टर व्हायची स्वप्ने पाहणाऱ्या राजेशने उच्च शिक्षण घेण्याऐवजी कमी वयातच कौटुंबिक व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतला. ८० च्या दशकात भारतातील दागिन्यांचा व्यवसाय हा असंघटित होता. राजेश मेहता आणि त्यांचे भाऊ प्रशांत मेहता यांनी बँकेत काम करणरा आपला मोठा भाऊ बिपिन याच्याकडून फक्त १२०० रुपयांचे कर्ज घेतले आणि चांदीच्या दागिन्यांचा व्यापार सुरू केला.

त्या काळात बँका सोन्या-चांदीच्या व्यापाराला किंवा असंघटित क्षेत्रातील नवख्या व्यवसायिकांना सहज कर्ज देत नसत. त्यामुळे राजेशला घरगुती कर्जावरच अवलंबून राहावे लागले होते.तो चेन्नईमधून चांदीचे दागिने खरेदी करायचा आणि राजकोटमधील आपल्या नातेवाईकांना व व्यापाऱ्यांना विकायचा. यातून मिळणाऱ्या छोट्या नफ्यातूनच त्याने हळूहळू आपले व्यावसायिक भांडवल वाढवले.

चांदीच्या व्यवसायात काही पैसे जमवल्यानंतर, १९८९ मध्ये त्याने सोन्याच्या दागिन्यांच्या क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यावेळी त्यांच्याकडे स्वतःचे मोठे कार्यालय किंवा कारखाना नव्हता. त्याने बेंगळुरूमधील आपल्या घराच्या छोट्या गॅरेजमध्ये अवघ्या १० कामगारांना सोबत घेऊन 'राजेश एक्सपोर्ट्स'ची पायाभरणी केली होती.

ह्या कथित कंपनीने अल्पावधीतच मोठी प्रगती केली.१९९५ मध्ये त्याने आपली कंपनी शेअर बाजारात सूचीबद्ध केली आणि बाजारातून १० कोटी रुपये उभे केले. त्याने ताब्यात घेतलेला हा पहिला पब्लिक मनी होता! त्याने संपूर्ण कर्नाटकांत 'शुभ ज्वेलर्स' ह्या नावाने स्वतःचे रिटेल




आऊटलेट्स सुरू केली.

२०१५ मध्ये राजेश मेहताने जगाला चकित करणारा निर्णय घेतला. ही झेप त्याने २०१५ साली घेतली होती, ही नोंद महत्वाची आहे, ह्याकामी त्याला कुणी मदत केली असेल याचे अंदाज तुम्ही ह्यावरून बांधू शकता! त्याने स्वित्झर्लंडमधली तेव्हाची जगातली सर्वात मोठी गोल्ड रिफायनरी 'वाल्कॅम्बी' तब्बल ४०० दशलक्ष डॉलर्स म्हणजे सुमारे २५६० कोटी रुपये, रोख देऊन विकत घेतली. या व्यवहारामुळे 'राजेश एक्सपोर्ट्स' ही जगातील ३५ टक्के सोन्यावर प्रक्रिया करणारी सर्वात मोठी कंपनी बनली, मात्र सोन्यावरची प्रक्रिया हा एक भुलभुलैय्या होता. ती गोष्ट केवळ कागदोपत्रीच होती!

२०१७ मध्ये फोर्ब्सच्या यादीनुसार राजेश मेहताची एकूण संपत्ती २.६ अब्ज डॉलर्स होती आणि तो भारतातील ६१ वे सर्वात श्रीमंत व्यक्ती बनला होता. त्याला बेंगळुरूमधील सर्वात श्रीमंत उद्योजकांपैकी एक मानले जात असे. खोट्या फुगवलेल्या आकडेवारीमुळे त्याची कंपनी 'राजेश एक्सपोर्ट्स' फॉर्च्यून ग्लोबल फाईव हंड्रेड (इदूल्हा उर्दंत ५००) यादीत समाविष्ट होणारी भारतातील मोजक्या खाजगी कंपन्यांपैकी एक होती.

कंपनीच्या खात्यातून कोट्यवधी रुपये राजेश मेहताच्या स्वतःच्या वैयक्तिक खात्यात वळवण्यात आले. त्यानंतर या पैशांमधून त्यांनी वैयक्तिकरित्या सोन्याचे डेरिव्हेटिव्हज ट्रेडिंग केले. खासगी ट्रेडिंगमध्ये मेहताला कोट्यवधी रुपयांचा तोटा झाला. तोटा लपवण्यासाठी, त्याने आपल्या वैयक्तिक व्यवहारांचे आकडे कंपनीच्या अधिकृत पुस्तकात हजारो पटींनी जास्त दाखवून बनावट विक्री-खरेदीचे व्यवहार नोंदवले.

राजेश एक्सपोर्ट्स आपल्या परदेशी उपकंपन्यांमधून ९९३ महसूल येत असल्याचे भासवत होती. परंतु, जेव्हा या स्विस कंपनीची कागदपत्रे तपासली गेली तेव्हा असे लक्षात आले ह्या उपकंपनीने मेहता यांना असा कोणताही महसूल दिलेला नव्हता! ही माहिती सेबीच्या पायाखालची जमीन हादरवणारी ठरली. ह्या कंपनीची वास्तविक कमाई राजेश एक्सपोर्ट्सने दाखवलेल्या उत्पन्नाच्या ०.५ ३ पेक्षाही कमी निघाली.

मेहताच्या कंपनीने आफ्रिकेतील एका सुवर्ण खाणीत केलेल्या १०३५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे पुरावे देण्यात तो अपयशी ठरलाय. याशिवाय कॅनरा बँकेच्या ५०९ कोटी रुपयांच्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे बँकेने त्यांची खाती स्ट्रेस्ड ॲसेट्स म्हणून घोषित केली आहेत.

राजेश मेहताच्या कंपनीने रिफायनरीसाठी सोन्याची जी खरेदी विक्री केली त्याची आकडेवारी रिफायनरीचा महसूल म्हणून दाखवला, प्रत्यक्षात त्याने किती वजनाचे सोने शुद्धीकरण केले त्यातून मिळालेला नफा हे त्याचे उत्पन्न दाखवायला हवे होते त्याऐवजी त्याने किती टन सोने घेतले आणि ते परत विकले याची खरेदी विक्रीची आकडेवारी महसूल म्हणून दाखवली आणि उत्पन्नाचा आकडा सोळा लाख कोटीपर्यंत फुगवत नेला.

राजेश मेहताचे बिंग ईमेलने फुटण्याआधी त्याची आणखी एक गोष्ट संशयास्पद वाटली होती आणि ह्याच गोष्टीमुळे तो संशयाच्या भोवऱ्यात गुंतत गेला. कंपनीच्या अधिकृत वार्षिक अहवालानुसार जगभरात हजारो कोटी रुपयांचे सोने विकणाऱ्या या कंपनीत केवळ सव्वाशेच्या दरम्यान स्थायी कर्मचारी काम करत असल्याचे दाखवण्यात आले होते. कंपनीच्या खात्यानुसार, या मोजक्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि पगारासाठी कंपनीने २१५ कोटी रुपये खर्च केल्याचे दाखवले होते. याचा साधा अर्थ असा होतो की, कंपनीमधील प्रत्येक सामान्य कर्मचाऱ्याचा सरासरी पगार वार्षिक सव्वा ते दीड कोटी रुपये इतका मोठा होता. भारतीय ज्वेलरी उद्योगाच्या मानकानुसार हा पगार अशक्य आणि संशयास्पद मानला गेला आणि राजेशची कंपनी खऱ्या अर्थाने रडारवर आली.

ज्या कंपनीचा महसूल लाखो कोटी रुपयांमध्ये आहे, ती कंपनी केवळ शंभर कर्मचाऱ्यांच्या बळावर कशी काय चालू शकते ह्या प्रश्नाने तपासकर्ते चक्रावून गेले. ह्यामुळेच ही कंपनी केवळ कागदावर 'बोगस व्यवहार' दाखवून महसूल फुगवत असल्याच्या संशयाला बळकटी मिळाली. आणि आता तर सारेच ठप्प पडले.

थोडक्यात सांगायचे तर, एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातील या तरुणाने अवघ्या १२०० रुपयांच्या भांडवलावरून अब्जावधी रुपयांचे साम्राज्य उभे केले होते. असा रोमांचक इतिहास त्याच्या यशाचे 'रोलमॉडेल' म्हणून अनेक वर्षे सांगितला जात होता, ज्याचे पितळ आता उघडे पडले आहे.

देशात मोठे आर्थिक घोटाळे प्रामुख्याने गुजराती मंडळींनी केले आहेत आणि सद्यघडीला देशाबाहेरही मनमर्जीने वागून आपल्या देशाचे नाव खराब करण्यात गुजराती मंडळी आघाडीवर आहेत, दोन गुजराती माणस देशाचे सुकाणू हाकत असताना ही गोष्ट अधिक ठळक व्हावी हे गुजरातसाठी नक्कीच अशोभनीय आहे! असो!

ज्या बँका शेतकऱ्याला हजार रुपये देण्यासाठी रडवतात त्या डोळे झाकून हजारो कोटी रुपयांची माती होऊ देतात तेव्हा त्या कशा काय मौन राहतात? जी एलआयसी एखाद्या गरीब पॉलिसीधारकाने दोन पाचशे रुपयांचा प्रीमियम मुदतीत भरला नाही तर त्याला लगेच पेनल्टी लावते त्या एलआयसीला २००० कोटी रुपये हे अस्से उधळून देताना लाज शरम कशी काय वाटत नसेल? सामान्य भारतीयांच्या पैशांवरचा हा ढळढळीत दरोडा आहे! याचे उत्तरदायित्व कोण घेणार आहे? की नेहमीप्रमाणे याचीही लिपापोती केली जाईल? आज रात्री दूरदर्शनवर सुधीर चौधरी सामान्य जनतेचे पैसे बुडाल्याचे दहा फायदे समजावून सांगण्याचा कार्यक्रम घेईल का असाही प्रश्न पडतो! तुम्हाला काही प्रश्न पडतात की नाही?

आपण ह्यावर प्रश्न उपस्थित करू की नाही हे सांगता येणार नाही, मात्र वीसेक वर्षांनी नेटफ्लिक्सवरती ह्या स्कॅमवर आधारलेली वेबसिरीज आली की तिचे दोन तीन सिझन आपण एन्जॉय नक्की करू! असो!

**समीर गायकवाड**

# छत्रपती शिवराय आणि शुध्दीकरण मोहीम अर्थात 'घर वापसी'

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक देशातील एक महत्वपूर्ण घटना असून त्या घटनेचे पडसाद देशाच्या विविध भागात उमटले होते.त्या काळात संदेशवहनाची अपुरी साधने असताना सुद्धा साता समुद्रा पलीकडे शिवरायांच्या शिवराज्याभिषेकाची चर्चा झाली होती.ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शा.शके १५९६ दि.६ जून १६७४ रोजी श्री शिवराज्याभिषेका नंतर स्वराज्यात काही आमूलाग्र बदल झाले होते.त्यामध्ये स्वभाषा, स्वदेशी, स्वधर्म इत्यादीचा उल्लेख होतो.स्वधर्मासाठी परधर्मात गेलेल्यांचे शुध्दीकरण अर्थात घर वापसीची मोहीम सुरू करण्यात आली होती.आज देशात 'घरवापसी' हा शब्द प्रयोग प्रसार माध्यमे आणि समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात चर्चिला जात असतो. त्यामुळे 'घरवापसी' म्हणजे काय याची चर्चा कारणे आवश्यक आहे.

प्रलोभन, दबावतंत्र किंवा जबरदस्तीने हिंदूधर्माचा त्याग करुन एक पोथीवादी धर्माचा स्वीकार केलेल्या हिंदू बांधवांना त्यांचे शुद्धीकरण करून पुन्हा हिंदू धर्मात सन्मानाने परत घेण्याच्या प्रक्रियेला शुध्दीकरण मोहीम किंवा घरी वापसी म्हटले जाते.घर वापसीची पहिली मोहीम छत्रपती शिवाजी महाराजांनी साडे तीनशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात केलेली आहे.बजाजी निंबाळकर व नेतोजी पालकर यांच्या शुद्धीकरणाचा शिवकालीन इतिहासामध्ये उल्लेख आहे. क्रूर औरंगजेबाच्या काळात हिंदू समाजावरील अत्याचाराला सीमा उरल्या नव्हत्या. तीर्थयात्रावर जिझिया करा पासून धर्मांतरण हा औरंगजेबाचा सर्वात मोठा अत्याचार होता.तसेच तत्कालीन हिंदू समाज व्यवस्थेत मुसलमानांनी बाटविलेल्यांना हिंदू धर्मात परत घेण्यास हिंदू समाजाचाच फार मोठा विरोध असायचा.त्यामुळे



छत्रपती शिवरायांनी समाजाचा हा विरोध मोडून काढण्यासाठी शुध्दीकरण मोहीम अर्थात घर वापसीला प्रोत्साहन दिले होते.

**बजाजी निंबाळकर यांचे शुध्दीकरण**

महाराष्ट्रात आदिलशाही, कुतुबशाही, मुघलांच्या इस्लामी सत्तेचा मोठा प्रभाव होता आणि त्यांनी बाटवाबाटवी सुद्धा केली आहे. इस्लामी सत्तेने केलेल्या बाटवाबाटवीमध्ये फलटणचे मोठे प्रस्थ आणि बलाढ्य सरदार बजाजी निंबाळकर यांचा उल्लेख केला जातो. बळाने बजाजीस बाटविले असल्याने त्याचा काही दोष नसल्याने शिवाजी महाराज व मातोश्री जिजाबाई यांनी शुद्धीकरण घडवून आणले होते.त्यामुळेच त्याच्या शुद्धीकरणास मान्यता सुद्धा मिळाली. शिखर शिंगणापूरच्या मंदिरात पंडिता कडून विधीपूर्वक घर वापसी अर्थात शुध्दीकरण करून घेतले होते.तसेच शुद्धीकरणा नंतर पुन्हा हिंदू समाजात पूर्णपणे एकरूप होऊन समाजात सन्मानाचे स्थान मिळणे आवश्यक असल्याने शिवाजी महाराजांनी आपली मुलगी सखुबाई हिचा विवाह बजाजी निंबाळकरांचा मुलगा महादजी याच्याशी लावून दिला. तसेच त्याला पुणे परगण्यात पाटीलकी सुद्धा दिली होती.

**कुली खानचे पुन्हा नेतोजी पालकर**

छत्रपती शिवरायांनी बजाजी निंबाळकर यांच्या प्रमाणे दुसरी महत्त्वाची घर वापसी नेतोजी पालकर यांची घडवून आणली होती. नेतोजी पालकर हे शिवकालीन इतिहासा मधील पराक्रमी योध्दा होते.छत्रपती शिवाजी महाराज आग्रा येथून सुटल्यानंतर चवताळलेल्या औरंगजेबाच्या आदेशाने त्यांना अटक करण्यात आली.धारूर किल्ल्यावर त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले होते.त्यानंतर त्यांना दिल्लीला नेण्यात आले इस्लाममध्ये धर्मांतर करून 'मुहम्मद कुली खान'नामकरण करण्यात आले होते.नेताजी पालकर मोहम्मद कुली खान म्हणून जवळपास दहा वर्षे औरंगजेबाच्या चाकरीत होते.इ.स.१६७६ च्या मोहिमेत ते दिलेरखाना सोबत महाराष्ट्रात आले.त्याच काळात इस्लामी फौजेला चकमा देऊन ते रायगडावर पोहचले आणि शिवाजी महाराजांना भेटले.दरबारात त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात घेण्याची विनंती केली. होती.

त्यानंतर शिवाजी महाराजांच्या आदेशाने आषाढ वद्य चतुर्थी दि १९ जून १६७६ रोजी रायगडावर त्यांचे शुद्धीकरण करण्यात आले होते. प्रचलित ऐतिहासिक उल्लेखानुसार छत्रपती शिवरायांची कन्या कमळाबाई हिचा विवाह नेताजी पालकर यांचा मुलगा जानोजीराव पालकर यांच्या सोबत लावून दिला होता.धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर आणि घर वापसी मोहीम म्हणजे राष्ट्र पुनर्जागरण हा उदात्त विचार घेऊन आपल्या देशात शुद्धीकरण अर्थात घर वापसी चळवळ सुरू झाली असून त्याची मुळ प्रेरणा शिवाजी महाराजांचीच आहे.

साडेतीनशे वर्षांपूर्वी शिवरायांनी ही मोहीम सुरू केली होती.त्यामुळे आज राष्ट्रहितासाठी ख्रिस्ती आणि मुसलमान झालेल्या लोकांनी स्वतः ला शुद्ध करून घेण्यासाठी शुध्दीकरण अर्थात 'घर वापसी' मोहीम प्रभावी करणे आवश्यक आहे.

**अशोक राणे**
मो.९४२३६५८३८५

# रायगडावरील शिव राज्याभिषेक

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही भारताच्या इतिहासातील एक क्रांतीकारक व सुवर्णपान तथा स्वातंत्र्याचाप्रेरणा देणारा पवित्र दिवस आहे असे समजले जाते. जनतेने शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करून घेण्याचा आग्रह केला म्हणूनच महाराजांनी आपली पुज्य माता व निकटच्या सरदारांशी चर्चा करून स्वराज्याची राजधानी रायगड येथे हिंदवी स्वराज्याचे राजे शिवाजी हे सकाळच्या प्रहरी सिंहासनावर विराजमान झाले. जमिनीपासून ५ हजार फुट उंचीवर महाराजांसाठी ३२ मन सोन्याने मढविलेले सिंहासन तयार करण्यात आले. या सोहळ्यात त्यांच्या डोक्यावर छत्र धरण्यात आले म्हणूनच त्यांना छत्रपती संबोधल्या गेले.

त्यांनी रितसर ६ जून १६७४ रोजी सतत ९ दिवस राज्याभिषेक करून धार्मिक व राजकीयदृष्ट्या नैतिक अधिष्टान आत्मसात केले म्हणूनच न्याय व धर्माने चालणारे राज्य स्थापन झाल्याने प्रजा ही आनंद उत्साहित झाली व शत्रुवर महाराजांचा अधिक वचक निर्माण झाला. राज्याभिषेक दिवस हा स्वराज्य, सार्वभौमत्व व स्वातंत्र्यांची प्रेरणा देणारा मंगल दिवस असून खऱ्या अर्थाने रयतेचा उत्सव संबोधल्या गेला.आपल्या कार्यभारातून समानतेचे तत्व जोपासले तथा त्यांचा लढा परिवर्तनासाठी होता.

श्री संत तुकाराम हे त्यांचे आध्यात्मिक गुरू तर श्री संत रामदास हे त्यांचे राजकीय गुरू होते.अल्पकाळात सहा वर्षानंतर वयाच्या ५० व्या वर्षी म्हणजेच ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले.विश्वातला सर्वोत्तम आदर्श, रयतेच्या हितासाठी व लोक कल्याणकारी राजा तथा त्यांचे जीवन व कार्य आजही जगभरातील प्रशासकांसाठी प्रेरणादायी, मार्गदर्शन तथा प्रशंसनीय ठरले आहे तथा त्यांनी समता व बंधुत्व या मुल्यांची प्रतिष्ठापना केली, ही आपणा भारतीय नागरिकांसाठी एक गौरवशाली, अभिमानास्पद व अभिनंदनीय बाब आहे.

**अविनाश राजगुरे**
अमरावती. मो.९३२६९२५५३१

# पर्यावरण अस्तित्वाचा पाया

मनुष्य आणि पर्यावरण एकमेकांवर अवलंबून आहे. प्रदूषण किंवा झाडांची कमतरता या पर्यावरणीय प्रदूषणाचा थेट परिणाम मानवी शरीरावर आणि आरोग्यावर होतो.जागतिक पर्यावरण दिन वर्ष २०२६ ची संकल्पना 'निसर्गाकडून प्रेरित. हवामानासाठी. आपल्या भविष्यासाठी.'(इंस्पायार्ड बाय नेचर. फोर क्लायमेट फोर अव्हर नेचर)ही आहे.पर्यावरण हे वातावरण, हवामान, स्वच्छता, प्रदूषण आणि झाडांपासून बनलेले आहे. मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्परसंबंध अत्यंत खोल, अटळ आणि परस्परपूरक आहेत.मानवी अस्तित्व, विकास आणि कल्याण पूर्णपणे पर्यावरणावर अवलंबून आहे. मानव-पर्यावरण संबंध म्हणजे मानवी आणि नैसर्गिक घटकांमधील आंतरक्रिया आणि प्रतिसाद, जीव आणि पर्यावरणामध्ये देखील एक संबंध आहे,जो परस्पर अवलंबून आहे. (अन्न, वस्त्र, निवारा:या

मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारे अन्न शेतीतून, वस्त्र कापसापासून आणि निवाऱ्याचे लाकूड व इतर साहित्य निसर्गातूनच मिळते. सजीव सृष्टीला जगण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शुद्ध हवा (ऑक्सिजन) आणि पिण्याचे पाणी, जे केवळ शुद्ध पर्यावरणातच उपलब्ध होऊ शकतात). पृथ्वीवर सर्वात बुद्धिमान जर कोणी असेल तर तो म्हणजे मानव. त्यामुळे त्याने आपल्या बुद्धीमतेचा वापर करूनं पर्यावरणाकडून जसा पाहिजे तसा आपला विकास साधवून घेतला. मात्र निसर्गाचा समतोल राखण्याचे/ परतफेड करण्याचे साफ विसरला.एखाद्या व्यक्तीकडून व समाजाकडून जेंव्हा आपण मदत घेतो तेंव्हा त्याच्याप्रती नेहमी कृतज्ञ राहतो, हा नियम पर्यावरणाशी मानवाने कधीही पाळला नाही. त्यामुळेच आज 'पर्यावरण वाचवा' यांसारखी परिस्थिती आली आहे .मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर विकास साधला, परंतु त्याचा पर्यावरण संरक्षणाशिवाय मानवजातीचे भविष्य सुरक्षित नाही.प्रदूषित हवा आणि दूषित पाण्यामुळे मानवामध्ये विविध आजार पसरतात. नैसर्गिक आपत्ती जसे की पूर, दुष्काळ किंवा चक्रीवादळे यांचा थेट फटका मानवी जीवनाला आणि अर्थव्यवस्थेला बसतो.

पर्यावरणाचा ऱ्हास होण्यामागे मानवाने पर्यावरणात नकारात्मकबदल घडवून आणले आहेत.मानव सकारात्मक बदल यात चांगल्या सवयी जसे की स्वच्छता राखणे, वन्यजीव संवर्धन, वृक्षारोपण, झाडांची जोपासना करणे. प्रदूषण रोखणे/ नियंत्रणासारख्या उपक्रमांद्वारे पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करतोआहे.निसर्गाची हानी न करता स्वतःचा विकास साधणे हे आजच्या काळाची मुख्य गरज आहे. मानव हा पर्यावरणाचा एक भाग म्हणून निसर्गाचे रक्षण करणे ही मानवाची नैतिक जबाबदारी आहे. जर पर्यावरण स्वच्छ आणि निरोगी असेल, तर मानवाचे आरोग्य चांगले राहते आणि मानवी जीवन समृद्ध होते.पर्यावरण आणि मानवाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज बनली आहे.पर्यावरण आणि मानव एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण पर्यावरणाचे रक्षण केले तरच पर्यावरण आपले रक्षण करेल. निसर्गाशिवाय मानव जगू शकत नाही, पण मानवाशिवाय निसर्ग नक्कीच बहरू शकतो. म्हणूनच, 'पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा'या मंत्राचा अवलंब करून मानवाने निसर्गाशी सुसंगत जीवनशैली जगणे आवश्यक आहे.म्हणजेच निसर्गाच्या सान्निध्यात राहणे म्हणजे स्वतःच्या आरोग्याशी मैत्री करणे.

**तारा द्वा. शर्मा**
अमरावती

# पुरुषोत्तम मास-आध्यात्मिक प्रगतीचा विशेष कालखंड

अधिक मास हा हिंदू कालगणनेतील एक विशेष आणि पवित्र महिना मानला जातो. चंद्र आणि सौर वर्ष यातील फरक भरून काढण्यासाठी सुमारे दर तीन वर्षांनी हा महिना येतो. परंतु केवळ कालगणनेतील तांत्रिक समायोजन म्हणून त्याचे महत्त्व नसून अध्यात्मिक उन्नती आणि पारमार्थिक साधनेसाठी तो एक सुवर्णसंधी मानला गेला आहे. या महिन्याला 'पुरुषोत्तम मास' असेही संबोधले जाते. भगवान विष्णूंनी या महिन्याला स्वतःचे नाव दिल्याची पुराणकथा सांगितली जाते. त्यामुळे या काळात केलेले जप, तप, दान, व्रत, स्वाध्याय आणि ईश्वरभक्ती यांना विशेष पुण्यकारक मानले जाते.

मानवी जीवन हे प्रपंच आणि परमार्थ यांच्या संतुलनावर आधारलेले असते.वर्षभर मनुष्य संसारातील विविध जबाबदाऱ्या, व्यवसाय, कुटुंबीय कर्तव्ये आणि भौतिक ध्येये यांत गुंतलेला असतो. परिणामी आत्मचिंतन, ईश्वरस्मरण आणि आध्यात्मिक प्रगती यांसाठी पुरेसा वेळ मिळत नाही. अधिक मास हा जणू काही या धावपळीच्या जीवनात मिळालेला अतिरिक्त कालावधी आहे, जो मनुष्याला स्वतःकडे पाहण्याची, आपल्या जीवनाचे मूल्यमापन करण्याची आणि परमेश्वराशी नाते दृढ करण्याची संधी प्रदान करतो.

या महिन्यात नामस्मरण, मंत्रजप, भगवद्गीता, भागवत, रामायण यांसारख्या ग्रंथांचे वाचन आणि श्रवण यांना विशेष महत्त्व दिले जाते. कारण सत्साहित्याचा अभ्यास मन शुद्ध करतो, विचारांना दिशा देतो आणि जीवनातील दुःख-सुखांकडे समत्वाने पाहण्याची दृष्टी निर्माण करतो. अधिक मासातील साधना ही केवळ कर्मकांडापुरती मर्यादित नसून अंतःकरणाच्या शुद्धीचा मार्ग आहे. मनातील लोभ, मोह, क्रोध, मत्सर आणि अहंकार यांसारख्या दोषांचे निरीक्षण करून त्यांच्यावर विजय मिळवण्याचा प्रयत्न या काळात करावा असे धर्मशास्त्र सांगते.



पारमार्थिक कर्मांमध्ये दानधर्मालाही अत्यंत महत्त्व आहे.अन्नदान, वस्त्रदान, गोसेवा, गरजूंची मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य किंवा सामाजिक हिताची कार्ये यांमुळे केवळ पुण्यप्राप्ती होत नाही, तर समाजात करुणा आणि सहजीवनाची भावना वाढीस लागते. अधिक मास आपल्याला हे स्मरण करून देतो की, जीवनाचा खरा आनंद केवळ स्वतःसाठी जगण्यात नसून इतरांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्यामध्ये आहे.

अधिक मासात उपवास, नियमपालन आणि इंद्रियनिग्रह यांनाही महत्त्व दिले जाते. यामागील उद्देश शरीराला त्रास देणे नसून मनाला शिस्त लावणे हा आहे. संयमाच्या माध्यमातून मनुष्य आपल्या इच्छांवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करतो.यामुळे मानसिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि अंतर्मनाची शक्ती वाढते. आधुनिक काळातही या तत्त्वांचे महत्त्व कमी झालेले नाही; उलट सततच्या तणावग्रस्त जीवनात अशा साधना मनःशांती आणि आत्मिक समाधान देतात.

अधिक मासाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रायश्चित्त आणि आत्म परीक्षण. प्रत्येक व्यक्तीकडून जाणते-अजाणतेपणी चुका घडत असतात. या महिन्यात त्या चुकांची जाणीव करून घेऊन त्यांचे परिमार्जन करण्याचा संकल्प केला जातो. त्यामुळे व्यक्तिमत्त्व अधिक परिपक्व आणि सुसंस्कृत बनते. ईश्वरभक्ती, सदाचार आणि परोपकार यांच्या माध्यमातून जीवन अधिक अर्थपूर्ण करण्याची प्रेरणा या काळात मिळते.

अशा प्रकारे अधिक मास हा केवळ पंचांगातील अतिरिक्त महिना नसून आत्मोन्नतीचा, अंतःकरणशुद्धीचा आणि ईश्वरप्राप्तीच्या दिशेने वाटचाल करण्याचा एक विशेष आध्यात्मिक कालखंड आहे.या महिन्यात केलेली साधना, सत्कर्मे आणि परमार्थिक उपक्रम मनुष्याला केवळ धार्मिक पुण्यच देत नाहीत, तर त्याच्या जीवनात शांती, समाधान, विवेक आणि आध्यात्मिक समृद्धी निर्माण करतात. म्हणूनच भारतीय संस्कृतीत अधिक मासाला अत्यंत आदराचे आणि पवित्रतेचे स्थान प्राप्त झाले आहे.

**श्रीपाद टेंबे**
मो-९१५८०८८०४२

**अकोला पश्चिमच्या प्रश्नांवर**

# आ. साजिद खान पठाण यांचा डीपीसिच्या बैठकीत प्रभावी पाठपुरावा

## रस्ते, टीबी लॅब, लाडकी बहीण, पोलीस ठाणे स्थलांतर आणि २५० कुटुंबांच्या पुनर्वसनाच्या मुद्यावर वेधले लक्ष

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळावा आणि विकासकामांना गती मिळावी यासाठी आमदार साजिद खान पठाण यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत प्रभावी मांडणी केली. पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांनी रस्ते, आरोग्य, क्रीडा, महिला कल्याण, प्रशासकीय सुविधा आणि पुनर्वसनाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर प्रशासनाचे लक्ष वेधले.



### टीबी लॅब सुरू करण्याची मागणी

अकोला शहरासाठी २०२१ मध्ये मंजूर झालेली अत्याधुनिक क्षयरोग (टीबी) तपासणी प्रयोगशाळा अद्याप सुरू झालेली नसल्याचा मुद्दाही त्यांनी बैठकीत उपस्थित केला. आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध असतानाही आणि ११ पदांना मंजुरी मिळालेली असतानाही महानगरपालिका व जिल्हा क्षयरोग विभागातील समन्वयाअभावी ही प्रयोगशाळा सुरू होऊ शकलेली नाही. नागरिकांच्या आरोग्याशी निगडित हा गंभीर विषय तातडीने मार्गी लावण्याची मागणी त्यांनी केली. तसेच श्री राजराजेश्वर मंदिर आराखड्यासंदर्भात बैठक घेऊन आवश्यक धोरण लवकर जाहीर करावे, अशीही मागणी करण्यात आली.

### ५० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या २५० कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर

वार्ड क्रमांक ७ मधील तारफैल परिसरातील रेल्वे मार्गालगत सुमारे पन्नास वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांवर रेल्वे प्रशासनाने १ जून रोजी अतिक्रमण हटाव कारवाई केली. या कारवाईमुळे सुमारे २०० कुटुंबे बेघर झाली असून त्यांच्या समोर निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे याच कारवाईत गडंकी पोलिस प्रशिक्षण केंद्राजवळील भागातील सुद्धा ५० कुटुंबे बेघर झाली आहे.

या कुटुंबांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करून त्यांना ई-क्लास जमिनीवर घरे उपलब्ध करून देण्यात यावीत, अशी ठोस मागणी आमदार साजिद खान पठाण यांनी केली. यावर पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रस्ताव तातडीने राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल आणि पुनर्वसनासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले.

तपे हनुमान मंदिर, अग्रसेन चौक ते शहीद अब्दुल हमीद चौक या प्रमुख मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार पठाण यांनी केली. जिल्हा क्रीडा विभागामार्फत फुटबॉल व कुस्ती स्पर्धांचे आयोजन करून ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही आमदार पठाण यांनी केली. यामुळे स्थानिक प्रतिभेला वाव मिळून युवकांमध्ये क्रीडाविषयक वातावरण निर्माण होईल, असे त्यांनी सांगितले. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत अनेक पात्र महिलांचे केवायसी पूर्ण न झाल्यामुळे त्यांना लाभ मिळालेला नाही. या महिलांना न्याय मिळण्यासाठी केवायसी पूर्ण करण्याची मुदत वाढविण्याची आवश्यकता असल्याचे आमदार पठाण यांनी नमूद केले. तसेच अल्पसंख्याक विभागाच्या माध्यमातून मूलभूत रस्त्यांची कामे हाती घेण्याची मागणीही त्यांनी केली. जुन्या शहरातील पोलीस ठाणे गर्दीच्या भागात असल्याने नागरिक व भाविकांना वारंवार गैरसोयीचा सामना करावा लागतो. त्यामुळे हे पोलीस ठाणे हरिहर पेठ परिसरात स्थलांतरित करण्यात यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. तसेच आरटीओ कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधत त्याच्या विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

बैठकीत मांडण्यात आलेल्या विविध प्रश्नांमुळे अकोला पश्चिममधील नागरिकांच्या अपेक्षांना बळ मिळाले असून विकासकामांना गती मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आपण सातत्याने संघर्ष करीत राहू, अशी भूमिका आमदार साजिद खान पठाण यांनी यावेळी स्पष्ट केली.

---

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातील विविध घटकांचा लाभ घेण्याचे आवाहन

**अकोला** : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात वैयक्तिक लाभासाठी अनेक घटक समाविष्ट आहेत. ठिबक व तुषार संचासाठी जास्त अर्ज येत आहेत. इतर घटकांसाठीही जिल्ह्यातील शेतक-यांनी अर्ज करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिका-यांनी केले आहे. योजनेत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करणे, हवामान बदलास अनुकूल शेती पद्धतींचा प्रसार करणे तसेच शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे या उद्देशाने विविध महत्वाकांक्षी घटक राबविण्यात येत आहेत. प्रकल्पांतर्गत सध्या वानिकी आधारित वृक्ष लागवड, बांबू लागवड, गांडूळ खत व नाडेप, विहीर पुनर्भरण, फळबाग लागवड, पाईप व पंप संच ठिबक सिंचन संच, तुषार सिंचन संच, बिजोत्पादन, रेशीम उद्योग, वैयक्तिक शेततळे, गोड्या पाण्यातील मत्स्यपालन, शेततळे अस्तरीकरण, शेडनेटगृह हरितगृहामधील लागवड साहित्य या वैयक्तिक लाभाच्या घटकांसाठी लाभ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी बार्शिटाकळी यांचे कार्यालय, बार्शिटाकळी**

क्र. कक्ष प्रस्तु.-१/ कावि/ २४१३/२०२६ दिनांक:- १५/०५/२०२६

**जाहिरनामा**

या जाहिरनाम्याव्दारे सर्वत्र लोकांना सुचीत करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरण अर्जदार श्री नाजीमोददीन अलीमोददीन रा.खडकपुरा बार्शिटाकळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला यांनी मौजे सोनगीरी येथील गट नं./स.नं. ३१ क्षेत्रफळ १.२७हे. आर भो.वर्ग-१ असुन मालकीचे व नावे असलेले शेतीचे ७/१२ चे ईतर अधिकार सदरी असलेले काशीराम कृष्णराव स.प. १९५१-५२ ते १९५५-५६ (१) अशी नोंद असुन सदरची नोंद कमी करुन देण्याकरिता प्रकरण प्राप्त झाले आहे. प्रकरणात अर्जदार यांनी हस्तलिखीत ७/१२ व खरेदी, फेरफार, हस्तलिखीत ७/१२ ईत्यादी अभिलेख सहपत्रीत केले आहे.

गट नं.३१ चे इतर अधिकार सदरामधुन काशीराम कृष्णराव स.प. १९५१-५२ ते १९५५-५६ (१) अशी नोंद कमी करण्याबाबत कोणाचे काही आक्षेप किंवा हरकती असल्यास त्यांनी आपले लेखी आक्षेप / हरकती हा जाहिरनामा प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत या कार्यालयास प्रकरणात प्रत्यक्षरित्या सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती किंवा आक्षेणचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

**अध्यक्ष, जमीन न्यायाधीकरण तथा तहसिलदार बार्शिटाकळी**

**जाहीर नोटीस**

आमचे पक्षकार १) रुपेश राजकुमारसिंह सिंघेल आणि २) ज्ञानेश्वर सदाशिव वावरे, दोघे रा. लोहारा, ता. बाळापूर, जिल्हा अकोला, यांनी दिलेल्या माहिती व अधिकारानुसार सर्व जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

**शेतजमिनीचे वर्णन :**

१ मौजे अंदुरा भाग-१, ता. बाळापूर, जिल्हा अकोला येथील नोंदणी तु. बाळापूर भुमापन क. ३९४, क्षेत्र. ०२ हे. ४० आर, पैकी प्रभुदास रामदास वराळे यांच्या मालकीची ०१ हे. ४० आर कोरडवाहून शेतजमीन झाडाझुडासह, तसेच सदर शेतामधील एक बोअर वेल असून त्यावरील पाणी घेण्याच्या मालकीहक्कासह सदर मिळकतीचा प्रभुदास रामदास वराळे यांनी आमचे पक्षकारांसोबत विकण्याचा सौदा केला आहे, ज्यास चतुः सिमा, पुर्वेस- बोळे यांची शेतजमीन, पश्चिमेस-घोगळे यांची शेतजमीन, उत्तरेस- अंदुरा ते सोनाळा रोड, व दक्षीणेस-खारोडे यांची शेतजमीन. सदर वर्णनीत शेतजमिनीवर कोणाचाही हक्क व अधिकार असल्यास तसेच सदर शेतजमिनीवर सार्वजनिक, खाजगी, वित्तीय संस्थेचा अथवा सहकारी संस्थेचा बोजा असल्यास अथवा सदर शेतजमिनीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा हितसंबंध असल्यास त्याबाबत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे आंत आमचे पक्षकारांच्या वर नमुद पत्त्यावर संबंधीत व्यक्ती अथवा संस्थेने लेखी हरकत कागदपत्रासह दाखल करावी. उपरोक्त नमुद मुदतीचे आंत कुणाचीही, कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार सौदाचिठठीनुसार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मग त्याबाबत कुणालाही कोणत्याही प्रकारे हरकत वा उजर घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस, शेगांव, दिनांक ३०.०५.२०२६.
पक्षकारांच्या सहया

**(डी.एच. चहाकर)**
ॲडव्होकेट, शेगांव.

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना तसेच वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी सुधीर प्रभाकरराव म्हैसने, निलेश प्रभाकरराव म्हैसने, मयत वसंतराव यशवंतराव म्हैसने तर्फे वारस - नितिन वसंतराव म्हैसने यांच्या मालकी व ताब्यातील मौजे वाडेगांव भाग-१ येथील भुमापन क्र. ३९६, क्षेत्रफळ १ हे. ६४ आर शेत जमीन ज्यांस चतुः सिमा पुर्वेस - शेत रस्ता, पश्चिमेस - अनिल मार्तंडराव सरप यांचे शेत, उत्तरेस - कारंजकर यांचे शेत व दक्षिणेस - काळे यांचे शेत ही शेत जमीन विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे.

सदर शेत जमीनी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, गहाण, बोजा व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशित झाल्याच्या तारखेपासुन सात दिवसांचे आंत माझ्याशी लेखी दस्तऐवजांसह संपर्क साधावा अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे पक्षकार निर्विवादपणे वरील वर्णनांकित शेत जमीनीचे खरेदी खत नोंदवुन घेतील. मात्र त्यांनतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क वा उजर चालणार नाही. सबब ही जाहीर नोटीस.

दिनांक :- ०५/०६/२०२६

**(ॲड. राजीव मदनकार)**
पत्ता :- इंजिनिअरींग कॉलनी,
सैनिक लेआऊट, मोठी उमरी, अकोला.
मो. ९८५०७६७५४७

## आज अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण राज्यस्तरीय परिसंवाद कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■



राष्ट्रीय चर्मकार महासंघ, राजकुमार बडोले फाउंडेशन व संत गुरु रविदास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आज शनिवार ६ जून रोजी दुपारी २ वाजता खडकी येथील डॉ आंबेडकर प्रतिष्ठान येथे अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण राज्यस्तरीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. यात अनुसूचित जातीतील ५९ जातीचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.या परिसंवाद मध्ये राज्याचे माजी समाज कल्याण मंत्री राजकुमार बडोले तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप मार्गदर्शन करणार आहेत.त्याचबरोबर प्रमुख वक्ते म्हणून नागपूर विद्यापीठाची माजी कुलसचिव पुरणचंद्र मेश्राम. मुंबई विद्यापीठाचे डॉ. संदेश वाघ. डॉ. गणेश बोरकर, लक्ष्मणराव घुमरे, संस्थापक अध्यक्ष गुरु रविदास चर्मकार महासंघ,संजय खामकर संस्थापक अध्यक्ष चर्मकार विकास संघ.राष्ट्रीय चर्मकार संघाचे प्रवक्ते रोहिदास बनसोडे,डॉ.विठ्ठल दांडगे,प्रदेश सचिव दत्तात्रेय संतोष प्रदीप चौरे आदी परिसंवादात सहभाग घेणार आहेत.या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सत्काराचे ही प्रयोजन करण्यात आले आहे.औरंगाबाद येथे चर्मकार समाजाचे धर्मांतर करून बौद्ध धर्माची दीक्षा देणारे श्रावण गायकवाड,प्रा. डॉ.संतोष बनसोड संस्थापक अध्यक्ष प्रज्ञा सूर्य प्रतिष्ठान अमरावती,प्रा. मुकुंद भारसाकडे, अशोक इंगळे रमेश तायडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान अकोला,पातुर नंदापूर येथे बुद्ध विहाराला तीन एकर जमीन दान देणारे भगवंतराव पाटील, किसान ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष नाना वराडे आदींचा सामाजिक योगदानाबद्दल सत्कार करण्यात येणार आहे . अनुसूचित जातीतील एकूण ५९ जातीच्या प्रतिनिधींनी व पुरोगामी विचारांचा नागरिकांनी या परिसंवादात सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक डॉ. गणेश बोरकर यांनी केले.

## धामणा येथील श्री मारोती संस्थानसाठी विश्वस्त नेमणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

धर्मादाय सहआयुक्त, अमरावती यांच्या आदेशानुसार धामणा येथील श्री मारोती संस्थानसाठी महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४७ प्रमाणे नवीन विश्वस्तांची नेमणूक करण्यात येणार आहे.

या न्यासात कोणाला विश्वस्त होण्याची इच्छा असेल तसेच यासंबंधीच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणाला काही हरकत घ्यावयाची असेल किंवा पुरावा द्यावयाचा असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आपले म्हणणे ३० दिवसांच्या आत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती यांना पाठवावे. चौकशी पूर्ण करून निकालाबाबत योग्य आदेश दिले जातील, अशी नोटीस सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या अधिक्षकांनी (न्याय) काढली आहे.

धर्मादाय सहआयुक्त कार्यालयाचा पत्ता म्हाडाभवन, दुसरा माळा, तात्या टोपेनगर, माल टेकडीजवळ, अमरावती असा आहे.

## लोकप्रतिनिधी घडविण्यात BLO-SIR यंत्रणेची भूमिका महत्त्वाची : राजन साळवी

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

ग्रामपंचायत सदस्यापासून ते लोकसभा खासदारापर्यंत कोणत्याही लोकप्रतिनिधीच्या निवडणुकीत बूथस्तरावरील कार्यकर्ते आणि BLO-SIR यंत्रणेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. लोकप्रतिनिधी होण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकाने BLO-SIR चे महत्त्व समजून घेऊन संघटनात्मक कामात सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन शिवसेना अकोला जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी आमदार राजन साळवी यांनी केले.

मूर्तिजापूर येथील भागधारक भवनात आयोजित BLO-SIR (बूथ) प्रशिक्षण शिबिरात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.





यावेळी व्यासपीठावर माजी निवडणूक अधिकारी अविनाश कणसे, मुंबईचे नगरसेवक संजय अगलदरे, शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे, युवासेना लोकसभा संपर्कप्रमुख विठ्ठल सरप, महिला आघाडी जिल्हाप्रमुख उषाताई विरक, तालुकाप्रमुख दीपक दांदळे, धनंजय ढोके, देवाशीष भटकर, माजी उपसभापती गंफू शर्मा, नगरसेवक संदीप ढोरे, गौरव मोरे, अरुण माकोडे, श्रुती सुतारे, महिला आघाडी तालुकाप्रमुख, डॉ. अशोक ओळंबे, संतोष अनासने, आसिफ खान, प्रशांत घोरपडे, अभिजीत मुळे, फिरोज खान आदी उपस्थित होते.

प्रशिक्षण शिबिरात प्रशांत घोरपडे यांनी बूथस्तरावरील कामकाज, मतदार पडताळणी प्रक्रिया, शिस्त आणि संघटनात्मक जबाबदाऱ्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच BLO-SIR च्या कार्यपद्धतीचे महत्त्व विशद करत बूथ प्रमुखांनी पार पाडावयाच्या जबाबदाऱ्यांची माहिती दिली. दिवसभर चाललेल्या या प्रशिक्षण शिबिराला मूर्तिजापूर मतदारसंघातील BLO-SIR (बूथ) प्रमुखांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतल्याची माहिती अनिल मालगे यांनी दिली.

## आज सहकार नगर येथे शिवराज्याभिषेक दिन सोहळा

■ प्रतिनिधी | अकोला ■



छत्रपती शिवाजी महाराज यांचे ज्वाजल्य देशभक्तीपर विचार घराघरात पोहोचवण्यासाठी अनेक उपक्रम राबविणाऱ्या स्थानिक सहकार नगर येथील शिवस्मारक समितीच्या वतीने आज शनिवार दि ६ जून रोजी स ९ वाजता सहकार नगर, गोरक्षण रोड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या उत्सवात शिवस्मारक समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास परिसरातील नागरिक व समितीच्या पदाधिकाऱ्याच्या वतीने सामूहिक पणे मानाचा मुजरा करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित व्याख्यान होणार आहे.या उत्सवात शिवप्रेमी महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवस्मारक समितीच्या समस्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले.

## लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान**

■ प्रतिनिधी | अकोला ■

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'महा आयकॉन २०२६' हा जीवनगौरव पुरस्कार देऊन पुढारी' माध्यम समूहातर्फे गौरव करण्यात आला.

केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला.(राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ अनिल काकोडकर, प्रतापसिंह जाधव आणि योगेश जाधव मंचावर उपस्थित होते.



महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'पुढारी' माध्यम समूहाने 'महा आयकॉन २०२६' या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

# जिल्ह्यासाठी 491 कोटी 70 लाखांचा नियतव्यय मंजूर

## आवश्यक विकासकामांचे प्रस्ताव वेळेत सादर करा - पालकमंत्री

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ मध्ये ४९१ कोटी ७० लक्ष रू. नियतव्यय मंजूर आहे. विकासाच्या दृष्टीने आवश्यक व व्यापक लोकहित साधणा-या विकासकामांचा आराखड्यात समावेश करावा. जिल्ह्यात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कामे पूर्ण होण्यासाठी मान्यता व इतर प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी, असे निर्देश राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे दिले.



जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, प्रकाश भारसाकळे, हरीश पिंपळे, नितीन देशमुख, वसंत खंडेलवाल, किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, साजिद खान पठाण, जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, महापालिका आयुक्त सुनील लहाने आदी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, सन २०२६-२७ या वर्षात सर्वसाधारण योजनेत ३८७ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेत ८७ कोटी व आदिवासी उपयोजनेत १७.७० कोटी नियतव्यय मंजूर आहे. कामांचे नियोजन करताना जिल्ह्यातील मान्यवर लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन त्याचा समावेश आराखड्यात करावा. आवश्यक कामे दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी प्रक्रिया गतीने राबवावी.

**सेल्फ ऑडिट करा :** ते पुढे म्हणाले की, सर्वांगीण विकासाला चालना मिळेल व व्यापक लोकहिताच्या कामांचा समावेश व्हावा. कार्यालयांनी अवास्तव प्रस्ताव पाठवू नये. कुठलेही अवास्तव प्रस्ताव मंजूर केले जाणार नाहीत. कामांना मान्यता व निधी दिला जातो; तथापि, अनेकदा कामांत गंभीर चुका झाल्याचे आढळते. अशा चुका करणा-यांवर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई केली जाईल. तसे कदापि घडता कामा नये. त्यासाठी कार्यालयांनी 'सेल्फ ऑडिट' करून वेळीच चुका दुरूस्त केल्या पाहिजेत.

### अनुपस्थितांना कारणे दाखवा नोटीसा

लोकप्रतिनिधींनी बैठकीत मांडलेल्या सूचनांचे अनुपालन तत्काळ पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील बैठकीची वाट पहावी लागू नये. बैठकीला अनुपस्थित असलेल्या अधिका-यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्याचे निर्देश त्यांनी दिले.

सन २०२५-२६ या वर्षातील सर्वसाधारण योजनेत ३३३ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेत ८८ कोटी, आदिवासी उपयोजनेतील १६ कोटी ५१ लक्ष रू. निधीतून अनेक विकासकामांवर झालेल्या एकूण ४३७ कोटी ५१ लक्ष रू. खर्चाला सभेत मान्यता देण्यात आली. सन २०२६-२७ या वर्षात ४९१ कोटी ७० लक्ष रू. मंजूर नियतव्यय असून, २४२ कोटी ८२ लक्ष निधी प्राप्त आहे. त्यानुसार विकासकामांना चालना देण्यात निर्देश देण्यात आले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# ‘काँग्रेस विकणे आहे’ असा बोर्ड लागणार का ?

**वर्धा/ रवींद्र लाखे**

आतापर्यंत ‘घर विकणे आहे’, ‘शेती विकणे आहे’, ‘प्लॉट विकणे आहे’, ‘गाव विकणे आहे’ अशा जाहिराती जनतेने पाहिल्या. मात्र आता चक्क ‘काँग्रेस पक्ष विकणे आहे असा बोर्ड लावण्याची वेळ आली आहे काय, अशी संतप्त आणि उपरोधिक चर्चा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये सुरू झाली आहे.

वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार शैलेश अग्रवाल यांनी ऐनवेळी माघार घेतल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय वादळाने आता काँग्रेसच्या अंतर्गत संघर्षाचे रूप धारण केले आहे.

भाजपचे अरुण लखानी यांची अविरोध निवड झाल्यानंतर काँग्रेसमध्ये नाराजीचा स्फोट झाला असून, कार्यकर्ते नेतृत्वावर उघडपणे प्रश्न उपस्थित करू लागले आहेत. निवडणूक लढविण्याऐवजी माघार घेण्यामागे नेमके कोणते राजकारण होते, याची चर्चा गावागावांत रंगली आहे. विशेष म्हणजे, उमेदवारी मागे घेतल्यानंतर शैलेश अग्रवाल यांनी केलेल्या आरोपांनी काँग्रेसच्या गोटातच भूकंप घडवून आणला आहे.अग्रवाल यांनी थेट काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांच्यावर निशाणा साधत, ‘विजय वडेट्टीवार काँग्रेस विकायला निघाले आहेत, असा गंभीर आरोप केल्याने राजकीय वातावरण तापले आहे. या आरोपामुळे केवळ वडेट्टीवारच नव्हे तर संपूर्ण काँग्रेस नेतृत्व बचावाच्या भूमिकेत गेले आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, हा आरोप केवळ व्यक्तीवर नसून पक्षाच्या निर्णयप्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारा आहे. काँग्रेसच्या अनेक जुन्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढली असून, ‘संघर्षाची परंपरा असलेल्या पक्षात आता व्यवहारांचे राजकारण सुरू झाले आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**दुधावरची साय कोणी खाल्ली?**

विधान परिषद निवडणूक जाहीर होताच अनेक राजकीय मंडळी सक्रिय झाली होती. कायकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नेते आपापली गणिते मांडत होते.

मात्र निवडणूक अविरोध झाल्यानंतर सर्वच समीकरणे कोलमडली. ‘दुधावरची साय खाण्याची स्वप्ने पाहणाऱ्यांच्या हातात आता रिकामा वाडगा उरला, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

भाजपने आपला उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यात यश मिळविले, तर काँग्रेसमध्ये मात्र संशय, आरोप आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

निवडणूक न लढताच मैदान रिकामे केल्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना हा पक्षाच्या लढाऊ प्रतिमेवर झालेला घाव वाटत आहे.



## शैलेश अग्रवाल यांच्या घणाघाती आरोपाने खळबळ; वडेट्टीवारांवर संशयाची सावली

## विधान परिषद अविरोधीनंतर काँग्रेसमध्ये राजकीय भूकंप

**राजेंद्र शर्मा - ईक्राम हुसेन यांचा इशारा : दिल्लीत ठाण मांडणार**

दरम्यान, शहर काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष राजेंद्र शर्मा, वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी उपाध्यक्ष ईक्राम हुसेन यांनीही या संपूर्ण प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शैलेश अग्रवाल यांनी पक्षावर आणि वरिष्ठ नेतृत्वावर केलेले आरोप अत्यंत गंभीर आहेत. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी याची दखल घेऊन कठोर कारवाई करावी. राजेंद्र शर्मा व ईक्राम हुसेन यांनी इशारा देताना म्हटले की, शैलेश अग्रवाल यांची पक्षातून हकालपट्टी करण्यासह विजय वडेट्टीवार यांच्यावर होत असलेल्या आरोपांची सखोल चौकशी व्हावी, यासाठी आम्ही दिल्लीत जाऊन पक्ष नेतृत्वासमोर भूमिका मांडणार आहोत. गरज पडल्यास दिल्लीत ठाण मांडू.त्यांच्या या भूमिकेमुळे काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# जगताना हाल... मेल्यावरही वणवण

## दहा वर्षांपूर्वी स्मशानभूमी बांधली, पण रस्ता नसल्याने एकही चिता पेटली नाही

**आष्टी/ जनमाध्यम**



माणसाच्या आयुष्याचा शेवटचा प्रवास तरी सन्मानाने व्हावा, यासाठी शासन विविध योजना राबवते. मात्र आष्टी तालुक्यातील खंबीर गावात प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराने मृत्यूनंतरही माणसाच्या सन्मानाची अक्षरशः राख रांगोळी केली आहे. तब्बल दहा वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्चून स्मशानभूमी उभारण्यात आली, पण तिथे जाण्यासाठी रस्ताच नसल्याने आजपर्यंत त्या ठिकाणी एकाही मृतदेहावर अंत्यसंस्कार होऊ शकले नाहीत.

वर्धा नदीच्या काठावरील उंच जागेवर उभारलेली ही स्मशानभूमी आज ओस पडली आहे. गावात एखाद्याचा मृत्यू झाल्यास नातेवाईकांना अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी नदीच्या पात्रातच अंत्यसंस्कार करण्याची वेळ येते. विशेषतः पावसाळ्यात हा प्रश्न अधिकच भीषण बनतो. मृत व्यक्तीला अखेरचा निरोप देतानाही ग्रामस्थांना हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. स्मशानभूमी बांधताना तेथे जाण्यासाठी रस्ता आवश्यक आहे, हे साधे भानही प्रशासनाला का राहिले नाही, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

निधी खर्च झाला, इमारत उभी राहिली, पण उपयोग शून्य. त्यामुळे हा विकास नसून जनतेच्या पैशांची उधळपट्टी असल्याची भावना गावकऱ्यांमध्ये आहे.जिवंतपणी संघर्ष आणि मृत्यूनंतरही सन्मानासाठी वणवण... खंबीर गावातील हे वास्तव शासनाच्या विकासाच्या दाव्यांवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करत आहे.

आता तरी प्रशासनाने जागे होऊन पावसाळ्यापूर्वी स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता मंजूर करून तातडीने पूर्ण करावा, अशी ग्रामस्थांची आर्त मागणी आहे. अन्यथा दहा वर्षांपासून चिता न पेटलेली ही स्मशानभूमी प्रशासनाच्या निष्क्रियतेचा कायमचा साक्षीदार ठरणार आहे.

# वादळाने ‘सेलू बस’ उडवली; महामंडळ मात्र झोपेत

**सेलू/ जनमाध्यम**

अवकाळी वादळाने सेलू शहरात अनेक ठिकाणी नुकसान केले, मात्र सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो सेलू बसस्थानकावरील उडालेला फलक. वादळाच्या तडाख्यात बसस्थानकाच्या मुख्य इमारतीवरील ‘सेलू बस स्थानक’ या नावातील ‘सेलू बस’ हे शब्दच गायब झाले असून आता फलकावर केवळ ‘स्थानक’ एवढाच शब्द शिल्लक राहिला आहे. मात्र याहून धक्कादायक बाब म्हणजे दोन-तीन दिवस उलटूनही एसटी महामंडळ प्रशासनाला याचे कोणतेही सोयरसुतक नसल्याचे दिसून येत आहे.या अर्धवट फलकाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू असून प्रवाशांकडून प्रशासनावर उपरोधिक टीकेची झोड उठली आहे.




**फलकावर उरले फक्त ‘स्थानक’**

बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांना हे नेमके कोणते स्थानक आहे, असा प्रश्न पडत आहे. काहींनी तर हे बसस्थानक आहे की दुसरे कोणते सरकारी स्थानक असा प्रश्न उपस्थित केला आहे.वादळाने फलकावरील अक्षरे उडवली, पण महामंडळाच्या अधिकाऱ्यांची झोप मात्र उडालेली नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. फलकावरील गावाचे नावच गायब झाले तरी त्याची दुरुस्ती करण्याची तसदी प्रशासन घेत नसल्याने एसटीच्या कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एकीकडे प्रवाशांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असताना दुसरीकडे बसस्थानकाची ओळखच पुसली जात आहे. आता तरी महामंडळ जागे होऊन ‘स्थानक’ला पुन्हा ‘सेलू बस स्थानक’ बनवणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. तोपर्यंत मात्र सेलूकरांच्या नशिबी एकच ओळख फक्त स्थानक.

# दीड वर्षांपासून कोरडे नळ

**आर्वी/ जनमाध्यम**

तालुक्यातील डबलीपूर गावात गेल्या दीड वर्षांपासून सार्वजनिक नळांना पाणीपुरवठा बंद असल्याने संतप्त ग्रामस्थांसह काँग्रेस व प्रहार सोशल फोरमने गटविकास अधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन छेडले. प्रहार सोशल फोरमचे संस्थापक तथा काँग्रेस नेते बाळा जगताप यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. ‘पाणी नाही, तर माघार नाही’ अशी ठाम भूमिका घेत आंदोलनकर्त्यांनी गटविकास अधिकारी यांच्या दालनात ठाण मांडले.



**काँग्रेस-प्रहारचा बीडीओ दालनात ठिय्या, प्रशासनाला अखेर जाग**

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेत गटविकास अधिकारी आशुतोष यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह चर्चेनंतर तातडीने पाणीपुरवठा सुरू करण्याचे तसेच दोन दिवसांत उर्वरित पाईपलाईनचे काम पूर्ण करून नियमित पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले.यावेळी बाळा जगताप यांनी प्रशासनाला इशारा देत, आश्वासनाची पूर्तता झाली नाही तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असे स्पष्ट केले.आंदोलनात एनएसयूआय आर्वी तालुकाध्यक्ष वेदांत वानखडे, विक्रम भगत, सोहेल खान, मनोहर उईके, भाऊराव पट्टे, कांचन सोमकुंवर, प्रवीण सोमकुंवर, पुष्पा इवनाते, संगीता परतेकी, दिक्षा सोमकुंवर, शिला रामटेके, प्रणाली सोमकुंवर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ महिला-पुरुष सहभागी झाले होते.

# अमृतच्यावतीने पर्यटन क्षेत्रातील उद्योगासाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम

**वर्धा/ जनमाध्यम**

अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेल्या अमृत पर्यटन उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक व नवउद्योजकांसाठी २ जुन पासुन उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या लाभ घेण्यासाठी अमृतच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अमृत पर्यटन हा महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी, स्थानिक रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी तसेच पर्यटनाशी संबंधित उद्योजकांना सक्षम करण्यासाठी राबविण्यात येणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या उपक्रमाद्वारे राज्यातील पर्यटनस्थळे, पर्यटन सेवा, स्थानिक उत्पादने व पर्यटन व्यवसायांना नवीन संधी उपलब्ध होणार आहे. पर्यटन क्षेत्र हे देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असून, या क्षेत्रात व्यवसाय विस्तार, रोजगार निर्मिती व आर्थिक प्रगतीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या संधींचा लाभ अधिकाधिक उद्योजकांना मिळावा आणि त्यांना आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन कौशल्ये प्राप्त व्हावीत, या उद्देशाने विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमात Tour & Travels व्यवसायिक, Tourist Guides, Cook & Caterers, होमस्टे व रिसॉर्ट संचालक, पर्यटन सेवा पुरवठादार, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाशी संबंधित उद्योजक तसेच पर्यटन क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणारे युवक-युवती सहभागी होऊ शकतात. कार्यक्रमादरम्यान सहभागी उद्योजकांना व्यवसाय उभारणी व विस्तारासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रभावी व्यवसाय नियोजन, आधुनिक विपणन तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, ग्राहक व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रेंडिंग, पर्यटन क्षेत्रातील नवीन व्यावसायिक संधी तसेब शासनाच्या विविध योजना व सहाय्याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.तसेच अनुभवी तज्ज्ञ व क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांकडून प्रत्यक्ष अनुभवाधारित मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार असून, सहभागी उद्योजकांना पर्यटन व्यवसाय अधिक प्रभावीपणे विकसित करण्यासाठी आवश्यक दिशा व मार्गदर्शन मिळणार आहे. अमृत पर्यटन अंतर्गत पर्यटन क्षेत्रात स्वयंरोजगार व उद्योजकता वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा लाभ पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योजक, व्यावसायिक आणि इच्छुक युवक-युवतींनी घ्यावा, अधिक माहितीसाठी अमृत वर्धा जिल्हा कार्यालय, प्रशासकीय भवन, तळ मजला, येथील कार्यालयाच्या ९११२२२७६३२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, अमृतच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# कुष्ठरोग निर्मूलनासाठी तालुकाभर घराघरांत सर्वेक्षण

**विरुळ (आ.)/ जनमाध्यम**

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उषा कवरासे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील ५९ गावांमध्ये १५ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत विशेष कुष्ठरोग निर्मूलन सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे.या मोहिमेदरम्यान आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक तसेच आशा स्वयंसेविका घरोघरी भेट देऊन नागरिकांमध्ये कुष्ठरोगाबाबत जनजागृती करीत आहेत. तसेच संभाव्य रुग्णांची तपासणी करून आजाराचे लवकर निदान करण्यावर भर दिला जात आहे.खरांगना, मोरांगना, रोहना व जळगाव या



प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून ही मोहीम प्रभावीपणे राबविली जात आहे.

तालुक्यासह जिल्हाभरातही सर्वेक्षण मोहीम सुरू असून नागरिकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करून या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन कुष्ठरोग अधिकारी डॉ. पराडकर यांनी केले आहे.

# जिल्ह्यात शुन्य कुष्ठरुग्ण गाव सर्वेक्षण अभियानाला सुरुवात




**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात शुन्य कुष्ठरुग्ण गाव सर्वेक्षण अभियानाला प्रारंभ झाला असून १८ जुन पर्यंत हे अभियान राबविले जाणार आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील शुन्य कुष्ठरुग्ण असलेल्या एकुण ३६० गावांमध्ये घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

यामध्ये सुमारे १ लाख ८२ हजार २७३ नागरिकांची शारीरीक तपासणी केली जाणार आहे. यासाठी नागरिकांनी आरोग्य विभागास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.या अभियानासाठी जिल्ह्यात तपासणी पथके तयार करण्यात आली असुन आरोग्य केंद्रस्तरावर सर्वेक्षणाची पाहणी केली जाणार आहे. तसेच तालुका व जिल्हास्तरीय अधिकारी मोहिमेचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करणार आहे. या पार्श्वभूमीवर कुष्ठरोगचे सहाय्यक संचालक डॉ. रा.ज.पराडकर यांच्या मार्गदर्शनात तालुका वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांची सभा घेऊन शुन्य कुष्ठरुग्ण गाव सर्वेक्षण अभियानाची माहिती देऊन कुष्ठरोगाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच कुष्ठरोगाची संशयीत लक्षणे, निदान आणि तांत्रिक बाबी विषयी माहिती देण्यात आली. सर्वेक्षणामध्ये माहे मे अखेर जिल्ह्यामध्ये एकुण ३ नविन रुग्णाचे निदान झाले असल्याचे सहाय्यक संचालक डॉ.रा.ज.पराडकर यांनी कळविले आहे.

# पुलगाव पालिकेच्या नाली बांधकामात निकृष्ट कामाचा आरोप

## एकाच सळाखीवर स्लॅब, कमी सिमेंट-लोखंडाचा वापर; ठेकेदाराला अभियंत्यांचे अभय असल्याची शहरात चर्चा

**पुलगाव/ जनमाध्यम**

पुलगाव नगरपालिकेच्या बांधकाम विभागाचा कारभार पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. रेल्वे परिसरातील जय भारत हेयर सलून ते जुने ग्रामीण रुग्णालय या मार्गावरील नाली बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे कमी प्रमाणात लोखंड आणि सिमेंट वापरून काम सुरू



असतानाही संबंधित यंत्रणा डोळेझाक करत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नालीवरील स्लॅबसाठी आवश्यक तांत्रिक निकषांना फाटा देत केवळ एकाच लोखंडी सळाखीच्या आधारावर बांधकाम करण्यात येत आहे. अशा प्रकारचे बांधकाम किती दिवस टिकणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. जनतेच्या पैशातून होणाऱ्या कामात दर्जाशी तडजोड करून कोणाचे हितसंबंध जोपासले जात आहेत, याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

या कामाला नगरपालिकेतील बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांचे अभय असल्याचा आरोपही होत आहे. त्यामुळे ठेकेदार बिनधास्तपणे काम करत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. ‘रोजगार हमी नव्हे, तर अर्धे तुम्ही आणि अर्धे आम्ही’ अशी उपरोधिक टीका करत नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.दरम्यान, संबंधित ठेकेदारावर यापूर्वीही निकृष्ट व बोगस कामांचे आरोप झाल्याची चर्चा पुलगाव शहरात सुरू आहे. त्यामुळे या नाली बांधकामाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.जनतेच्या पैशातून उभे राहणारे बांधकाम मजबूत असावे की कमिशनच्या भाराखाली कमकुवत? हा प्रश्न आता पुलगावकर प्रशासनाला विचारत आहेत.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १८९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ७ वाहनातून गोवंश तस्करी १८ लाख २४ हजाराचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी/प्रतिनिधीः-** गोवंश जातीचे जनावरे अवैध्यरीत्या कत्तलीसाठी नेत असतांना मोर्शी वाहतूक शाखेच्या पोलीस अंमलदार यांनी दि.२ जून रोजी वरुड मोर्शी रोडवर नाकाबंदी करून १४ गोवंश जनावरांसह ७ वाहने ताब्यात घेऊन एकूण १८ लाख २४ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तली करीता वाहतुक करणाऱ्या ईसमांविरूध्द कार्यवाही करण्याबाबत निर्देशीत केले असता पोलीस निरिक्षक राहुल आठवले यांनी त्यांचे अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी, अंमलदार



तसेच वाहतुक शाखेचे अंमलदार यांना अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या ईसमां विरूध्द कार्यवाही करण्या करीता आदेशीत केले. दि. २ जून रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी ग्राम हिवरखेड येथील बोपापुर शेतशिवार ग्राम हिवरखेड येथुन आरोपी नामे सुभाष बापुराव पंडोले याने कत्तली करण्याकरीता विक्री करण्याचे उद्देशाने अतिशय क्रूरपणे बांधुन ठेवलेले तिन गोवंश जनावरे किं अं ६२,००० रू च्या गोवंश जनावरांची सुटका करून त्यांना जिवनदान दिले व आरोपीविरूध्द पो. स्टे.मोर्शी येथे गुन्हा नोंद केला.त्याच दिवशी वाहतुक शाखेचे अंमलदार यांनी वरूड मोर्शी रोडवर नाकाबंदी करून अवैध गोवंश जनावरांची कत्तली करीता वाहतुक करणारे एकुण ७ वाहने किं.अं. १५,००,००० ज्यामध्ये एकुण १४ गोवंश जनावरे एकुण किं.अंदाजे ३,२४,००० रू असा एकुण १८,२४,००० रू. चा मुद्देमाल जप्त करून ७ ईसमांविरूध्द वेगवेगळे गुन्हे नोंद करण्यात आले व गोवंश जनावरांना चारापाण्याकरीता गौरक्षण संस्थान येरला येथे दाखल करण्यात आले.मध्यप्रदेश येथून अवैध जनावरांची तस्करी दिवसेंदिवस वाढत चालली असून शासनाने यावर वेगळा कायदा अमलात आणून तस्करी करणाऱ्यांवर कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी गोरक्षकांनी केली आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेतन कदम,अप्पर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड,उपविभागीय पोलीस अधिकारी मोर्शी, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले ठाणेदार पो स्टे मोर्शी यांचे नेतृत्वात पो.स्टे.मोर्शी येथील पोउपनि आकाश शिवणकर,पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर,अथर्व कोहळे,तसेच वाहतुक शाखेचे अंमलदार सुधिर राणा,निखिल विधे, धर्मपाल उगले,राजकुमार थोटे यांचे पथकाने केली आहे.

# जिल्ह्यातील शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

## -३० जूनपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, इतर मागासवर्ग आणि आर्थिक मागास प्रवर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इयत्ता ८ वी ते १० वी शालेय स्तर, तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना या वसतिगृहांमध्ये मोफत निवास, भोजन व इतर सर्व सोयी-सुविधा पुरविल्या जातात. इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी सर्वप्रथम https://hmas.mahait.org या अधिकृत पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक असून, त्यानंतर त्या अर्जाची प्रिंट काढून ती संबंधित वसतिगृहात ऑफलाईन पद्धतीने जमा करणे आवश्यक आहे.

अमरावती शहरातील निंभोरा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (युनिट क्र. १, २, ३) व संत गाडगे महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह, तसेच मुलींसाठी कॅम्प परिसरातील व जेल रोडवरील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहाच्या विविध युनिट्समध्ये ही प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. यासोबतच जिल्ह्यातील तालुका स्तरावरील मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्येही अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. वेळापत्रकानुसार, इयत्ता ८ वी ते १० वीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० जून २०२६ असून, त्यांची पहिली प्रवेश यादी ७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल. कनिष्ठ महाविद्यालय व अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येतील, तर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी वेळेत आपले अर्ज संबंधित वसतिगृहाकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले असून, अधिक माहितीसाठी ०७२१-२६६१२६१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे कळविण्यात आले आहे.

# शेगाव नाका ते रहाटगाव परिसरात प्लास्टिक जप्ती मोहीम

## -१० हजारांचा दंड वसूल

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले (झोन क्र. १) यांच्या मार्गदर्शनाखाली शेगाव नाका ते रहाटगाव परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण १६ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये महालक्ष्मी प्रोव्हिजन या आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आल्याने संबंधित आस्थापनावर ५,००० दंडाची कारवाई करण्यात आली.

तसेच पाच आस्थापनांमध्ये आवश्यक डस्टबिन उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आल्याने अश्वजीत पांडे, अंकुश मोहिते, पवन कोपे, शैलेश गावंडे आणि निलेश दगाड यांच्यावर प्रत्येकी १,००० प्रमाणे दंड आकारण्यात आला. या कारवाईतून एकूण १०,००० दंड वसूल करण्यात आला.

महानगरपालिकेच्या या विशेष मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजू डीक्याव, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, मेघराज ढेनवाल, निखिल खंगाळे, परिक्षीत गोरले, शाहू जवंजाळ, इमरान खान, रोहित हडाले, मनीष नकवाल आणि एम. सैय्यद यांनी सहभाग घेतला.

महानगरपालिकेने नागरिक व व्यावसायिकांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच स्वच्छता नियमांचे पालन करून आवश्यक डस्टबिनची व्यवस्था ठेवण्याचे आवाहन केले आहे. भविष्यातही अशा विशेष मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

# वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट'

## बसविण्याची अंतिम मुदत ३० जून

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्रीय मोटार वाहन नियमान्वये महाराष्ट्र शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची तरतूद केली आहे. वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची अचूक ओळख पटविणे आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविणे आवश्यक असून सर्वोच्च न्यायालयानेही तसे निर्देश दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांसह शासकीय, निमशासकीय कार्यालये व बँकांनी त्यांच्या १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे.




यापूर्वी यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती, परंतु आता ही मुदत वाढवून ३० जून २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. विहित मुदतीनंतर एचएसआरपी नंबरप्लेट नसलेली वाहने किंवा बनावट एचएसआरपी असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाईल, तसेच अशा वाहनांचे परिवहन कार्यालयातील कामकाज थांबविण्यात येईल, असा इशारा प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिला असून सर्व वाहनधारकांनी ३० जूनपूर्वी ही नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन केले आहे.

# अनुसूचित जातीच्या शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अमरावती जिल्ह्यात अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या शासकीय निवासी शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतच्या पात्र विद्यार्थ्यांना या शाळांमध्ये निवासी राहून सर्व सोयी-सुविधांसह मोफत शिक्षण दिले जाणार आहे. या शाळांमध्ये सुसज्ज शासकीय इमारत, तज्ज्ञ शिक्षकवृंद, सुसज्ज ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा, राहण्याची उत्तम व्यवस्था, मोफत शैक्षणिक साहित्य व गणवेश, खेळाचे साहित्य, नाश्ता व भोजनाची व्यवस्था तसेच अद्ययावत डिजिटल रुमद्वारे उत्कृष्ट अध्यापनाची सोय शासनातर्फे करण्यात आली आहे.जिल्ह्यातील मुलांसाठी नांदगांव खंडेश्वर (ता. नांदगांव खंडेश्वर), तुळजापुर (ता. चांदुर रेल्वे), सामदा (ता. दर्यापुर) व बेनोडा (ता. वरुड) येथे तर मुलींसाठी हिंगणगांव-कासारखेड (ता. धामणगांव रेल्वे), बुरडघाट (ता. अचलपुर) व पांढरी (ता. अंजनगांव सुर्जी) या शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१०३९/२०२६**
**शालिनी व तिन वि.निरंक**
**पुढील ता.२५.०६.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. शालिनी बाबाराव कुंभारकर, वय ७५ वर्षे, धंदा-गृहिणी
२. वैशाली अभयराव कुंभारकर, वय ५० वर्षे, धंदा-गृहिणी
३. पल्लवी अभय कुंभारकर, वय ३० वर्षे, धंदा-गृहिणी
४. वैष्णवी अभय कुंभारकर, वय २१ वर्षे, धंदा-शिक्षण
सर्व रा.१६, विमल नगर, फर्शी स्टॉप, अमरावती

-- विरुध्द --

**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अभय बाबाराव कुंभारकर** हे दिनांक **१२.०३.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार शालिनी बाबाराव कुंभारकर + ३** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शालिनी बाबाराव कुंभारकर + ३** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**तहसीलदार चांदूर बाजार यांचे न्यायालय**
**(जन्म-मृत्यू प्रमाणपत्र शाखा)**

**क्र./समअ/कावी-४१७/२०२६** **दिनांक ०२.०६.२०२६**

**जाहीरनामा**

**अर्जदार -** **अनिकेत शंकरराव खरपकर, रा.टाकरखेडा पुर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती**

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** **निबंधक जन्म मृत्यू, नोंदणी तथा ग्रामपंचायत टाकखेडा पुर्णा ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते की, अनिकेत शंकरराव खरपकर, रा. टाकरखेडा पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे जन्म दिनांक १८.११.१९९८ त्यांचा राहत्या घरी झाला. परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत टाकरखेड पुर्णा ता, चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म-मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत टाकरखेडा पुणा पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती हददीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत टाकरखेडा पुणा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून दहा दिवसाच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात,मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहिरनामा आज दिनांक ०२.०६.२०२६ रोजी माझया सही व शिक्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का
सही/-
**तहसीलदार,**
**तथा तालुका दंडाधिकारी**
**चांदूर बाजार**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २४९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**पाहिजेत**

**आनंद कनिष्ठ महाविदयालय कला व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (जुने एमसीव्हीसी ) वलगाव, ता.जि.अमरावती येथे खालील पदे घडयाळी तासिका तत्वावर (सीएचबी) भरणे आहे.**

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | शाखा |
|---|---|---|---|
| १ | मराठी | **एम.ए.मराठी व्दितीय श्रेणी बी.एड.** | कला व उ.मा.व्या.अ. करिता |
| २ | समाजशास्त्र | **एम.ए.समाजशास्त्र व्दितीय श्रेणी बी.एड.** | कला करिता |
| ३ | इंग्रजी | **एम.ए.इंग्रजी व्दितीय श्रेणी बी.एड.** | उ.मा.व्या.अ. करिता |
| ४ | पायाभूत | **एम.कॉम.व्दितीय श्रेणी बी.एड.** | उ.मा.व्या.अ. करिता |

ईच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने आनंद कनिष्ठ महाविदयालय (एस.डी.जी.शैक्षणिक संकुल ) वलगांव पोलीस स्टेशन समोर दिनांक १३/०६/२०२६ रोजी सकाळी ९ ते ११.३० पर्यत मुलाखतीस मुळ प्रमाणपत्रासहीत हजर राहावे.

प्राचार्य/सचिव
शाळा समिती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.९००/२०२६**
**सुशीला अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील ता.१८.०६.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sushila Panurangji Vairale (Widow) Aged about 75 Yrs. Occu.: Household
2. Vivek Pandurangi Vairale, (Son) Aged about 53Yrs. Occu.: Service
3. Manish Pandurangi Vairale (Son) Aged about 47 Yrs. Occu.: Service
All nos. 1 to 3 are R/o Hardik Colony, Near Viduyat Nagar, V.M.V. Area, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Panurangji Tulshiramji Vairale** हे **दि.०५.१२.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार **Sushila Panurangji Vairale + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sushila Panurangji Vairale + 2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

**जाहीर नोटीस**

अंतोरा सेवा सहकारी सोसायटी र.नं. ३४५ श्री शेतकरी सुधाकर गणेशराव बारबुदे नियमित कर्जदार यांना रुपये १,७५,०००/- (एक लाख पंच्याहत्तर हजार रुपये फक्त) कमी मिळाले आहे. त्यांचे क्षेत्र २ हे. ४९ आर, सर्वे नंबर २७२ मौजा अंतोरा यांनी बँकेचा भरणा दिनांक ३१/३/२०२६ ला रुपये २,६०,०००/-(दोन लाख साठ हजार रुपये फक्त) केलेला आहे. त्यांचे कर्ज मंजुर रुपये २,९०,०००/- बँकेने करायला पाहिजे अशी त्यांची मागणी आहे. सामाईक क्षेत्र यांचा त्यांनी १०० रुपये स्टॅम्प पेपरवर ॲप्युटेड मा.तहसिलदार साहेब यांच्या सहिने सामाईक क्षेत्रातील मंगला व वसंत यांना सोबत घेऊन स्टॅम्प सोसायटीचे सचिव व बँकेचे तपासणी अधिकारी श्री वानखडे यांच्या स्वाधीन केलेले आहे. कायदेशिर कारवाई करण्यास जाहीर नोटीस देत आहे.

**प्रतिनिधी**
**डी.डी.आर ऑफीस**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**कांतानगर,अमरावती**

**सचिव**
**काळे साहेब**
**अंतोरा सेवा सोसायटी**
**र.नं. ३४५**

**जिल्हाधिकारी कार्यालय**
**अमरावती**
**श्री येरेकर साहेब**

**कर्ज विभाग**
**जिल्हा मध्यवर्ती बॅंक**
**मेन शाखा अमरावती**
**श्री बढिये साहेब**

**आपला विश्वासू**
**नियमित कर्जदार**
**मो-८०८०६९५८६१**
**अंतोरा**
**सुधीरभाऊ बारबुदे**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे अहिल्यादेवी शेळी मेंढी पालन सहकारी संस्था, म.मोझरी, रजि.नं. ३९७, ता.तिवसा, जि.अमरावती यांचे तर्फे अध्यक्ष श्री लक्ष्मण कृष्णराव खाडे, रा.करडे नगर, कठोरा रोड, अमरावती तसेच सचिव श्री ज्ञानेश्वर नामदेवराव ढोमने, रा.श्री. नारायण नगर, कठोरा रोड, अमरावती यांनी श्री विनायक पंजाबराव जगताप, रा. एस.बी.आय कॉलनी समोर कॅम्प, अमरावती यांच्या मालकी व ताब्यातील खालील नमुद दोन शेतजमिनी विकत घेण्याचा सौदा केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन** -

**१) नोंदणी तुकडी अमरावती, पोट तुकडी तिवसा, जिल्हा परिषद, अमरावती, पंचायत समिती तिवसाचे कक्षेतील मौजा-धोत्रा, प्रगणे- कु-हा, ता.तिवसा, जि.अमरावती येथील शेत विभाग क्र.२ मधील शेत सर्वे नं.१५७, भोगवटदार वर्ग-१, क्षेत्र २ हेक्टर ४३ आर, आकार रु. ४.४५ पैसे, यापैकी विनायक पंजाबराव जगताप यांच्या हिश्यातील, मालकी व ताब्यातील व उपभोगातील पुर्वेकडील भागाची ०.९६ आर वाहितीयोग्य व ०.६ आर पोटखराब अशी एकुण १ हे ०२ आर, याचा आकार रु.१.८० पैसे** कोरडवाहू शेतजमीन सालीम व शेतामधील इतर झाडाझुडुपासह वर नमुद माझे पक्षकार यांनी विकत घेण्याचा सौदा केलेला आहे, याची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - धोत्रा माळेगाव रोड,
पश्चिमेस - अविनाश मैदनकर यांचे शेत
उत्तरेस - जीवन मधुकर मैदनकर यांचे शेत,
दक्षिणेस- बाबाराव महादेवराव रंगारी यांचे शेत

**२) नोंदणी तुकडी अमरावती, पोट तुकडी तिवसा, जिल्हा परिषद, अमरावती, पंचायत समिती तिवसाचे कक्षेतील मौजा-धोत्रा, प्रगणे- कु-हा, ता.तिवसा, जि.अमरावती येथील शेत विभाग क्र.२ मधील शेत सर्वे नं.१५७, भोगवटदार वर्ग-१, क्षेत्र २ हेक्टर ४३ आर, आकार रु. ४.४५ पैसे, यापैकी विनायक पंजाबराव जगताप यांच्या हिश्यातील, मालकी व ताब्यातील व उपभोगातील पश्चिमेकडील भागाची १ हे ४१ आर, याचा आकार रु.२.६४ पैसे** कोरडवाहू शेतजमीन सालीम व शेतामधील इतर झाडाझुडुपासह वर नमुद माझे पक्षकार यांनी विकत घेण्याचा सौदा केलेला आहे, याची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - दादाराव हरिभाऊ मैदनकर यांचे शेत
पश्चिमेस - ज्ञानेश्वर भिमराव काळे यांचे शेत
उत्तरेस - जीवन मधुकर मैदनकर यांचे शेत,
दक्षिणेस- बाबाराव महादेवराव रंगारी यांचे शेत

उपरोक्त नमूद दोनही शेतजमीनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचे बॅंकेचे कर्ज, हितसंबंध, प्रकरण, वादविवाद, लिज पेंडस, अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसाचे आत पुर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. मुदती नंतर माझे पक्षकार सदर्हू शेत जमीनीचा सौदा करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

याकरिता सदर जाहीर नोटीस

**ठिकाण :-अमरावती**
**दिनांक ०५/०६/२०२६**

**ॲड. अमोल सी.मुरळ**
रा.चिमोटे ले आउट, दस्तुर नगर
जूना बायपास रोड, अमरावती
मो.९६६५३६५७७६

**चौकशीची जाहीर नोटीस**

**(नमुना क्र.०२)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
**२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती**

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.** 89/2026
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक** **जेतवन बौध्द स्मशानभूमी चॅरिटेबल ट्रस्ट राहुल नगर जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती**
**बाबत अर्जदार -** **संदिप भगवान कांबळे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,
सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** ११,०००/-
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०४.०६.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

**चौकशीची जाहीर नोटीस**

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.: २३६/२२/२०२६**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, अमरावती** **एफ- २६७४**
बाबत अर्जदार - **प्रसन्ना जगन्नाथ गायकवाड**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,
सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -१.** मौजा वडाळी प्रगणे- नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील, शेत सर्वे नं.२६/२, भो. वर्ग-१, एकुण क्षेत्र ३ हेक्टर १५ आर त्याची चर्तुसिमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस :- श्री दादाराव तिडके यांचे शेत
पश्चिमेस :- गोरक्षणाचे शेत
उत्तरेस :- शेत सर्वे नं. २९ (२)
दक्षिणेस :- श्री परशराम उदेभानजी घोडे यांचे शेत.

**२.** मौजा वडाळी प्रगणे- नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील, शेत सर्वे नं.२७/१, भो. वर्ग-१, एकुण क्षेत्र ४ हेक्टर ६९ आर आकार रुपये १०.०५ या पैकी खरेदी देणार यांच्या मालकीचे शेत ३ हेक्टर २४ आर यातील पु.प.वाटणीचे दक्षिणेकडील शेताचा भाग याचे क्षेत्रफळ ० हेक्टर ८१ आर (२ एकर ० गुंठे) त्याची चर्तुसिमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस :- श्री गोसावी यांचे शेत
पश्चिमेस :- चांदूर रेल्वे रोड
उत्तरेस :- खरेदी करुन देणार यांच्या शेताचा भाग
दक्षिणेस :- श्री नामदेवराव संभाजी भस्मे व इतर २९ सदस्यांनी खरेदी केलेला शेताचा भाग.

**३.** मौजा वडाळी प्रगणे- नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील, शेत सर्वे नं.२७/१, भो. वर्ग-१, एकुण क्षेत्र ४ हेक्टर ६९ आर आकार रुपये १०.०५ या पैकी चे शेत ३ हेक्टर २४ आर व हयापैकी खरेदी देणार यांच्या मालकीचे असलेले शेताचे क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर कोरडवाहू व या पैकी पु.प.वाटणीचे दक्षिणेकडील खरेदीदार यांचेच मालकीचे शेताला लागून असलेला शेताचा भाग याचे क्षेत्रफळ १ हेक्टर ०० गुंठे (० हेक्टर-४० आर) त्याची चर्तुसिमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस :- श्री गोसावी यांचे शेत
पश्चिमेस :- अमरावती ते चांदूर रेल्वे स्टेट हायवे
उत्तरेस :- खरेदी करुन देणार यांच्या शेताचा भाग
दक्षिणेस :- हयाच शेत सर्वे नं.मधील खरेदीदार यांच्या मालकीचा शेताचा भाग

**४.** मौजा वडाळी प्रगणे- नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील, शेत सर्वे नं.२७/१, भो. वर्ग-१, एकुण क्षेत्र ४ हेक्टर ६९ आर आकार रुपये १०.०५ हयापैकी खरेदी देणार यांच्या मालकीचे असलेले पु.प.वाटणीचा दक्षिणेकडील खरेदीदार यांचेच मालकीचे शेताचा भाग, याचे क्षेत्रफळ ० एकर -८१ आर. (२ एक्कर-० गुंठे ) त्याची चर्तुसिमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस :- श्री गोसावी यांचे शेत
पश्चिमेस :- चांदूर रेल्वे रोड
उत्तरेस :- श्री परशरामजी घोडे यांचे शेत
दक्षिणेस :- मनपा च्या नकाशा प्रमाणे दुस-याचे मालकीचे प्लॉटस.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक २१/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का
सही/-
श्रीमती वाय एस शेख
१अधीक्षक न्याय शाखा
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**Sant Gadge Baba Amravati University**
**Admission Notice 2026-27**

SGBAUAC AC/152/2026
Date -02/06/2026

Online applications are invited for admission to various PG courses viz. **M.Sc. in** (Chemistry, Physics. Mathematics, Botany, Zoology. Statistics. Geology. Microbiology, Computer Science, Applied Electronics. Biotechnology (Through Entrance) and Home Science, **B.L.I.Sc./ M.L.I.Sc./ LL.M./ P.G. Diploma in** (Cyber Law/ Intellectual & Property Law/ Human Right Education/ Computer Science/E-learning & M-Learning/ Watershed Technology & Management/ Yoga Therapy/ Communication Skills in English and Counselling & Psychotherapy) **M.A. in** (Translation Hindi, Marathi, Sociology, Gender Women Studies. Dr. Babasaheb Ambedkar Thoughts, Counselling & Psychotherapy. Life Long Learning & Extension, Master of Performing Art (MPA) - Dance & Theatre. Dance (Katthak). Psychology. Pali and Buddhism. English, Yoga Shastra. Functional English, Sanskrit. Chhatrapati Shivaji Maharaj Thoughts & Mgt.)/ BSc in Data Science and Analytics/ **B Com in** retail management, **BSc in** Biotechnology in prescribed format available on website https://sgbauadm.samarth.edu.in/ from 05/06/2026 from 10.30 AM onwards. Before subinitting the application forin. the applicant should pay online Rs. 300/- for Open category and Rs. 200/- for Reserved Category. Applicant should attach the online payment receipt to the **print out of the application form and submit** the same by Post/ By hand delivery along with all necessary documents to the **Chairman, Central Admission Committee, Seminar Hall, Department of Botany, Sant Gadge Baba Amravati University, Amravati 444602 (M.S.).** For detail please visit https://sgbau.ac.in/

**Registrar**

## महाराष्ट्राची विक्रमी झेप; सौर कृषिपंपांमध्ये गाठला देशात सर्वाधिक १० लाखांचा टप्पा

# देशातील एकूण सौर पंपांमध्ये राज्याचा ६४ टक्के वाटा

**अमरावती/का.प्र.**

सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने बुधवारी (दि. ३) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे.देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. महाराष्ट्रानंतर हरियाणा- १ लाख ९० हजार, राजस्थान- १ लाख २७ हजार,



उत्तरप्रदेश- ७१ हजार ५३८, झारखंड- ६१ हजार ४५२, गुजरात- २१ हजार ८९४ अशी क्रमवारी आहे. याआधी महाराष्ट्राने महावितरणच्या माध्यमातून मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत एकाच महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याची विश्वविक्रमी कामगिरी केली आहे. त्याची नोंद डिसेंबर २०२५ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे.मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये सर्वसाधारण शेतकऱ्यांना केवळ १० टक्के आणि अनुसूचित जाती-जमाती शेतकऱ्यांसाठी केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्स्यावर तीन, पाच व ७.५ अश्वशक्तीचे सौर कृषिपंप देण्यात येत आहेत. सौरपंपाच्या पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होते. त्यामुळे आतापर्यंत १० लाखांवर शेतकऱ्यांची वीजबिलांमधून मुक्तता झाली आहे. तर दिवसा अखंडित वीजपुरवठा मिळत आहे. यासोबतच शेतातील विद्युत अपघातांचा धोकाही पूर्णतः टळला आहे. या सौर पॅनेल्समुळे सिंचनासह शेत घरातील विविध उपकरणे, मोबाईल चार्जिंग व ई-वाहन चार्जिंग करणेही सहज शक्य झाले आहे. तसेच शिल्लक विजेच्या आधारे शेतकऱ्यांना छोटे कृषिपुरक अन्य व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळाली आहे.या योजनेतील प्रत्येक सौरपंपाला ५ वर्षांची वॉरंटी देण्यात आली आहे. या कालावधीत देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादार एजन्सीवर बंधनकारक आहे.

तसेच सोलर पॅनेल्स आणि पंपाचे नुकसान, नैसर्गिक आपत्ती तसेच चोरीविरोधी विमा संरक्षणही उपलब्ध आहे. सौर कृषिपंपाबाबत काही तक्रार असल्यास संबंधित शेतकऱ्यांना महावितरण मोबाईल ॲप व वेबसाईट, २४ तास सुरु राहणारे टोल फ्री क्रमांक आणि संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करण्याची सोय उपलब्ध आहे.

## संक्षिप्त



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

**शिराळा-**येथील ग्रामपंचायत मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण मान्यवरांनी केले.यावेळी कृउबास संचालक तथा माजी जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती मिंलिदभाऊ तायडे, ग्रामविकास अधिकारी अनितताई नवले, ग्रामपंचायत सदस्य जयंत आमले, मंगेश काळमेघ, सागर लव्हाळे, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी योगेंद्र तायडे मधुकरराव खेडकर, निखिल गावंडे, रविंद्र मोहोड, प्रविण भागवत दिनेश मुंदाने, उज्वला मोहोड, रुपालीताई कुसटकर, रोजगार सेवक अनिल सिरसाट, तसेच ग्रामस्थ आशिष खैरकर, भुषण घुरडे भरत लव्हाळे, पवन पाटणकर उपस्थित होते.

### महिलेजवळील ७० हजारांचा मुद्देमाल चोरला

**अमरावती-**एका महिलेजवळील ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला. ही घटना कोतवाली ठाण्याच्या हद्दीत घडली. एक महिला ही तिच्या मुलीला सोडायला जात होती. मार्गात त्यांनी नमुनाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एका दुकानातून चप्पल खरेदी केली. पैसे देण्याकरिता पर्स उघडल्यावर त्यांना त्यातील ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल दिसून आला नाही. अज्ञात चोरट्याने मुद्देमाल लंपास केल्याचे लक्षात आल्यावर महिलेने कोतवाली ठाण्यात तक्रार दाखल केली.

# शिवसेना स्थापनेच्या ६० वर्षपूर्तीनिमित्त तिवसा तालुका मेळावा उत्साहात

**कुऱ्हा/वार्ताहर**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच शिवसेना स्थापनेची ६० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने तिवसा येथे आयोजित शिवसेना (उबाठा) गटाचा तालुका मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात लक्षवेधी ठरला. तालुक्यात शिवसेना उभाठा आयोजित मेळाव्या करिता तालुकाभरातील आजी-माजी पदाधिकारी, शिवसैनिक, शाखाप्रमुख, महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी व ज्येष्ठ शिवसैनिकांच्या उपस्थितीने मेळाव्याला मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत, सत्कार व मार्गदर्शनपर भाषणे झाली.मेळाव्याच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा माजी खा. अनंत गुळे यांनी कार्यकर्त्यांना संघटन वाढीसाठी जनसंपर्कावर भर देण्याचे आवाहन केले.यावेळी त्यांनी आगामी राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना कार्यकर्त्यांना अधिक जोमाने कामाला लागण्याचे



आवाहन केले. 'जनतेशी नाळ जोडली तर भविष्यात भाजपचा आमदार निवडून येणार नाही. शिवसेनेचा भगवा पुन्हा जनतेच्या मनात फडकवून शिवसेना अधिक ताकदीने उभी करू,'असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे उद्घाटक शिवसेना उपनेते तथा सहसंपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी संघटन मजबूत करण्याची गरज अधोरेखित केली. तर जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी शिवसेनेच्या भविष्यातील वाटचालीसंदर्भात मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांना एकजुटीचा संदेश दिला.मेळाव्यात माजी जिल्हाप्रमुख प्रदीप बाजड, उपजिल्हाप्रमुख राजेश बंड, विधानसभा संघटक विलासराव माहोरे,अशोक पवार, डॉ. मेघराज कोचर,मंदा श्रीखंडे, बेबा तायडे, जयकांत माहुरे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी शिवसेना संघटन मजबुती, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, युवकांचा सहभाग आणि पक्षविस्तार या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. विविध पदाधिकाऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त करत बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलीप केणे, देविदास निकाळजे, शरद वानखडे, सुभाष ढगे, सुनील तालन, शरद इंगळे, श्रीकृष्ण अर्मळ, गजानन पाथरे, दिलीप कमडापुरे,बंटी माहोरे गिरधर राठोड, निखिल वाढणकर, विजय शेलोकार, शिशुपाल इखार, अनिल काढणे, प्रमोद विघ्ने, विनोद गुल्हाने, दिनेश बघणे, अजय रावेरकर यांच्यासह युवासेना पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महापालिकेची विशेष मोहीम

# प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीत ७ हजारांचा दंड



**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर (झोन क्र. २, राजापेठ) यांच्या मार्गदर्शनाखाली इर्विन चौक परिसर व दसरा मैदान रोड परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण १८ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीत काही ठिकाणी प्लास्टिक वापर व स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन आढळून आल्याने संबंधित आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

कारवाई अंतर्गत बुरहानपुर जूस सेंटर, मोहम्मद इद्रीस, नीरज शर्मा, रोहन शर्मा, लखनऊ हँडलूम, संजय जयस्वाल आणि आनंद कुमार यांच्याकडून प्रत्येकी १ हजार रुपये असा एकूण ७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. महानगरपालिकेच्या या विशेष मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे तसेच स्वास्थ्य निरीक्षक मिथुन उसरे, सचिन सैनी, मिथुन वाघमारे, शक्ति पीवाल आणि योगेश कंडारे यांनी सहभाग घेतला. महानगरपालिकेकडून शहरात प्लास्टिकमुक्त व स्वच्छ वातावरण निर्मितीसाठी अशा मोहिमा सातत्याने राबविण्यात येत असून नागरिक व व्यावसायिकांनी नियमांचे पालन करून महानगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मांजरखेड (दानापूर) येथील घरफोडी प्रकरणात नवा ट्विस्ट

## ११७ नव्हे, तब्बल २२७ ग्रॅम सोने लंपास?

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील मांजरखेड (दानापूर) येथे घडलेल्या धाडसी घरफोडी प्रकरणात आता नवे वळण आले असून, सुरुवातीला पोलिसांकडे ११७.६८ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरीस गेल्याची नोंद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात तब्बल २२७ ग्रॅम सोने चोरीला गेले असल्याचा दावा फिर्यादी महिलेने केला असून, त्याबाबत एफआयआरमध्ये वाढीव नोंद करण्यात यावी, अशी मागणी तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मांजरखेड (दानापूर) येथील रहिवासी विमल वामनराव ठाकरे (वय ६०) या २९ मे रोजी आपल्या कुटुंबीयांसह लग्नकार्यासाठी बाहेरगावी गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी २९ ते ३१ मे दरम्यान त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटाचे लॉकर फोडून त्यामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले. ३१ मे रोजी ठाकरे कुटुंब घरी परतल्यानंतर घराचे कुलूप तुटलेले आणि घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत आढळून आले. त्यानंतर त्यांनी तळेगाव दशासर पोलिसांत तक्रार दाखल केली. सुरुवातीला ११७.६८ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची नोंद करण्यात आली होती. मात्र पुढील पडताळणीदरम्यान चोरीस गेलेल्या दागिन्यांचे वजन २२७ ग्रॅम इतके असल्याचे निदर्शनास आल्याने, फिर्यादीने त्याबाबत पोलिसांकडे लेखी निवेदन सादर करून गुन्ह्यात वाढीव नोंद करण्याची मागणी केली आहे. भरवस्तीत घडलेल्या या धाडसी घरफोडीमुळे मांजरखेड (दानापूर) परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीचा आकडा आणि सोन्याचे प्रमाण वाढल्याचा दावा समोर आल्याने या प्रकरणाची गंभीरता आणखी वाढली आहे. चोरट्यांनी नेमकी रेकी करून ही चोरी केली का, त्यांना घर बंद असल्याची माहिती कशी मिळाली, याचा



तपास पोलीसांना करणे गरजेचे झाले आहे. दरम्यान, चोरीस गेलेल्या सोन्याचे प्रमाण एफआयआरमध्ये वाढवून नोंद करण्यात यावी तसेच या जबरी घरफोडीचा लवकरात लवकर छडा लावून आरोपींना अटक करावी, अशी मागणी फिर्यादी विमल वामनराव ठाकरे तसेच ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# वीज यंत्रणेशी छेडछाड जीवावर बेतू शकते; महावितरणचा गंभीर इशारा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

कृषी फिडरवरील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणचे कर्मचारी सातत्याने कार्यरत असताना काही अज्ञात व्यक्तींकडून वीज यंत्रणेशी अनधिकृत छेडछाड होत असल्याचे गंभीर प्रकार समोर आले आहेत. यामुळे महावितरण कर्मचाऱ्यांच्या तसेच संबंधित व्यक्तींच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने प्रशासनाने सावध राहण्याचे आवाहन केले आहे. फिडरवर बिघाड झाल्यास कर्मचाऱ्यांकडून संबंधित सेक्शनचा एबी स्विच उघडून दोषग्रस्त भाग शोधण्याचे काम केले जाते. दोषग्रस्त सेक्शन निश्चित झाल्यानंतर इतर गावांचा वीजपुरवठा सुरू करून संबंधित भागात पेट्रोलिंग व दुरुस्तीचे काम केले जाते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून वीजपुरवठा बंद असलेल्या सेक्शनमधील उघडे ठेवलेले एबी स्विच काही अज्ञात व्यक्तींकडून परस्पर बंद (क्लोज) केले जात असल्याच्या घटना घडत आहेत. `लाईनमनने एबी स्विच उघडून पुढे पेट्रोलिंग सुरू केले असताना कोणीतरी तो स्विच परस्पर बंद केल्याने संपूर्ण फिडरचा वीजपुरवठा खंडित झाला. महावितरणने स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारे एबी स्विच हाताळणे अत्यंत धोकादायक असून त्यामुळे संबंधित व्यक्तीचा तसेच कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात येऊ शकतो. त्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांनी स्वतः कोणतीही छेडछाड न करता महावितरणच्या अधिकृत कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कर्जमाफीबाबत ग्रामीण भागात उत्सुकता

# पात्रता-अटींमुळे अनेक शेतकरी संभ्रमात

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीत दिलेल्या शेतकरी कर्जमुक्तीच्या आश्वासनाला अखेर राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' अद्याप अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेली नसली तरी आचारसंहिता संपल्यानंतर या योजनेची अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

प्रस्तावित योजनेनुसार राज्यातील सुमारे ५६ लाख खातेदार शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. एकूण ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या कर्जभारातून शेतकऱ्यांची सुटका होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यापैकी सुमारे १६ लाख ७४ हजार शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दोन लाख रुपयांपर्यंत थकीत कर्ज असलेल्या लाखो शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ मिळणार आहे.राज्यात आधीच विविध लोककल्याणकारी योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना नव्या कर्जमाफी योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर सुमारे १४ हजार ७५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. यामध्ये विद्यमान व माजी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायतीचे सदस्य यांचा समावेश आहे. तसेच सरकारी व निमसरकारी कर्मचारी, आयकर भरणारे नागरिक, सहकारी संस्था, बाजार समित्या, साखर कारखाने, दूध संघ, सूतगिरण्या व सहकारी बँकांचे पदाधिकारी आणि संचालक मंडळातील सदस्य यांनाही लाभ मिळणार नाही. दरमहा २५ हजार रुपयांपेक्षा जास्त वेतन घेणारे कर्मचारीदेखील या योजनेस अपात्र राहणार आहेत.

सरकारच्या या निर्णयाचे अनेक शेतकरी स्वागत करत असले तरी पात्रता निकष, अपात्रतेच्या अटी आणि अधिकृत शासन निर्णय अद्याप जाहीर न झाल्यामुळे ग्रामीण भागात विविध चर्चांना उधाण आले आहे. अनेक शेतकरी आपल्या कर्जाची स्थिती, पात्रता आणि लाभाबाबत माहिती घेण्यासाठी बँका व संबंधित कार्यालयांकडे चौकशी करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कर्जमाफीची अधिकृत घोषणा आणि शासन निर्णय जाहीर झाल्यानंतरच योजनेचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट होणार असून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या नजरा आता शासनाच्या पुढील निर्णयाकडे लागल्या आहेत.

## कृषी विज्ञान केंद्राच्या मार्गदर्शनाने वऱ्हा शेतकऱ्यांची भरारी

# हलक्या व मध्यम जमिनीतही विक्रमी कापूस उत्पादन

**कुऱ्हा/वार्ताहर**

कृषि विज्ञान केंद्र, घातखेड (अमरावती) यांच्या विशेष कापूस प्रकल्पांतर्गत वऱ्हा येथे आयोजित कापूस पीक प्रशिक्षण व चर्चासत्र कार्यक्रमास शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. शास्त्राधारित मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि तांत्रिक सहकार्याच्या बळावर वऱ्हा येथील शेतकऱ्यांनी सलग दोन वर्षे हलक्या व मध्यम जमिनीत विक्रमी कापूस उत्पादन घेऊन जिल्ह्यात नवा आदर्श निर्माण केला आहे.कार्यक्रमास सरपंच नीलिमा समरीत, उपसरपंच अंकुश बहातकर, अंकुर सीड्सचे प्रतिनिधी निखिल बद्रे, विशेष कापूस प्रकल्पाचे जिल्हा नोडल अधिकारी व कृषिविद्या विषय विशेषज्ञ प्रमोद मेंढे तसेच प्रकल्प सहाय्यक शुभम लहाने यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी प्रमोद मेंढे यांनी कापूस, तूर व सोयाबीन पिकांमधील किड व रोग व्यवस्थापन, संतुलित खत व्यवस्थापन, माती व पाणी परीक्षणाचे महत्त्व, जैविक निविष्ठांचा वापर तसेच विशेष कापूस प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. निखिल बद्रे यांनी सुधारित बियाणे निवड,पीक व्यवस्थापन आणि




उत्पादनवाढीसाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले.विशेष कापूस प्रकल्पांतर्गत वऱ्हा येथील शेतकऱ्यांनी सघन लागवड पद्धतीमध्ये एकरी १५.५० क्विंटल तर कमी अंतरावरील लागवड पद्धतीमध्ये तब्बल १७ क्विंटल प्रति एकर कापूस उत्पादन घेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.सरपंच नीलिमा समरीत यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक करून आभार व्यक्त केले. उपसरपंच अंकुश बहातकर यांनी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती अधिक फायदेशीर करण्याचे आवाहन केले. यावेळी दि. १ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'स्वस्थ माती, सशक्त शेतकरी, समृद्ध भारत' अभियानाची माहिती देऊन शेतकऱ्यांना माती परीक्षण, पाणी परीक्षण व संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.कृषी विज्ञान केंद्र, घातखेड येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. अतुल कळसकर, विशेष कापूस प्रकल्पाचे जिल्हा नोडल अधिकारी प्रमोद मेंढे तसेच सर्व विषय विशेषज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आला. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प सहाय्यक शुभम लहाने, दिगंबर सातंगे व प्रणिता भोंगे यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे संचालन शुभम लहाने यांनी केले तर उपस्थित मान्यवर, शेतकरी बांधव व सहकाऱ्यांचे आभार दिगंबर सातंगे यांनी मानले. सदर कार्यक्रम महात्मा ज्योतिबा फुले माळी समाज भवन, वऱ्हा येथे उत्साहात पार पडला.विशेष कापूस प्रकल्पाला वऱ्हा येथील शेतकऱ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा प्रकल्पाच्या यशाचा भक्कम पाया ठरला असून, या सहकार्याबद्दल कृषी विज्ञान केंद्र, घातखेड यांच्या वतीने सर्व वऱ्हावासीयांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.'कृषी विज्ञान केंद्र,घातखेडची साथ म्हणजे हमखास विकास' हे ब्रीद प्रत्यक्षात उतरवत केंद्र शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# पुलाचे कठडे तोडून ट्रक थेट नदीपात्रात कोसळला, एकाचा मृत्यू ,दोघे जखमी

## त्रिवेणी संगम पुलावर अपघात





**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील मंजूरपुरा येथील खान विट सप्लायर्सचा ट्रक (क्र. MH-27 C-0065) विटा आणण्यासाठी अचलपूरहून चांदूरबाजार कडे जात असताना तोंडगावजवळ भीषण अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक त्रिवेणी संगमाजवळील पुलाचे कठडे तोडून थेट नदीपात्रात कोसळला. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अचलपूर येथील मंजूरपुरा व बेगमपुरा परिसरातील रहिवासी समीर बेग तमीज बेग, शेख समीर शेख जमील आणि मोहम्मद आतिफ मोहम्मद हफीज हे नेहमीप्रमाणे ५ जून रोजी सकाळी ट्रकने विटा आणण्यासाठी निघाले होते. तोंडगावजवळील वळणावरील पुलावर ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. या अपघातात बेगमपुरा निवासी समीर बेग तमीज बेग (वय ३२) यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. तर मंजूरपुरा निवासी शेख समीर शेख जमील आणि मोहम्मद आतिफ मोहम्मद हफीज हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर ☞(पान २ वर)

# अमरावती शहर पोलिस दलात खांदेपालट

## ठाणेदारांसह गुन्हे शाखेतही मोठे फेरबदल

### २२ पोलीस निरीक्षक, ७ एपीआय, २८ उपनिरीक्षकांच्या बदल्या



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर पोलिस आयुक्तालयात प्रशासकीय कारणास्तव मोठ्या प्रमाणावर खांदेपालट करण्यात आला असून २२ पोलीस निरीक्षक, ७ सहायक पोलीस निरीक्षक (एपीआय) आणि २८ पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) यांच्या बदल्यांचे आदेश शुक्रवारी जारी करण्यात आले. शहरातील अनेक महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांसह गुन्हे शाखेच्या नेतृत्वातही बदल करण्यात आल्याने या फेरबदलांची विशेष चर्चा आहे.

सिटी कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके यांची नागपुरी गेट येथे, तर नागपुरी गेटचे हनुमंत उरलगोंडवार यांची बडनेरा पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. फ्रेजरपूरा पोलीस ठाण्याचे प्रभारी रोशन शिरसाट यांच्याकडे सिटी कोतवालीची जबाबदारी सोपविण्यात आली असून राजापेठचे ठाणेदार पुनित कुलट यांची नांदगाव पेठ येथे बदली करण्यात आली आहे. भातकुलीचे रवि राजुलवार हे फ्रेजरपूरा पोलीस ठाण्याचे नवे प्रभारी असतील.

या फेरबदलांमध्ये गुन्हे शाखेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. गुन्हे शाखेत कार्यरत असलेले संदीप चव्हाण यांची राजापेठ पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर नांदगाव पेठचे ठाणेदार दिनेश दहातोंडे यांच्याकडे गुन्हे शाखा युनिट-१ ची धुरा सोपविण्यात आली आहे. विशेष शाखेतील अतुल वर यांची बदली गुन्हे शाखा युनिट-२ प्रभारी म्हणून करण्यात आली आहे. त्यामुळे शहर ☞(पान २ वर)

# वाघाडी नाल्यावरील पूल बांधकामासाठी ग्रामस्थांचे उपोषण

## बांधकाम विभागाने दिले लेखी आश्वासन



**खल्लार/प्रतिनिधीः-** कळाशी ते कुकसा मार्गावरील वाघाडी नाल्यावरील पुलाचे बांधकाम प्रशासनाच्या दिरंगाईमुळे कित्येक वर्षांपासून रखडले आहे. सदर पुलावरील बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात यावे, या मागणीसाठी डॉ.अविनाश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली कळाशी, कुकसा,खैरी व ईचोरा येथील ग्रामस्थ शुक्रवार, (दि.५)पासून दर्यापूर तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते.

मागिल अनेक वर्षांपासून वाघाडी नाल्यावरील पुलाच्या उंचीवाढ व नव्याने बांधकामाची मागणी प्रशासनाकडे सातत्याने करण्यात येत आहे. मात्र, वारंवार निवेदने व पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप यावेळी ग्रामस्थांनी केला आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात नाल्याला पूर आल्यास वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. त्यामुळे परिसरातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. अनेकदा जिव धोक्यात घालून नागरिकांना प्रवास करावा लागत असल्याचा संताप उपस्थित ग्रामस्थांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यासमोर व्यक्त केला. दरम्यान डॉ.अविनाश ठाकरे यांनी लेखी आश्श्वासन दिल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही अशी ठोस भूमिका घेतली. काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर जि.प.बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता मुकेश रायबोले, ज्ञानेश्वर मेश्राम यांनी आमदार गजानन लवटे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून निधी उपलब्ध ☞(पान २ वर)

# आक्रमक गुरुदेवभक्त व शेतकऱ्यांचा तहसीलदाराच्या दालनात ठिय्या

## -राष्ट्रसंताना भारतरत्न देण्यासह विमा परताव्याची मागणी



**तिवसा/प्रतिनिधीः-** राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात यावा तसेच तालुक्यातील सोयाबीन उत्पादक विमाधारक शेतकऱ्यांना तातडीने विम्याचा परतावा देण्यात यावा मागणीसाठी मुकूंद पूनसे यांच्या नेतृत्वात बेमुदत अन्नत्याग आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनासाठी आज शेकडो गुरुदेवभक्तांसह तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होऊन राष्ट्रसंताना 'भारतरत्न' पुरस्कारासाठी व शेतकऱ्यांच्या विमा परताव्याच्या मागणीसाठी आक्रमक पावित्रा घेत तिवसा तहसीलदारांच्या दालनात दोन तास ठिय्या आंदोलन केले.

यावेळी उपस्थित गुरुदेवभक्तांनी आज दुपारी १२ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने तहसील परिसर दणाणून सोडला. आंदोलकांनी तहसीलदारांच्या कक्षाकडे कूच करत दोन ठिय्या देत आपल्या मागण्या रेटून धरल्या होत्या,यावेळी तहसीलदार मयूर कळसे यांनी आंदोलकांशी सकारात्मक चर्चा करत आपल्या मागण्या जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून भारत सरकारकडे पोहचवणार असून विमा परताव्या संदर्भात ☞(पान २ वर)

# आपले शहर -हिरवे शहर अंतर्गत जुळवा नगरीत वृक्षारोपण अभियान



**अचलपूर/प्रतिनिधीः-** पर्यावरणाचा समतोल बिघडून ग्लोबल वॉर्मिंग, वाढते तापमानाने जनजीवन पूर्णपने विस्कळीत झाले आहे. भविष्यात पर्यावरण नुकसानामुळे होणाऱ्या निसर्ग प्रकोपची जाणीव जुळवा नगरीतील आदिवासी पर्यावरण संघटनेने गेल्या अनेक वर्षापूर्वीच जाणली व गेल्या अनेक वर्षापासून संघटनेकडून जुळ्या शहरात ठिकठिकाणी वृक्षारोपण करून सदर सामाजिक उपक्रम राबवित आहे. ५ जून जागतिक पर्यावरण दिनाच्या ☞(पान २ वर)

### दर्यापूरात काँग्रेसला मोठा धक्का

# शहराध्यक्ष आतिष शिरभाते यांचा राजीनामा



**खल्लार/प्रतिनिधीः-** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे दर्यापूर शहराध्यक्ष आतिष बबनराव शिरभाते यांनी आपल्या पदाचा राजीनामा जिल्हाध्यक्षांकडे सादर केल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

आतिष शिरभाते यांनी अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते असून पक्षाने त्यांच्यावर सोपविलेली दर्यापूर शहराध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली. दर्यापूर नगर परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाला घवघवित यश मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचेही ☞(पान २ वर)

# आ.प्रवीण तायडे यांच्या हस्ते वृक्षारोपण



**अचलपूर/प्रतिनिधीः-** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी ५ जून रोजी अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात विविध ठिकाणी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला . यावेळी प्रसिद्ध अष्टमसिद्धी परिसर ,अचलपूर उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. या कार्यक्रमाला भाजपा पक्षाचे ज्येष्ठ नेते गजानन कोल्हे,जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड,शहराध्यक्ष कुंदन यादव,तालुकाध्यक्ष शंकर मालखोडे,स्वप्नील मडघे,नगरसेविका अर्पणा रोडे,माजी नगरसेवक रुपेश ढेपे,अक्षय पखाले,पवन हिंगणे ,महेश देशमुख,प्रफुल बर्वे, शिवा बुंदेले आदी ☞(पान २ वर)

# चंद्रावती कॉलनीमधून विवाहिता बेपत्ता



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या चंद्रावती कॉलनी मधून एक विवाहिता बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. रेणुका अमोल पळसकर (वय ३१) असे बेपत्ता विवाहित महिलेचे नाव आहे. माहितीनुसार रेणुका पळसकर २ जून रोजी सायंकाळी सात वाजता चंद्रावती कॉलनी मधून पतीच्या घरी जाण्याचे सांगून निघाली होती पण ती घरीही पोहोचली नाही आणि परत माहेरी देखील आली नाही. घरच्यांनी सर्वत्र तिचा शोध घेतला पण ती मिळाली नाही. शेवटी तिचे भाऊ समीर ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीवर गुन्हा दाखल



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** शहरातील गुलजारपुरा परिसरात अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ५ ला रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास एक अल्पवयीन मुलगी झेरॉक्स काढण्यासाठी गुलजारपुरा येथील ऑनलाइन कॅफे सेंटरवर गेली होती. यावेळी कॅफे चालक रमेश हंसराज पटेल (वय ४५) याने मुलीशी अश्लील व अयोग्य वर्तन केल्याचा आरोप आहे. तसेच मुलीला अयोग्य शब्दांत बोलून तिचा विनयभंग केल्याची तक्रार करण्यात आली आहे.

घरी परतल्यानंतर मुलीने घडलेला प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. ☞(पान २ वर)

# वळणावर दुचाकी अनियंत्रित होऊन अपघात

## -दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू




**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** कुऱ्ह्यापासून चार किलोमीटर अंतरावरील वळणावर दुचाकी अनियंत्रित होऊन अपघात झाल्याची घटना (दि.५) सकाळी अकरा वाजताच्या सुमारास घडली.

मार्डी वरुन एम एच २७ डीबी ६५४५ क्रमांकाची दुचाकी कुऱ्ह्याकडे येत असताना हनुमान मंदीराजवळी वळणावर दुचाकी अनियंत्रित होऊन अपघात झाला. यात दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू झाला.

सुनिल डबले रा.अंजनसिंगी असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.या घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला तसचे मृतदेह शवच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रूग्णालयात पाठविण्यात आला. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# मोर्शी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे

## नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने यांचा पुढाकार



**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी शहर सुंदर शहर बनविण्याचा संकल्प हाती घेऊन आता मोर्शी शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी नगराध्यक्षा प्रतीक्षा रवींद्र गुल्हाने यांनी त्यांच्या संकल्पनेतून शहरातील चौकाचौकात व ☞(पान २ वर)

# धन्वंतरी रुग्णालय सहकारी संस्था पदाधिकारी निवड सभा

## अध्यक्षपदी डॉ.ओमप्रकाश मुंधडा तर उपाध्यक्षपदी डॉ. अनिल रोहनकर,गजानन रडके



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक धन्वंतरी सहकारी रुग्णालय सहकारी संस्था नवनिर्वाचित संचालकांची पदाधिकारी निवडीची प्रथम सभा आज दुपारी १२.०० वाजता धन्वंतरी रुग्णालय निवडणूक निर्णय अधिकारी तथा अध्यासी अधिकारी सुधीर खंबायत यांच्या अध्यक्षतेखाली झाली. धन्वंतरी सहकारी रुग्णालयाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध सर्जन डॉ.ओमप्रकाश मुंधडा यांची तर उपाध्यक्षपदी डॉ. अनिल रोहनकर व गजानन रडके यांची अविरोध निवड झाल्याची घोषणा सुधीर खंबायत यांनी केली. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी अविनाश महल्ले, सहकार अधिकारी महेश चक्रे व उदय शिवडीकर यांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये आपला सहभाग नोंदविला.

आज दुपारी १२.०० वाजता निवडणूक प्रक्रिया जाहीर करण्यात आली अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाकरिता इतर कुणाचेही अर्ज प्राप्त न झाल्याने अध्यक्षपदी डॉ. मुंधडा तर उपाध्यक्ष म्हणून डॉ.रोहनकर व गजानन रडके यांची निवड झाली. कार्यकारी संचालक म्हणून प्रा. अशोक ठाकरे यांची निवड करण्यात आल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.ओ.जी.मुंधडा यांनी जाहीर केले.

सभेला संचालक मंडळातील डॉ.मनोज गुप्ता, डॉ. ओ.जी. मुंदडा, डॉ. अनिल रोहनकर, डॉ.अविनाश लव्हाळे, डॉ. स्वप्नील शिरभाते ,डॉ. आशिष साबू, डॉ.प्रमोद झाडे, प्राध्यापक अशोक ठाकरे ,ओंकारराव बंड,प्रतापराव भुयार, राजेश गोयनका, गजानन रडके, मनीष कोरपे,संजय ☞(पान २ वर)

# सोशल मीडियावर आ.बच्चू कडू यांच्यासंदर्भात आपत्तीजनक पोस्ट

## प्रहार संघटनेने केली कारवाईची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** विधान परिषद सदस्य व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या संदर्भात सोशल मीडियावर आपत्ती जनक पोस्ट व्हायरल करण्यात आली आहे. यामुळे प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रोश करत पोस्ट व्हायरल करणारे विनायक पांडुरंग पवार यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत केली आहे.

तक्रारीमध्ये म्हटले आहे की, चाणक्य न्यूज इंडिया मराठी चॅनल व भन्नाट न्युजचे संचालन करणारे विनायक पांडुरंग पोवार यांनी आमदार बच्चू कडू यांच्या संदर्भात अभद्र भाषेचा वापर करत त्यांच्यावर आपत्ती जनक पोस्ट केली आहे. गेल्या काही दिवसापासून काही समाजकंटक विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आमदार बच्चू कडू यांची प्रतिमा मलीन करण्याचे प्रयत्न करत आहे. त्यांच्या संदर्भात ☞(पान २ वर)